# माणूस

ऑगस्ट

१९६२



किंमत एक रुपया

माणूस
मराठी मासिकपत्र

संपादक
श्री. ग. माजगांवकर

• • •

पत्रव्यवहाराचा पत्ता
' माणूस, ' मराठी मासिक
४१९ नारायण पेठ, पुणें २.

* * *

वार्षिक वर्गणी : आठ रुपये
किरकोळ अंक : एक रुपया

• • •


## — सूचना —

१. प्रकाशित लेख, चित्रें इत्यादि बाबतचे सर्व हक्क स्वाधीन.
२. पुरेसें पोस्टेज सोबत नसल्यास नापसंत साहित्य लगेच निकालांत काढलें जातें.
३. या मासिकांत व्यक्त झालेलीं मतें ' माणूस ' मासिकाच्या चालकांचीं अधिकृत मतें असतातच असें नाहीं.

अभिराष्ट्रेण वर्धताम्




वर्ष दुसरें : ऑगस्ट १९६२ : अंक तिसरा

## स्वरूप–दर्शन


— सामाजिक अंतरंग —

रणावीण स्वातंत्र्य जेव्हां मिळालें ... ... रा. म. शास्त्री.
न बहरलेलें भारताचें नंदनवन ... ... ना. ह. आपटे.

— साहित्य विभाग —

ढीग ... ... प्रल्हाद वडेर.
बाझी ... ... माधव आपटे.
हें फूल हातीं घे ... ... प. त्रि. सहस्त्रबुद्धे.
भेट ... ... यशवंत पारखी.
डॉ. गोखले यांचें केतकर चरित्र ... ... प्रा. भीमराव कुलकर्णी.
कविता ... ... सुरेश भट, रमेश ललगुणकर
श्री. यशवंत भिमाले, रमेश धोंगडे
सुधाकर देशमुख
मला दिसलेले लेखक य. गो. जोशी. ... दि. बा. मोकाशी

— रंगभूमि, चित्रपट,—

ते कलावंत, त्या आठवणी ... ... सुधीर दामले
गंधर्वभूमि अनंत ओक.
हरियाली और रास्ता ( परीक्षण ) ... ... रंगा मराठे

तुमच्या दीर्घायुष्याची वाटचाल
श्री. पु. ना. ओक यांचा आरोग्यविषयक विशेष लेख.


मुखपृष्ठ— सुभाष संचेती.

संपादकीय

# स्वातंत्र्य कसें मिळालें

भारताच्या स्वातंत्र्याचा इतिहास म्हणजे दोन-चार विभूतींच्या प्रयत्नांचें व पराक्रमांचें गौरवगान असें समीकरण आज जवळजवळ रूढ आहे. मग कोणी आपापल्या पूर्ववयांतील संस्कारांमुळें वा अनुभवांनीं झालेल्या मतांप्रमाणें वासुदेव बळवंत ते सुभाषचंद्र या सशस्त्र क्रांतिकारकांचीं गीतें गातील तर कोणी साबरमतीच्या संताला मनोभावें शरण जातील, जणुं समाज म्हणजे एक निर्जीव मातीचा गोळा होता आणि जो आकार त्याला देण्याचा या विभूतींनीं प्रयत्न केला तो आकार त्यानें निमूटपणें बिनतक्रार धारण केला. या व्यक्तिप्रधान विभूतिपूजक मांडणीमुळें इतिहासाचीं चाकें पक्षपाताच्या व वैयक्तिक गुणदोषदिग्दर्शनाच्या ठराविक चाकोरींत रुतून बसतात व विशिष्ट घटनेपासून जो कांहीं बोध वा समज भावी पिढ्यांनीं घ्यावा अशी अपेक्षा असते ती सफल होत नाहीं.

या व्यक्तिपूजक इतिहासदर्शनावर एक उतारा म्हणून या अंकांत प्रसिद्ध केलेला मोस्ले यांच्या ग्रंथाचा परिचय चांगलाच उपयुक्त आहे. गांधी, नेहरू, वल्लभभाई या व्यक्तींचा मोठेपणा व त्यांनीं स्वातंत्र्यलढ्यांत बजावलेली कामगिरी कमी लेखण्याचा मुळींच हेतु नाहीं. परंतु एक गोष्ट कोणाहि वाचकाला जाणवते कीं, स्वातंत्र्यप्राप्तीच्या त्या आणीबाणीच्या व महत्त्वपूर्ण कालखंडांत या व्यक्ति व एकंदरींत त्यावेळचें आमचें सर्वच नेतृत्व कसें अगतिकपणें येईल त्या परिस्थितीचा स्वीकार करीत होतें. तसें पाहिलें तर देशाची फाळणी यांपैकीं कोणालाच नको होती. नेहरू, गांधीजींनीं शेवटपर्यंत तिला विरोधच केला. मग मनापासून नको असलेली फाळणी या नेत्यांना कां मान्य करावी लागली ? जीनांनीं दिलेलें यादवी युद्धाचें आव्हान स्वीकारून, फाळणीची योजना धिःक्कारून टाकण्याचें धैर्य या नेत्यांना त्या ऐतिहासिक क्षणीं कां दाखवितां आलें नाहीं ?

इथेंच नेत्यांच्या वैयक्तिक गुणावगुणांपेक्षां त्यांच्या मागच्या सामाजिक शक्तींचा मागोवा घेण्याची गरज भासूं लागते. कारण गांधी, नेहरू जसे फाळणीच्या भवितव्यतेला अगतिकपणें शरण गेले तसेच देशांतील इतर पक्ष, त्यांचे नेते व अनुयायी या सर्वांना फाळणी अमान्य असूनहि कोणींहि तिच्याविरुद्ध ब्र काढला नाहीं ही वस्तुस्थिति आहे. देशांत त्यावेळीं कम्युनिस्ट पक्षाची क्रांतिकारक संघटना होती; अखंड भारताचा उद्घोष करणाऱ्या हिंदुत्वनिष्ठ संघटनाहि चांगल्याच जोरावल्या होत्या. मग यांपैकीं कोणींहि फाळणीविरुद्ध आवाज उठवूं नये, आंदोलनें, सत्याग्रह, सशस्त्र प्रतिकार इत्यादि मार्गांनीं आपला विरोध व्यक्त करूं नये याचा अर्थ काय ? आमचे बेचाळीसचे क्रांतिवीर आणि प्रतिसरकारांचे संस्थापक त्यावेळीं कोठें होते ? काँग्रेस नेत्यांच्या अगतिक शरणागतीएवढीच काँग्रेसेतर संघटनांची ही अव्यवहारी निष्क्रीयताहि दोषास्पद नाहीं कां ?

तसें पाहिलें तर स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळीं आपल्या देशासमोर कांहीं जगावेगळीं भयंकर संकटें उभीं होतीं असें म्हणवत नाहीं. आफ्रिकेंतील नवस्वतंत्र राष्ट्रांना कोणत्या दिव्यांतून पार पडावें लागत आहे तें आपण आज पाहतच आहोंत. एवढासा चिमुकला अल्जेरिया ! जगाच्या इतिहासांत तोड नाहीं एवढा प्रखर व रक्तरंजित स्वातंत्र्यसंग्राम या शूर देशानें लढवला ! पण स्वतंत्र्यप्राप्तीच्या ऐन क्षणींच यादवीयुद्धाचें सावट त्यावर पसरलें गेलें आहे. इतकें कीं, आपला पहिलावहिला स्वातंत्र्योत्सवहि बिनघोरपणें या देशाच्या नागरिकांना साजरा करतां आला नाहीं. आठ दिवस साजरा होणारा विजयोत्सव दुसऱ्याच दिवशीं बंद ठेवावा लागला. आणि एकदां स्वातंत्र्य मिळाल्यावर पुढेंहि अशा तऱ्हेचीं संकटें देशासमोर येत नाहींत असें थोडेंच आहे ? शंभर वर्षे स्वातंत्र्याचा उपभोग घेणाऱ्या अमेरिकेसमोर १८६७ सालीं अंतर्गत यादवीचें अनिष्ट उभें राहिलेंच ना ? त्यावेळीं दक्षिणेकडील संस्थानांच्या बंडाळीला शरण जाऊन अमेरिकेची फाळणी करण्यांत आली असती तर आजची अमेरिका जगाला दिसली असती काय ? जो विवेक, जें धैर्य लिंकन दाखवूं शकला तें आमचे गांधी, नेहरू कां दाखवूं शकले नाहींत असा प्रश्न आहे. कायदेआझमांनीं पिस्तुल वापरण्याची धमकी दिली. प्रत्यक्षांत कलकत्त्याचें हत्याकांड पेटवून आपण काय करूं शकतों याचें प्रात्यक्षिकहि त्यांनीं काँग्रेसनेत्यांसमोर ठेवलें. पंजाबमधील परिस्थिती तर इतकी भयानक होती कीं, ती पाहून पंडितजी हतबुध्दच झाले व पंजाबची फाळणी मागण्याशिवाय त्यांना कांहीं पर्यायच सुचला नाहीं. एकदां पंजाबची फाळणी मागितल्यावर त्याच नात्यानें देशाची फाळणी त्यांच्या-काँग्रेसच्या-गळयांत बांधणें जिना-माउंटबॅटन यांना मुळींच जड गेलें नाहीं. एवढ्या घिसाडघाईनें व तडकाफडकीं हें चिरफाडीचें काम उरकण्यांत आलें कीं, साधा शिंपीदेखील एखादा सूट बेतून फाडतांना यापेक्षां अधिक काळजीपूर्वक हात चालवतो. सिमल्याच्या व्हाइसरीगल लॉजमध्यें व्हिस्कीचा एक जोरदार चषक ठोकून चार तासांत व्ही. पी. मेनन फाळणीची योजना कागदावर उतरवतात काय, माउंटबॅटन घाईघाईनें योजनेला नेहरूंची संमति घेतात काय आणि ॲटलीसाहेब अवघ्या पांच मिनिटांत तिच्यावर शिक्कामोर्तब चढवतात काय ? आकाशांतून भगवान् शंकराच्या मस्तकावर, तेथून हिमालयावर, तेथून सपाट भूप्रदेशांवर, तेथून अनेक मुखांनीं सागराकडे वहात जाणाऱ्या भगिरथीप्रमाणेंच आमच्या पूज्यस्थानीं असणाऱ्या या नेत्यांचा 'राष्ट्रीय अधःपात' टाळण्याची एकच संधि व वेळ ही होती. पेटलेल्या कलकत्त्याचें आणि धुमसणाऱ्या पंजाबचें आव्हान स्वीकारणें ! स्वातंत्र्य कोठेंहि जात नव्हतें. ब्रिटिश सरकार पेंचांत सांपडलें होतें. स्वातंत्र्य देण्याशिवाय त्यांना गत्यंतरच नव्हतें. ही परिस्थिति त्यावेळच्या सर्व मुत्सद्यांना पूर्णपणें समजलेली होती. हुकमाचें पान काँग्रेस नेत्यांच्या हातांत पडण्यास फार तर थोडा अवधि लागला असतां एवढेंच ! परंतु फाळणी आणि त्यामुळें घडून आलेल्या कत्तली निश्चित टाळतां आल्या असत्या. 'भारतानें अहिंसेनें स्वराज्य मिळविलें' या आत्मप्रौढीला सत्याचा थोडा तरी आधार मिळाला असता !

आणि फाळणी पत्करून कोणते प्रश्न सुटले ? कोणत्या समस्या

हातावेगळया केल्या ! काश्मीरच्या सीमेवर पाकिस्तानी आक्रमण थोपवून धरण्यासाठी देशाच्या तिजोरीतून रोज चार-पाच लाख रुपये खर्ची पडत आहेत. महाराष्ट्राच्या तृतीय पचवार्षिक योजनेला केंद्रीय सरकार जेवढी मदत करणार आहे त्यापेक्षा अधिक रकमेचा–पांचशे कोटी रुपयाचा भुर्दंड-आसाम पाकिस्तानांतून आलेल्या निर्वासितांसाठी भारताला सहन करावा लागला आहे. देशात मुस्लीम लीगचें भूत जिवत आहे तें आहेच. भारतातील कोटचवधि मुसलमानाचा भारताच्या निधर्मी राजवटीवर विश्वास नाही तो नाहीच. सिंधू नदीचें पाणी द्या, वर कोटचवधि रुपयाची दक्षिणा द्या; मगला घरणाखालीं गावें जाऊं द्यात, त्रिपुरात पन्नास हजार पाकिस्तान्याचे तळ पडू द्यात–आणि तरीहि फाळणीनें हिंदुमुसलमानाचा प्रश्न मिटला या समाधानात आम्हाला राहू द्या ! तेव्हा भेडसावणारे सर्व प्रश्न आजहि कायम आहेत ही गोष्ट कोणालाहि नाकारतां येत नाहीं. मग तेव्हाच हा सारा पुढचा विवेक पाहून फाळणी धि कारली का गेली नाही ? जें लिंकनला साधलें तें आम्हाला का साधू नये ! शीखाच्या स्वतंत्र भाषिक राज्याची मागणी फेटाळून लावतांना नुकतेच प. नेहरू गरजले, " देश यादवी युद्धाच्या खाईत लोटला गेला तरी चालेल. पण देशाचे यापुढें तुकडे मी होऊ देणार नाही· " हीच भाषा, पडीतजी, १५ वर्षांपूर्वी आपण उद्‌गारली असतीत तर ! तर साक्षात् नगाधिराज हिमालयालाहि आपल्या उत्तुग महिमानाचा हेवा करावासा वाटला असता !

पधरा वर्षांपूर्वी देशातील राष्ट्रवादी शक्ति कमजोर होत्या हेंच या ऐतिहासिक पराभवाचें मूळ सामाजिक कारण आहे. राष्ट्रवाद हे आधुनिक काळातील उदयोन्मुख भाडवलशाही अर्थव्यवस्थेचें सामाजिक तत्त्वज्ञान आहे. या तत्त्वाच्या यशासाठी जे सघर्ष खेळावे लागतात, त्यासाठीं जुन्या सरंजामशाही युगातील धार्मिक व जातीय निष्ठांना मागें टाकून शुद्ध राष्ट्रीय जाणीवा धारण करणारा नवा वर्गच समाजात प्रभावी व्हावा लागतो. हा औद्योगिक क्रातीमुळे पुढें आलेला, स्वदेशी कारखानदारीवर वाढलेला व पोसलेला नवा वर्गच प्रसंगविशेषी कणखर राष्ट्रीय नीति आचरू शकतो व जुन्या निष्ठाच्या उद्रेकांशी समोरासमोर सामना देण्यास समर्थ असतो. औद्योगिक क्रातीतून जन्मास आलेला समाजच राष्ट्रवाद समजू शकतो, पेलू शकतो, त्याच्या यशासाठी झगडूं शकतो. कारण त्या समाजाच्या भौतिक विकासआड जुन्या व धार्मिक व जातीय निष्ठा येत असल्यानें त्यातून बाहेर पडण्याकडे त्याची स्वाभाविक अतप्रवृत्तीच असते. लिंकनच्या मागें उत्तर अमेरिकेची औद्योगिक क्राति व त्यानुषगानें पुढे आलेला कारखानदारवर्ग व पाढरपेशा समाज उभा होता. म्हणूनच तो निग्रोंच्या गुलामगिरीवर जगणाऱ्या अमेरिकेतील दक्षिण सस्थानाच्या यादवीला तोंड देऊं शकला, तिचा बीमोड करून अमेरिकेंतील नवी औद्योगिक क्राति स्थिरावू शकला.

आमच्या गाधीं-नेहरूंच्या किंवा सरदाराच्या मागे कोण होते ? भ.डवलदार जरूर होते पण औद्योगिक क्राति नव्हती. खरी भाडवलशाही अर्थव्यवस्थाहि नव्हती. औद्योगिक क्राति घडून येण्यास देशांतील साधनसामुग्री गतिमान करणार कल्पक, धाडशी व कष्टाळू असा कारखानदारवर्ग पुढें यावा लागतो. भारत ही ब्रिटिशाची एक वसाहत असल्यानें येथें अशा प्रकारची स्वदेशी कारखानदारी वाढूच शकली नाही. कच्चा माल परदेशी पाठवून पक्क्या मालाची आयात करणारा व दोन्ही बाजूनीं नफा उकळून केवळ धनाची रास वाढविणारा एक पुजीपति मध्यस्थ दलालवर्गच येथें अस्तित्वांत येऊं शकला. यामुळें जुनी अर्थव्यवस्था कोलमडली हें खरे; पण नवी आली ती उपरी, अर्धवट व अंधानुकरणावर आधारित म्हणून दुबळी होती. तिच्याजवळ या भूमीची स्वयप्रेरणा नव्हती. त्यामुळें येथें पुजीपति निर्माण झाले, उद्योगपति अस्तित्वातच नव्हते. आर्थिक परिवर्तन झाले, क्राति येऊ शकली नाही.

आर्थिक क्राति दुबळी म्हणून त्याबरोबर येणारी मानसिक व सामाजिक क्रातीहि तशीच निःसत्व व उपरी औद्योगिक क्रातीबरोबर येणारे देशाभिमान, व्यवसायनिष्ठा, उद्योगप्रवणता, धडाडी, वैज्ञानिक दृष्टि, हक्काची व सामाजिक कर्तव्याची जाणीव हे मानसिक सदगुण येथें वाढीम लागूच शकले नाहीत येथें राष्ट्रवादाची भाषा होती पण ' राष्ट्रीय समाज ' येथे निर्माण होत नव्हता. त्यामुळें भाषा आणि कृति, निष्ठा आणि व्यवहार यात कुठेंच कुणाचा मेळ बसण्याची शक्यता नव्हती. आणीबाणीच्या प्रसंगी आमचे नेते विशुद्ध राष्ट्रीय भूमिकेवर आरूढ होऊन तत्वशुद्ध निर्णय देण्यास आणि कणखर कृति करण्यास असमर्थ ठरत होते, आणि जनताहि नेत्याच्या तत्त्वभ्रष्टतेबद्दल उदासीन होती. त्याना जाब विचारण्याएवढी जागृत नव्हती. केवळ काँग्रेस नेत्याच्याच बाबतीत हे घडत होते असे नाही. राष्ट्रनिष्ठेची जोपासना करणाऱ्या हिंदुत्वनिष्ठ संघटनाच्या कृतीत आणि उक्तीत तरी कुठें मेळ होता ! सामाजिक प्रवाहाशी निष्ठेचा सबध नसल्याने प्रवाहाला वळण देण्याची तिची शक्तीहि ऐनवेळी सुप्तच राहिली. तीच दशा आमच्या साम्यवाद्याची. चीनचा साम्यवादी हा प्रथम ' चीनी ' होता. रशियाचा साम्यवादी हा प्रथम ' रशियन ' होता. आमचा साम्यवादी प्रथम केवळ मार्क्स-लेनिनच्या भक्त होता. चागला साम्यवादी प्रथम चागला राष्ट्रवादी असतो. परतु येथें औद्योगिक क्राति, त्यातून निर्माण होणाऱ्या नव्या राष्ट्रीय जाणीवा या जाणीवा कामगारापर्यंत पोहोचविणारे वर्गलढे ही सर्वच नैसर्गिक वाढ खुरटलेली असल्यानें येथे ' भारतीय ' साम्यवादी पक्ष उभा होण्याऐवजी मॉस्को वा पेकिंगची एखादी शाखाच काम करीत असल्यासारखा सर्व प्रकार होता. रशिया महायुद्धात दाखल झाल्याबरोबर साम्राज्यशाही यद्धाचें लोकशाहीयुद्धात रूपावर होते या गोड ' बगाला ' ची एरव्ही सगतीच लावता येत नाही.

वैयक्तिक गुणदोष दिग्दर्शनाऐवजीं ही समाज कारणपरपरा ध्यानात घेतली गेली असती तर फाळणीच्या प्रमाणानतर तरी आम्ही सावध झालों असतो. गाधीजीची हत्या येथें घडली नसती आणि नवभारताच्या उभारणीला राष्ट्रीय जाणीवेचे भावनात्मक अधिष्ठान प्राप्त करून देण्याचा आम्ही प्रथमपासून प्रयत्न केला असता स्वतत्र झाल्यावर पधरा वर्षांनी आम्हाला ' राष्ट्रीय एकात्मता मडळ ' स्थापावे लागावें ही दुर्दैवाची गोष्ट आहे. मग पधरा वर्षे जे प्रकल्प रचले, योजना आखल्या त्यातून साधलें काय ? समाज राष्ट्रीय दृष्ट्या सघटित होण्याऐवजीं तो कमजोरच होत असेल तर उभारणी पायाशुद्ध नाही हें स्पष्ट आहे. उभारणी म्हणजे देश आपल्या पायावर, आपल्या साधनसामुग्रीच्या बळावर स्वयपूर्ण व स्वावलंबी करणे. या उलट आज आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात सर्वत्र उधारउसनवारीचा दिवाळखोर मामला सुरू आहे

विकास थोडा सावकाश चालेल, पण न पेलणारी व न पचणारी परकीय मदत घेऊन नवी आर्थिक गुलामगिरी पत्करणें धोक्याचें आहे. जुन्या परपरागत सस्कारकेंद्राना आवाहन करून नव्या काळाच्या प्रेरणा व विचार जनतेच्या अत करणामार्फत पोहोचविण्याचें प्रयत्न का होत नाहीत ? अराष्ट्रीय व असामाजिक प्रवृत्तीचा कणखरपणे बिमोड होत आहे का ! या दिशेने आमचे प्रयत्न झाले तरच निर्गुण ज्ञि. ज्जार जनतेतून सगुण, साकार असा 'राष्ट्रीय समाज' स्वाभाविकीला लावलं सित होईल. असा स्वाभाविक विकास हाच आजच्या विघटनेवरील व राजकीय दौबल्यावरील एकमेव तोडगा !

●●●

# मला दिसलेले लेखक



लेखक : दि. बा. मोकाशी.

५

एकेक लेखक समाजाची एकेक भूक भागवीत असतो. य. गो. जोशी यांनीं समाजाची भावनेची भूक भागवली.

आपलं मराठी मन कांहींसं कोरडंच आहे. कोरडेपणा सहन न होऊन जेव्हां एखादा कलावंत भावना दाखवूं लागतो तेव्हां सर्वांना जरा विचित्र वाटतं. भावनांचा उद्रेग मांडण्याची परंपरा नसल्यामुळें कलावंतालाहि भावनादर्शन करतांना तें जाणवतं. मग ' जसं मनांत आलं तसं मी लिहितों आहे, तंत्र वगैरे मला ठाऊक नाहीं ' असं अधून मधून तो सांगत राहतो.

जोशीबुवांचं तेंच झालं ' उतरेल ती भाषा ' हा त्यांनीं आग्रह धरला. या आग्रहामागें अहंकारापेक्षांहि आपली भावनाविवशता ते लपवीत होते. त्यांच्या भावनाप्रधानतेचा संपूर्ण प्रत्यय ' दुधाची घागर " या त्यांची आईच्या आठवणींत येतो. तसं तें
तसें पा त्र आहे. परिस्थितीशी झगड-
जगावेगळी शय तत्पर, तीक्ष्ण, कठोर, आणि
नवस्वतं त आलेल्या आईचं व्यक्तिचित्र त्यांनीं ज्या भावनाविवशतेनं रेखाटलं आहे. त्यांतच त्यांच्या भावनाविव्हल मनाची जाणीव होते. या मायलेकांचे स्वभाव अगदीं परस्पर विरुद्ध. त्यांच्यांत कित्येकदां मतभेद, अबोला, कठोर शब्द आले–गेले आहेत. आईनं जी परिस्थती अनुभवली तीच त्यांनींहि अनुभवली. पण जोशीबुवांचा जगाकडे पहाण्याचा ओलावा कधीं नाहींसा झाला नाहीं.

' दुधाची घागर ' या पुस्तकाची सांवली त्यांच्या सबंध वाङ्मयावर आहे किंवा त्यांच्या सर्व वाङ्मयाचं सार या पुस्तकांत आपणास पाहावयास मिळतं. कुटुंबांतील सर्वांनीं प्रेमानं रहावं, एकमेकांसाठीं आनंदानं त्याग करावा, एकमेकांचे अपराध पोटांत घालावेत हें त्यांनीं अनेक तऱ्हेनं सारखं आपल्या कथांतून सांगितलं आहे. आपल्याच कुटुंबाभोंवतीं ते सारखे फिरत राहिले आहेत. कुटुंबास येणारं दारिद्र्य, त्यांतून बाहेर येण्यास करावी लागणारी धडपड–मृत्यूचे घाले, एकमेकांविषयीं विटणारीं मनं, कुटुंबांतून चालणाऱ्या या नित्य घालमेलीकडे त्यांचें लक्ष केंद्रित असते. एखाद्यानं आपलीच गोष्ट सांगावी तशा त्यांच्या कथा सांगितलेल्या वाटतात. त्यामुळं त्यांत अतिशय जिव्हाळा येतो. ही अगदीं घडलेली कथा आहे असेंहि ते अधूनमधून सांगतात. आपण इतके हळवे होतों हें लोकांना कसं काय वाटेल याचं त्यांना आंतून भय वाटत असावं.

कुटुंबांतील जे संघर्ष जोशीबुवांनीं रंगवले त्या सर्वांत आर्थिक स्थितीनं येणाऱ्या संघर्षांचा पगडा मला त्यांच्यावर सर्वांत जास्त दिसतो. अशा संघर्षांच्या आधीन होण्याइतकं दुसरं कलावंताचं दुर्दैव नाहीं असं मला वाटतं. त्याचा सर्वच तोल त्यामुळं जातो. एकतर जोशीबुवांनीं केलाय त्याप्रमाणें पैसा ही महत्त्वाची गोष्ट नाहीं, हें तो सारखं पटवूं लागतो किंवा समाजवादाच्या आधीन होतो. जगांतले सर्व प्रश्न व त्यांचीं उत्तरें त्याला त्यांतच दिसूं लागतात. आर्थिक परिस्थिति, शिक्षण, सत्ता, कीर्ति इत्यादि सर्व माणसांच्या वरवरच्या हालचाली आहेत हे लेखक विसरतो.

या संघर्षांखालोखाल पति-पत्नी, सासू-सून, बाप-लेक, बहिण-भाऊ यांतील बेबनाव नि मिलाफ हे संघर्ष त्यांनीं मांडिले आहेत. या संघर्षांतील त्यांची भावनोत्कटता मराठींत दुसऱ्या कुणालाहि साधलेली नाहीं हें खरें असलें तरी त्यामुळेंच एक ढोबळपणा त्यांत आलेला आहे. त्यांच्या कथांतून नातीं असतात, प्रसंग असतात, पण व्यक्तिरेखा नसतात. आपल्या आईचें प्रभावी व्यक्तिमत्वहि त्यांनीं आपल्या भावनांत गुंडाळलें आहे. आपल्या कथांतील पात्रांना तें असेंच आपल्या भावनांत आवळून धरतात. त्यांचें व्यक्तिमत्व ठेवीत नाहींत.––

––उंचावर हौदांत ठेवलेलं पाणी जसं कारंज्याच्या असंख्य भोकांतून उसळतं तसं आपल्या भावना आपल्या पात्रांतून ते उसळवत असतात.

भावनाप्रधान माणसं हीं अतिशय ' हट्टी ' असतात. जोशीबुवाहि याला अपवाद नाहींत. ' लिहीन ती भाषा ' हा त्यांचा हट्टहि त्यांतलाच आहे. खरं पाहतां कुणाचीहि भाषा ही सहज आलेली नसते. अनुभव–वाचनाचे संस्कार, हे झालेलेच असतात. ते नकळत



# य. गो. जोशी.

श्री. दि. बा. मोकाशी 'मो' या टोपणनांवानें ही लेखमाला यापूर्वी लिहीत होते. ना. सी. फडके ● आचार्य अत्रे ● वि. स. खांडेकर ● चिं. वि. जोशी या साहित्यिकां-संबंधी श्री. मोकाशी यांनीं आपले विचार यापूर्वींच्या लेखांकांतून वाचकांसमोर ठेवलेले आहेत. श्री. य. गो. जोशी याच्यासंबंधीचा हा लेख प्रसिद्ध करून तूर्त आम्ही वाचकांचा कांहीं काळ निरोप घेत आहोंत.

असतील इतकेच. त्यामुळेंच जोशीबुवांच्या लिखाणांत मधूनच येणारीं तुटक वाक्यें—कांहीं जमत नाहीं बुवा वर्णन करणं असले शेरे, प्रश्नचिन्हांकित वाक्यें हें सर्व कांहीं-वेळां पोषक वाटलं तरी खटकतं. भावना अधिक प्रभावीपणं मांडतां येण्यासाठीं भाषेकडे त्यांनीं अधिक लक्ष पुरवायला हवें होतें असें वाटतें.—प्रतिभेच्या भराऱ्या त्यांच्या लिखाणांत अधूनमधून आहेत व तिथें भावनांची खोल अनुभूतीहि त्यांना देतां आली आहे. त्याचें एकच उदाहरण देतों—

भावाचा मुलगा देवाघरीं गेल्यावर ते लिहितात.

"आईवडिलांच्या समोरचा चहा तसाच राहिला. वडिलांनीं विडी पेटवली. त्या विडीच्या धुरानें एक-दोन क्षण धुराचें आकाश आमच्या घरांत तयार होऊ लागलें—

"—आणि बाहेर एवढे कोण विडी ओढीत बसले आहे कीं, ज्याच्या धुराचें आभाळ एकसारखें जगाच्या डोक्यावर काय-मचें तरंगत आहे ?"

असें वाक्य लिहून जाण्याची प्रतिभेची ताकद जोशीबुवांत आहे.

जोशीबुवांचा दुसरा हट्ट त्यांच्या मतांचा. सुखी संसाराचीं जीं गमकं त्यांनीं ठरवलीं आहेत तीं ते सतत मांडत असतात. किंबहुना त्याच दृष्टींतून आपल्या विषयांची निवड ते करतात. हीं मतं तें प्रभावीपणं मांडतातहि. पण त्या-बरोबर त्या मतांविरुद्ध जे वागतांना दिसतात त्यांच्याविषयीं थोडीशीहि सहानुभूति ते बाळगीत नाहींत. मग त्यांतून त्यांच्या ज्या कथा निर्माण होतात त्यांतला बोचकपणा, मर्मभेदीपणा, टिंगल ही सर्व त्यांच्या आधींच्या लिखाणाला शोभत नाहीं. जोशीबुवांनीं अशा कथा लिहिण्याचा मोह आंवरायला हवा होता असें वाटतें.

ती ती व्यक्ति तिच्या तिच्या परिस्थितीं-तून पहाणं जोशीबुवांना साधत नाहीं हाच त्याचा अर्थ, अगदीं पापी, दुष्ट माणूसहि या जगांतलाच असतो. किंबहुना जे वेगवेगळे स्वभाव आपणांस दिसतात ते स्वभाव म्हणजे त्या त्या व्यक्तीची आत्मिक दर्शनाची धडपड असते. दुष्ट, पापी, असें कांहीं नसतें. कला-वंतांनीं हें जाणणें आवश्यक आहे असें मला वाटतें.

जोशीबुवांच्या वाङ्मयांत मला असे गुण-दोष दिसतात. ते सर्व जमेस धरल्यावर मराठीं-तल्या इतर दोन करुणपर लिहिणाऱ्या लेखकांशीं त्यांची तुलना केल्यावांचून रहावत नाहीं. एक सानेगुरुजी व दुसरे खांडेकर.

सानेगुरुजींचं कारुण्य त्यांच्या लेखणींतून बाहेरच येत नाहीं. तें स्वतः गद्गदीत होतात. पण त्यांचें लिहिणं गद्गदत नाहीं. सारखे शब्दांवर शब्द ते टाकीत असतात. पण कारुण्य शब्दांनीं ठसत नसतं. तें प्रसंगांनीं ठसत असतं. उलट जोशीबुवा सांगतांना कमींत कमी शब्द टाकून प्रसंगांवर प्रसंग उभे कर-तात व परिणाम साधतात आणि प्रसंगांच्या ओढीनं त्यांच्या शब्दांतला त्रोटकपणाहि वाचक विसरतात.

खांडेकरांनाहि प्रसंगांतून सांगणं साधलेलं नाहीं. त्यांचे प्रसंग अगदीं कच्चे असतात आणि जो कांहीं फुलोरा ते करतात त्यांत कारुण्यापेक्षांहि शब्दप्रेम आणि स्वप्नाळू वृत्ति जास्त फुलते.

त्यामुळेंच जोशीबुवा मराठी वाङ्मयांत करुणरसाचा परिपोष करणारे एकच यशस्वी कथालेखक मला वाटतात. आणि वाङ्मयाला असलेलं एक मोठं खिंडार भरण्यात त्यांनीं मदत केली आहे.—मराठी वाङ्मयांतला कोरडा भूमिभाग मशागतीस घेऊन त्यांनीं एक मोठी उणीव भरून काढली आहे. आणि मराठी वाङ्मयाचें सौंदर्य वाढीला लावलं आहे यांत तिळमात्र संदेह नाहीं.

●●●

# ढग

प्रल्हाद वडेर

तळ्याचा एक पट्टा गर्द झाडींत खूप दूर खालच्या संबंध दरींत शीळ घालीत होता. मी बसलों होतों त्या टेकडीवर एक खूप मोठें चर्च होतें. आणि त्याचा क्रूस संध्याकाळच्या सरत्या उन्हांत चकाकत होता.

त्या थंड हवेच्या ठिकाणीं येऊन मला दोन–चार दिवस झाले होते. मोसम संपत आल्यानें गर्दी पांगली होती. उरले सुरले प्रवाशीहि बाडबिस्तरे बांधीत होते. त्या ठिकाणीं सगळ्या सुखसोयी होत्या. गांवांत रेसकोर्स होतें. सिनेमा थिएटरें होतीं, फळबाजार होता. आणि सुसज्ज लायब्ररीहि होती. निसर्गानें आपलें वैभव मुक्तहस्तानें भोंवताली उधळून दिलें होतें. त्यामुळें सगळीं दुःखें फिकट झालीं होतीं. आणि लोक तीं विसरण्यासाठींच तिथें आले होते. आयुष्यांत नसलेलें, न मिळालेलें असें कांहींसें मिळतें का याचा तीं जणुं आजूबाजूच्या जंगलांत शोध घेत होतीं. शहरांतलीं बंधनें झुगारून देत होतीं... मुक्तपणें वागत होतीं.

त्या छोट्याशा गांवांत अनेक सॅनिटोरियम्स होतीं. रेस्टॉरंट्स् होतीं. तळ्याकांठचें तें चर्च सुरेख होतें. आणि पाठीमागें बाग होती. त्या बागेंत एक कांचघर होतें. आणि त्यांत बाहेर न फुलणारीं अनेक शोभिवंत फुलें कृत्रिम ऊब आणि हवा देऊन फुलविण्यांत आलीं होतीं. रंगांचें आणि आकारांचे तें संमेलन मोठें विलक्षण होतें.

पण या सर्वांतून कांहींतरी कुठें तरी चुकत असल्याची एक सल मनांत येत होती. सगळीं सुखें हात जोडून पुढें उभीं होतीं. पण मीं गेल्या दोन-चार दिवसांत जें पाहिलें तें कांहीं फारसें अपेक्षित नव्हतें. डोंगराच्या पायथ्याशीं असलेल्या एका हॉटेलशेजारच्या पानवाल्याचे उद्गार मला राहून राहून आठवत होते. मीं जेव्हां त्याच्याजवळ त्यानें घेतलेल्या सिगरेटच्या जादा किंमतीबद्दल तक्रार केली होती, तेव्हां तो हंसून म्हणाला. "साहेब, हें जंगल आहे!"

मला आतांहि ते उद्गार आठवले. तिथल्या सगळ्याच वस्तूंवर आणि गोष्टींवर एक बाजारी झांक होती. कांहीं लोकांच्या सोयीसाठीं अनेक लोक उन्हांतान्हांत खपत होते. इकडून तिकडे धांवत होते. त्यांच्यापेक्षां कुत्रीं आणि मांजरें अधिक महत्त्वाचीं होतीं. सगळ्याला किंमत होती. पण मूल्य मात्र कशालाच नव्हतें!

तळ्यांत अतां कुणी नौकाविहार करीत होते. आणि आजूबाजूला कांठावर कांहीं लोक गळ टाकून बगळ्यासारखे निमूट बसले होते. न जाणों एखादा मासा निसटायचा!

आतां आकाशाचा रंग पालटत होता. निळेपणांत गर्द काळसर हिरवेपणा अलगद् मिसळत होता. पश्चिमेला ढगांची उतरंड रचण्याचें काम सुरू होतें आणि झाडांच्या पानांमधून गार वारा घोंघावूं लागला होता. जणूं पाऊस येणार असें वाटत होतें.

पावसाच्या विचारानें माझें अंग शहारलें. समोरच्या चर्चबाहेर माणसें जमायला सुरुवात झाली होती. त्यांचा कसला तरी धार्मिक समारंभ असावा. लोकांच्या हातांत मेणबत्त्या लुकलुकूं लागल्या होत्या नि पांढरे झगे घातलेले फादर आणि जोगिणी इकडून तिकडे धांवतांना दिसत होते. त्यांतचा लहान मुलांची धांदलहि सुरू होती. तीं सारींजणं कशाची तरी वाट पहात असावी असें वाटत होतें.

मी पुन्हा आठवणींत रंगलों. तिथल्या सुरेख थिएटरमध्यें हॉलिवुडचा एक उत्तान जंगलपट सुरू होता. त्याची जाहिरात किती बाजारीपणें केली जात होती. थिएटरच्या आवारांत नायिकेसारखी दिसणारी एक सुरेख पोरगी कृत्रिमपणें उभारलेल्या जंगलांत लोळत होती. आणि तिचे उत्तान भाव आपल्याहि डोळ्यांत सांठविण्याचा प्रयत्न करीत होती. तिला पाहण्यासाठींच गर्दी होत होती. आणि तिचें लक्ष नाहीं असें पाहून तिच्यावर खडे मारले जात होते. चित्रपट अर्थातच जोरांत सुरू होता...

लोक आपला भूतकाळ बाटलींत बंद करूनच जणुं तिथें आले होते. मी उतरलेल्या हॉटेलांत असेंच कांहींसें होत होतें. नुकतेच कॉलेजांतले कांहीं विद्यार्थी हॉटेलचें बिल बुडवून गेले होते. अनेकांच्या अनेक तक्रारी होत्या. सॅनिटोरियममध्यें जाणारे डबे मध्येंच उघडले जात होते. आणि हें सर्व कमी होतें म्हणूनच कीं काय नुकताच एका स्त्रीनें हॉटेलमधल्या स्विमिंग पुलमध्यें जीव दिला होता. त्यामुळें पोलिसांचा ससेमिरा हॉटेलला लागला होता.

त्या सुरेख गांवांत हें सगळें कांहींतरी विचित्र घडत होतें. निसर्गानें भोंवतालीं एवढें वैभव उधळून दिलें होतें. पण माणसें क्षुद्र गोष्टींतच वळवळत होतीं. या सगळ्या कटु आठवणींचा माझ्या मनांत मोठा ढीग झाला होता.

पण तोंच असें कांहीं वेगळें घडलें कीं, तो सगळा ढीग जणूं सोसाट्याच्या वाऱ्यानें रानोमाळ उडवून दिला. वाऱ्याची एक जोरदार लाट आली आणि झोंबली. त्या पाठोपाठ झाडें विलक्षण सळसळलीं आणि आकाश गरजलें.

मीं दचकून वर पाहिलें. तों आकाश काळे मिचकूट झालें होतें. कुठेंहि एखादा निळा

तुकडा दिसत नव्हता. सगळीकडे अंधारून आलें होतें. इतक्यांत पावसाचा पहिला थेंब माझ्या उजव्या कानावर सपकला. मी उठलों आणि चर्चच्या आसऱ्यासाठीं वेगानें चालूं लागलों.

चर्चबाहेर जमलेले लोक गटागटानें अजूनहि कशाची तरी वाट पहात होते. त्यांच्या हातात कागदाच्या द्रोणांत मेणबत्त्या होत्या. आणि त्याच्या प्रकाशानें एक मजेदार गूढ वातावरण त्या चर्चच्या आवारांत निर्माण झाले होतें.

तोच पुन्हां एकदां विजेचा आसूड कडाडला आणि ढगाची पाठ सोलून निघालीं. झाडें विलक्षण झोंकाड्या खाऊं लागली. घोळक्यांतल्या स्त्रिया त्याबरोबर घाबरल्या आणि मुल मोठ्यान रडू लागली. आपल्या चिमुकल्या बोटांनीं आईबापाना घट्ट धरून ठेवून मुसमुसू लागली.

त्याबरोबर साऱ्यानी गंभीरपणे प्रार्थना म्हणावयास सुरवात केली. त्यांच्या प्रार्थनेचा तो एकचएक स्वर पेटीच्या आवाजासारखा घुमू लागला. जोरानें घोंगावणाऱ्या वाऱ्याच्या आवाजांतहि तो स्पष्टपणें ऐकू येऊं लागला. लोकांनी हातांतल्या मेणबत्त्या पुन्हा पेटविल्या आणि त्याच्या ज्योती वाऱ्यात फडफडू लागल्या.

तोंच मुसळधार पाऊस रपरपूं लागला. टपोरे थेंब छपरावर तडतडू लागले. काहीक्षण वारा अगदीं कमी पडला. आणि मग केवळ पावसाचाच सथ आवाज कानांत भरून राहिला.

लोकांची एकच पांगापाग झाली. मिळेल तिथें त्यांनी आसरा घेतला. मीसुद्धा एका वळचणीखालीं आसरा घेतला. आता बहुतेक मेणबत्त्या विझल्या होत्या आणि पावसानें सगळें वातावरण सर्दावलें होतें. त्याचीच एक गुंगी सर्वांच्यावर चढली.

हळुहळू दिशा उजळल्या. पावसाचा आवाज थांबला. वेडीं झालेली झाडें पुन्हा ताळ्यावर येऊन सांवरलीं. आणि आकाशात पुन्हा तारका लुकलुकू लागल्या. हवेंत एक विलक्षण गारवा आला.

मी मग टेकडी उतरू लागलों. मघाचे सगळे उदास विचार आता जणू धूवून गेले. मनावर एक प्रकारचा प्रसन्नतेचा शिडकावा झाल्यासारखें वाटत होतें. मध्येच मी कुठेतरीं हॉटेलात शिरलों आणि वाफा येणारा गरम गरम चहा घेतला. आणि गावांतल्या लायब्ररीत शिरलों. आतल्या स्मोकिंग रूममधून हसण्याचा आवाज येत होता. एका कोपऱ्यात मात्र एका वृद्ध युरोपियन स्त्रीशिवाय कोणी नव्हतें. अगदीं आंखूड कापलेल्या तिच्या पांढऱ्या केसानीं तिच्या कपाळावर सुंदर महिरप केली होती आणि तिचा सारा चेहरा सुरकुत्यानीं भरून गेला होता. तिच्या समोर कसलें तरी एक लठ्ठ पुस्तक उघडें होतें आणि त्यातून ती आपल्या वहींत थरथरत्या हातानी टिपणें काढण्यात अगदीं गढून गेली होती. मी आत येतांच तिनें एकदम माझ्याकडे पाहिलें आणि ती निरागसपणें हसली. आणि पुन्हा टिपणे काढण्यांत मग्न झाली.

त्याच दिवशी रात्री मीं ते गाव सोडलें तरी किती वेळ तरी ती लायब्ररीत टिपणें काढणारी वृद्धा माझ्या डोळ्यासमोर तरळत होती. मग कुठून तरी ड्रायव्हर झोकांड्या खात आला आणि गाडी चालू झाली. तें किर्र जंगल झपाट्याने मागें पडू लागलें.

आणि तोंच पुन्हा काहीतरी विलक्षण घडले. आणि माझ्या मनांतल्या आठवणीचा ढीग परत एकदां उलथापालथा झाला. गाडींतली एक खालच्या जातीतली बाई आपल्या नवऱ्याला सारख्या शिव्या देऊं लागली आणि कंडक्टरच्या आईबापांचा उद्धार करू लागली!

●●●

# नाना अडणविसाच्या कथा.......

**: ३ :**

इंग्रजांच्या राजवटींत यापुढें राहावयाचें या दृष्टीनें नानानें इंग्रजीचा थोडाफार अभ्यास केला होता. त्याला सफाईदार बोलता येत नव्हते तरी त्याला बरेच इंग्रजी शब्द समजत असत. गुड्, बॅड, बिग्, स्मॉल, लेडी, लॉंग, शॉर्ट, जटलमन् वगैरे.

रॉबर्टसन नावाच्या इंग्लिश व्यापाऱ्याची व नानाची मैत्री होती. रॉबर्टसन नाना अडणविसाला किरकोळ कामें मैत्रीदाखल सांगे व त्याबद्दल किरकोळ मेहनतानाहि देत असे. एकदा व्यापारासंबंधी काहीं महत्वाची माहिती काढून आणल्यास, आपण तुला 'Big Reward—' मोठें बक्षिस देऊ ' असें त्यानें नानाला सांगितलें.

तें काम नानानें उरकलें. निदान १०० रुपये मिळावे असे नानाला अपेक्षित होतें, परतु अखेर त्याच्या हातावर फक्त वीस रुपये ठेवण्यात आले. व्यवहार आधीं आखलेला नसला की अशी शेपूट कापली जाते. पुढें काही दिवसानी रॉबर्टसननें नानाला विचित्र कामगिरी सांगितली. तो म्हणाला —

" नाना, माझ्या कुत्र्याची शेपूट भल्यामोठ्या प्रश्नचिन्हासारखी दिसते व ती त्याला शोभत नाहीं. तुमच्या ओळखीचा कुणी असल्यास ती लहान करून आणा— "

नाना कुत्र्याला घेऊन खाटकाकडे गेला आणि त्यानें त्याच्या कुत्र्याची शेंपूट सफाचाट कापून आणली. कुत्रा आता फारच विद्रूप दिसू लागला.

रॉबर्टसन साहेब तर फारच खवळला— तो रागाने नानाला म्हणाला —

" तुम्हांला शेंपूट लहान करायला सांगितली ती तुम्ही इतकी लहान कशाला केलीत ? He looks ugly "

नाना म्हणाला — " साहेब तुमचा Big (बिग) एवढा असतो की बिग् रिवॉर्ड म्हणून मला तुम्ही फक्त वीस रुपये दिले. या हिशोबानें तुमचा शॉर्ट फारच शॉर्ट असला पाहिजे असा माझा तर्क झाला. कुत्रा विद्रूप दिसला तरी श्रीमंताघरचा आहे. I look poor " साहेबानें नानाला आणखी साठ रुपये दिले.

●●

# आधुनिक अणुविज्ञान आणि गीतेंतील विश्वरूपदर्शन

दिवि सूर्यसहस्रस्य भवेद्युगपदुत्थिता । यदि भाः सदृशी सा स्याद्भासस्तस्य महात्मनः ।।

भगवद्‌गीतेच्या अकराव्या अध्यायांतील वरील श्लोकाची आठवण अण्वस्त्राच्या आधुनिक जनकाला व्हावी हें एक आश्चर्यच नाहीं कां ? आपल्या धर्मग्रंथाची उपेक्षा व हेटाळणी करणाऱ्या नवशिक्षितांना किंवा त्यांची निर्बुद्ध घोकंपट्टी चालू ठेवणाऱ्या सनातनी मार्तंडाना विचार करायला लावील अशीच ही घटना आहे.

१६ जुलै १९४५ म्हणजे बरोबर सतरा वर्षांपूर्वी अमेरिकेंतील मेक्सिकोमधील लॉस अलमॉस येथील रसायनशाळेंत तयार झालेलें पहिलें अण्वस्त्र अलमोगोरडोच्या वाळवंटांत उडवण्यांत आलें. पहाटें ५॥ चा सुमार असेल, शंभर फूट उंचीच्या मनोऱ्यावरून हें अस्त्र उडवण्यांत आलें. हें अस्त्र म्हणजे पहिला अणुस्फोट होता. दहा मैल अंतरावरून हा स्फोट पहाण्याकरतां अमेरिकेंतील अणुशास्त्रज्ञ आणि लष्करी अधिकारी जमा झालेले होते.

फ्रॅन्सिस फॅरेल या लष्करी अधिकाऱ्यानें लिहिलें आहे– "स्फोट झाल्यापासून तीस सेकंदानंतर हवेचा प्रचंड दाब आम्हांला जाणवला. आणि जवळजवळ पाठोपाठ प्रलयकारी भयानक आवाज कानांवर आदळूं लागला. आम्हांला असें वाटलें कीं, आजपर्यंत केवळ परमेश्वराधीन असलेल्या या शक्तीशी मानव प्राणघातक खेळ खेळत आहे–"

या अस्त्राचा निर्माता–ज्यानें लॉस अलमॉस रसायनशाळेंत या अस्त्राची निर्मिती केली–त्या रॉबर्ट ओपेनायर या जर्मन पदार्थविज्ञान शास्त्रज्ञाला मात्र या क्षणीं भगवद्‌गीतेंतील अकराव्या अध्यायातील वरील श्लोकाची आठवण झाली–

ओपेनायर याचा गीतेचा व्यासंग असल्यानें स्फोटाचा तो नेत्रदीपक उद्रेक पाहताक्षणीच त्यांना वरील श्लोकाचें स्मरण व्हावें हें सहाजिक होतें.

"If the radiance of a thousand suns were burst into sky that would be like the splendor of the Mighty One" या शब्दात त्यांनी गीतेच्या श्लोकाचें रूपांतर केलें आहे.

हजार सूर्यांच्या तेजाचा हा उल्लेख ज्ञानेश्वरीतहि आहे. आश्चर्य म्हणजे ज्ञानेश्वरीतील उल्लेख आधुनिक शास्त्रीय गणिताशी फारच मिळताजुळता आहे. 'एका अणुस्फोटामुळें दहा सूर्यांची शक्ति निर्माण होते' असें अणुशास्त्रज्ञ सांगतात तर 'जेव्हां एखाद्या स्वरूपाची ( element ) दृष्टि उघडते तेव्हां बारा सूर्यांचें तेज प्रकट होतें" असे ज्ञानेश्वरमहाराज वर्णन करतात. मूळ ओव्याच किती बहारीच्या आहेत पहा–

तिये अंगप्रभेचा देवा । नवलावो काइसयासारिखा सांगावा ।
कल्पांतीं एकुचि मेळावा । द्वादशादित्यांचा होय ।।
तैसे ते दिव्यसूर्य सहस्रेवरी । जरी उदयजति एकेची अवसरीं ।
तऱ्ही तया तेजाची थोरी । उपमूं न ये ।।

अर्थात् जडभौतिक सृष्टीचें आदितत्त्व अर्जुनाला दाखवावें हा कांही अकराव्या अध्यायात आलेल्या विश्वरूपदर्शनाचा प्रमुख हेतू नाही. गीतेमध्यें या अध्यायाचें अनन्यसाधारण महत्त्व आहे. तें वेगळयाच कारणासाठीं. यासंबधी एकच आधुनिक दाखला पुरेसा आहे. लो. टिळकानी आपलें 'गीतारहस्य' प्रसिद्ध झाल्यावर त्याची एक प्रत आपल्या गुरुस्थानीं असणारे महर्षि अण्णासाहेब पटवर्धन यांना नेऊन दिली. पुढें गीतारहस्यावर अनेक वादवादंगें माजली. परंतु अण्णासाहेबानीं याबाबत मौनच धारण केलें. परंतु एकदां निकटवर्तियांशी यासंबधीं विषय निघाला असतां ते सूचकपणें म्हणाले–" अरे, अकराव्या अध्यायाबद्दल त्यानें ( टिळकांनी ) काय लिहिलें आहे ? गीतेत अकराव्या अध्यायाचें काय महत्त्व आहे हें ज्याला कळलें, त्याला गीतारहस्य कळलें. त्याच्याखेरीज 'निष्काम कर्म' म्हणजें काय हें कळणार नाही व होणाराहि नाही. नुसतें 'निष्काम कर्म' 'निष्काम कर्म' म्हटलें म्हणजे झालें वाटतें ?"

भौतिक सृष्टीसंबंधीचें काही मौलिक ज्ञान गीतेंत असलें तरी तिचा मूळ उद्देश ईश्वरप्राप्ति हाच आहे ही गोष्ट यावरून स्पष्ट होते. अकराव्या अध्यायांत भगवंतानीं अर्जुनास नुसतें आपलें ऐश्वर्य दाखविलें नाहीं, केवळ जड द्रव्याचें पृथःक्करण त्याच्यासमोर ठेवलें नाही. तर "त्याला भगवत्संकल्पाचें ज्ञान करून दिलें' अशी महर्षींची विश्वरूप दर्शनाची मीमांसा होती.

विज्ञान आणि आत्मज्ञान या दोन्हीहि दृष्टीनीं गीतेचा अभ्यास आधुनिकानी करणें यासाठीच फार अगत्याचें आहे. कां पाश्चात्यांनीं याहि बाबतीत आघाडी मारल्यावर आम्ही जागे होणार ?

●●●

# बाजी

माधव आपटे

ओपन डेली आली होती. ' डेली ! डेली ! ' असं ओरडत चार-पांच पोरं गल्लीबोळांतनं उंदराप्रमाणें तुरूतुरू धांवत होतीं. जिवा येडूरकरनं एका पोराला थांबवून एक कपटा विकत घेतला. जुना एक पैसा व नवे दोन पैसे या किंमतीवर पोऱ्याशीं वाद घातला व नवे दोन पैसे देऊन माघार घेतली.

पैसे हातांत पडतांच पायाला भिंगरी बांधलेलं तें पोर पळालं.

स्पष्ट उजेडांत जिवानं कपटा खोलून पाहिला. आंकडा बसला नव्हता; म्हणून रागारागानं त्याचा चोळामोळा करून फेकून दिला. विचाराला चालना मिळण्यासाठीं त्यान खिशांतनं विडी काढून शिलगावली व तिचा एक दीर्घ झुरका घेतला. हातांतल्या जळत्या विडीचं एक चमत्कारिक वलय फिरवून तो जोरजोरानं चालूं लागला.

तो शिवाच्या दुकानाजवळ आला त्यावेळीं दुकानाच्या दोन फळचा बंद झालेल्या होत्या. बाहेरचं पायमशिनं आंत घेतलं होतं पण येडूरकर–त्याचे थोरले बंधू–कपडे रिपेरिंग स्पेशॅलिस्ट दुकानांत नव्हते, पण त्यांचे असिस्टंट आत्माजी वाघुलीकर रिपेरिंगसाठीं आलेल्या जुन्या कपडयांची वर्गवारी करीत होते. त्याला खूष करण्यासाठीं जिवा त्याला म्हणाला, " काय म्यानिजर-कसं काय चाललंय् ?"

आत्माजी आज खुषींत नसावा. तक्रारीच्या सुरांत तो म्हणाला, " हाय आपलं नेहमींसारखं–" एरवींप्रमाणें तो खूष असतां तर त्यानं ' झकास ' म्हणून उत्तर दिलं असतं. आपण केलेली मालकाची स्तुति त्याच्या कानांवर जावी म्हणून शिवाजीच्या निरनिराळ्या रिपेरिंग कामाची व जुन्याचें बिलकुल नवें करण्याच्या किमयेचीं वर्णनं ऐकवलीं असतीं. पण आज तो योग नव्हता.

जिवा आंतल्या मशिनमागच्या खुर्चीवर जाऊन बसला. तो ज्या गोष्टीसाठीं आला होता. त्याकडं वळावं म्हणून तो आत्माजीला म्हणाला, " आज......" आणि घुटमळला. आत्माजीनं त्याच्याकडे पाहून न पाहिल्यासारखं केलं. जिवानं मनाशीं कांहींतरी निश्चय केला. तो म्हणाला, "काय आज काम केवढयाचं झालं–?"

आत्माजी चिडला असावा. तो म्हणाला " होऊन उपेग काय ? रोजचा गल्ला चाळीस रुपय, खर्ची जाऊन तीस तर खरेंच, पण आमची हाजरी तेवढी–साडेचार रुपये ! वरं उरलेलं पैसं मालक तरी ठेवतात कां ? गांवाकडं पाठवून ती कुणाची धन होतें कुणास ठाऊक ! आतां अधनंमधनं तुम्हीं येतां, उचल घेऊन निघून जातां. मी कधीं नव्हं तें शंभर रुपयं मागितलं तर मालक नाहीं म्हणतात ! "

आत्माजीचा राग याचसाठीं होता. आत्माजीला शिवाचं गांवाकडं पैसे पाठवणं–तेंहि त्याच्या संशयास्पद चारित्र्य असलेल्या बायकोला पाठवणं–मान्य नव्हतं. जिवाला पैसे देणंहि त्याला मान्य नसावं. पण तो गोडबोल्या असल्यामुळें त्यानं आजवर त्याबद्दल कधीं नापसंती दर्शविली नव्हती. तसं पाहिलं तर गांवाला पैसे पाठवणं जिवालाहि मान्य नव्हतं. पण तो तसं कधीं बोलला नाहीं.

पैशाचं कसं काय जमवायचं याचा तो क्षणभर विचार करत राहिला. आपल्या वाढलेल्या दाढींतून त्यानं बोटं फिरवून ती करकरां खाजवली. इतक्यांत एक गिऱ्हाईक येऊन उभं राहिलं व त्यानं बिल विचारलं आत्माजीनं त्याला ' साडेतीन रुपयं ' सांगितले. जिवा पुढं झाला आणि त्यानं ते पैसे घेतले व तो चालायला लागणार एवढयांत आत्माजी म्हणाला, " तुमच्या दोस्ताचा कांहीं निरोप आलाय मालकाकडं. घटकाभरानं या आणि घेऊन जा. "

" बरं ! " म्हणून जीवा सटकला व समोरच्या हॉटेलांत शिरला. हॉटेलाबाहेर सळईवर भाजलेलं मटण होतं व त्याचा दर्प सर्वत्र दरवळला होता. दुकानांत दोन-तीनच गिऱ्हाईकं होतीं.

जिवानं आपला दोन्ही वेळचा खाना उरकला व विडी पेटवून तो विचार करूं लागला. ' सांगावा कुणाकडचा आला असावा बरं ? बादशहाकडचा तर नाहीं ? आपली बाजी लागेल काय ? एकदां कड लागली तर निकड भागेल.' बाकी बादशहाकडचं काम म्हणजे मिळाला तर पैसाच पैसा नाहींतर जान गायब असा प्रकार होता; पण अस्सल जुगाऱ्याप्रमाणं कशाचीहि बाजी लावणं त्याला अशक्य वाटत नव्हतं. त्याचाच विचार करत हळूंहळूं तो काउंटरकडे आला. त्याच्या

पुढच्या गिऱ्हाईकानं खोटी अधेली दिली, पण धुंद डोळयानं, दांत कोरणाऱ्या हॉटेल मालकाचं त्याकडं लक्ष नसावं. काऊंटरवर पडलेले पैसे प्रथम सपकन् हात मारून गल्ल्यांत ओढायचे व मग विचार करायचा ही त्या मालकाची पद्धत होती. त्यान परत दिलेलं नाणं मात्र काऊंटरवरच्या गुळगुळीत फरशीमुळं त्या गिऱ्हाईकाच्या चिमटींत सांपडत नव्हतं. जिवानं पुढं होऊन मालक ज्या पद्धतीनं गल्ल्याकडं पैसे ओढतो त्याच पद्धतीनं नाणं अलिकडे ओढलं; पण तें हातात सांपडलं नाहीं. खालीं फरशीवर पडल. गिऱ्हाईकानं तें उचलण्यापूर्वी जिवानं नाणं पाहिलं. 'कांटा कीं छाप ?' छाप वर आलेला होता. व तेवढचा लहानशा अवधींत जिवा छापच मनाशी धरून चीत चीत म्हणाला होता. एकूण त्याचे ग्रह उत्तम होते !

तो परत आला तेव्हां शिवाजी गल्ला मोजत होता. मोजतां मोजतां त्यानं रागानं जिवाकडं पाहिलं व जणूं नजरेनंच हातांतलं काम होईपर्यंत कांहीहि न बोलण्यास बजावलं. तो गप्प बसला. पण दरवाज्यावर आलेल्या भिकाऱ्यानं त्याला त्याचं दिवसभरातलं अत्यंत आवडतं काम एकाग्रतेन करूं दिलं नाहीं. 'गुरुवारचा दिवस आहे. कांहीतरी द्या गरीवाला!' भिकारी त्याच्या पायाला स्पर्श करून म्हणाला. शिवाजी अतिशय चिडला. "दररोज आठवडयांतला कांहीतरी वार असतोच ! आज गुरुवार, उद्यां जुम्मादिन, परवां शनिवार—काही मिळणार नाही जा, चालता हो ! " आणि असं म्हणून भिकाऱ्याच्या हाताला लागलेला पाय त्यानं हिसकून आंत घेतला. बाकी साडेचार फूट रुंदीच्या दुकानांत तो कितीसा आत येणार ?

पण जिवानं भिकाऱ्याच्या अंगावर एक नाणं टाकलं तेव्हां मात्र शिवाजीचा संतापअनावर झाला. तो रागानं थरथरत म्हणाला, "आतां तुमचा जुव्वा पुरे! बिलं पण खिशांत टाकायला लागलांत न विचारतां. मुकाट्यानं उरलेले पैसा टाका आणि चालायला लागा. आणि पुन्हा कधीं न आलांत तर वरं !"

"हें ऐकायला मी परतलों नाहीं. निरोप कुणाकडन काय आलाय तें सांगा ! "

शिवाजीनें साडेचार रुपये मोजून आत्माजीला दिले. आत्माजीच्या मनांत शंभर रुपयाचा विषय पुन्हां काढायचा होता. पण त्यानं एकूण वातावरण पाहून पुटपुटत पैसे खिशांत घातले.

"त्या बदमाशाचा—बादशाहाचा निरोप आलाय. भानगडी करा आणि हात, पाय, जान गमावून बसा...... "

पुढचं ऐकायला जिवा तिथं थांबला नाही. जातां जातां तो आत्माजीला म्हणाला, " मी देतो उद्यां शंभर रुपयं तुला."

तो विडयांचा 'स्टॉक' घेत होता त्यावेळी शिवाजी आत्माजीला सांगत होता, "वेडी आशा बाळगू नको. तो आला तर फार झालें. आतां साडेतीन रुपये मिळाले आहेत. म्हणजे आणखी दोन दिवसाची बेगमी आहे."

पण शिवाजीचं भविष्य खोटं ठरलं होतं. जिवा येडूरकर—त्याचा धाकटा भाऊ दुसरे दिवशीं सकाळी परतला होता. त्याचे डोळे तांबडेलाल होते. स्वारीनं घेतली असावी व रात्रभर जागरण व उद्योग केले असावेत. शिवाजीनं स्वत:साठीं मागवलेल्या नाष्टा चहाचा त्यान समाचार घेतला व पिंजारलेल्या केंसांतून हात फिरवीत 'झोंपणार आहे' म्हणून फर्मावलं दुकानच्या जुन्या फळकुटांच्या माळघावरच्या चिंध्या आत्माजीनं हलवल्या व वर जाण्यासाठीं स्टूल पुढं केलं. काहीहि बोलण्याची जिवाची तयारी नव्हती पण शिवाजीला उपदेश करण्याची लहर लागली. "अरे, चांगल रिपेरिंगच काम शिक. चागला रोजगार मिळेल. हे घंदे सोड आतां तरी."

जिवाला तें बिलकुल पटलं नाही. "अरे, मोठा 'खेला' तर आतां सुरूं झालाय. तुझी ठिगळं लावून आभाळाला ठिगळ थोडंच लागणार ? " आणि क्षणभर थांबून तो म्हणाला, "बरी आठवण झाली. आत्माजी हे घे तुला शंभर रुपयं" आणि असं म्हणून त्यानं खिशांतूनं नोटांचं भलं मोठं बंडल काढलं व शंभर रुपये बेदरकारपणें मोजून आत्माजीला दिले आणि म्हणाला, "जा, फायनलमध्यें काय आला तें बघून ये आणि रुपयाच्या फर्मास विडया आण."

आत्माजी परत येईपर्यंत त्यानं न मोजतांच बऱ्याचशा नोटा शिवाजीच्या अंगावर भिरकटल्या व तो म्हणाला, 'जा, याचीच ठिगळाठिगळी जोडून बंडी करून घाल... पांहिजे तर कफनी करून घाल."

आत्माजीनं आणलेलं विडी बंडल त्यानं हात उंचावून माळघावर ठेवलं. शिवाजीनं उदबत्त्या लावण्यासाठी ठेवलेली काडेपेटी त्याच्या शेजारी ठेवली, व फायनल आंकडा ऐकून तो म्हणाला, "च्यायला, ओपनमध्यें नाही, क्लोजमध्यें नाहीं पण फायनलमध्यें निकामी बसला. बुकीची धन झाली."

तो माळघावर शांतपणे झोंपला होता. खालच्या अनेक गडबडीची त्याला दाद नव्हती. अनेक गिऱ्हाईकं येऊन त्यांनीं आपल्या फाटक्या खिशाची, कॉलरची, उसवलेल्या पाठखांद्यांची किंवा पृष्ठभागांची दुरुस्ती आर्जवून करून नेली. दोन पायमशिनं भिंगरीसारखीं चाललीं. स्पेशल चहा दोन वेळां येऊन गेला. जेवणाची वेळ झाली. तेव्हा त्याला जाग आली. कदाचित् 'वधारे ऽ' ची बोंब ऐकू आल्यामुळें असेल. कुणीतरी गिऱ्हाईकं 'टर्फ कोल' ची गीता हातांत घेऊनच रिपेरिंगच्या सूचना देत होता व बरोबर आलेल्या इसमाबरोबर बोलत होता. "मागच्या वेळेला उशीर झाला. ट्रिबलचे दोन लेग बरोबर घेतले. तर लोक हे भाग होते 'सिंडीकेट मध्यें या' म्हणून. पण या पठ्ठ्यान ठरवलं, आज अर्धा ट्रिबल पूल एकटा घेणार आणि तुम्हीं अर्धा घ्या सिंडीकेटमध्यें. शेवटच्या यार्डापर्यंत घोडा नंबर तीन पुढं पण पाडयानं शॉर्ट नेकनं गळा कापला."

तो दुसरा त्याला म्हणाला, "अरे बाबा, त्याचं असच आहे, खेळावं तर घोडं न येऊन माखणी खेळूं नये तर गाढव पुढं काढून—

एवढ्यात शिवाजीनं त्याना रिपेर कपडयाच बंडल बांधून दिलं. जिवा खालीं उतरून जेवायला गेला. तिथं त्याला मोठा शेठ दिसला. त्याची गमत करावी म्हणून जिवा त्याला म्हणाला, "काय सेठ, घेणार काहीं कमी जास्त गरिबाचं ? "

शेठ त्याला म्हणाला—"अरे बाबा, परचुरन रुपिया दोन रुपियाचा काय धंदा करेल, खालीपिली डोक्याला त्रास. संबर दोनसे असलं तर बोल."

जिवानं शंभर रुपयाची नोट काढून त्याच्या हातावर टिकवली. व नोटेवरचे शेवटचे दोन आकडे दर्शविले. व शेठचं 'फायनलमंदी

( पान १४ वर चालू )




## झांकलेली मूठ

रमेश ललगूणकर

रिकाम्या हाताची
झांकलेली मूठ
रेषा लक्ष लक्ष
भविष्याचें कूट

शब्दांच्या अब्जांना
अर्थाचें ग ओझें
जन्मखूण तेथें
अपाप पाहिजे

अनुरक्त नादां
रूपाचें सांकडें
खोल अभ्यंतरीं
वेदनांचें कडें

रेषा लक्ष लक्ष
भविष्याचें कूट
अदृष्टाचें नातें
लाव त्याला तीट

आलिस, गेलीस
येत जा; जात जा
परंतु जातांना
आश्वासून जा, जा !

## ताठा

सुरेश भट

ताठ कॉलरींचा ताठा वांकणार आहे !
वंचनाच ज्याची त्याला गाडणार आहे !
मूठ मूठ हृदयें ज्यांचीं...तमूतसू दुःखें....
शून्य काय त्यांचें त्यांना गवसणार आहे ?
‘ तलम ’ माणसांनीं घ्याव्या कागदी भराऱ्या....
उद्यां वाळवी साऱ्यांना लागणार आहे !
खुराड्यांत रचती जे जे षंढ दंभगाथा....
कां तयास इंद्रायणि ही तारणार आहे ?
तशीं बरीं सोयीसाठीं साळसूद सत्यें !
( तसा कोण वीज उराशीं लावणार आहे ?)
जरी ‘ बीळबीळ ’ कराया पाहते मुजोरी,
उद्यां श्रेय ज्याचें त्याला लाभणार आहे !
गटारांत खुपसुन माना सूर्य शोधिती जे
गगन कां तयांचें मिंधें राहणार आहे ?
मठोमठीं मंबाजींना कीर्तनें करूं द्या !
विठू काय बेमानांना पावणार आहे ’

## गाथा

श्री

तुझी लागतां चाहूल
जरा हायसें वाटलें
तुज पाहतां समोरी
माझें मन झपाटलें
झपाटलें असें कांहीं
सांवरतां सांवरेना
अंकुरलें मनीं गीत
शब्द-रूपास येईना
शेवंतीच्या वेणीवर
चढे अबोलीचा रंग
आणि गात्रांगात्रांवर
उठे रोमांच तरंग
शब्दाविनाच फुलली
मग भावनेची गाथा
अशी बोलल्यावांचून
झाली भेटीची सांगता.

# हें फूल हातीं घे

: लेखक :

**प. त्रिं. सहस्रबुद्धे**

ये... उल्हसित मनानं, भवितव्याबद्दल विश्वास बाळगून, निःशंक मनानं प्रवेश कर...तुझ्या स्वागतासाठींच मी इथं उभा आहे...

या वेळीं इथलं वातावरण उत्साहानं किती भारावून गेलं आहे! वासंतिक बहरानं वृक्षराजी फळाफुलांनीं बहराव्या, तशा इथल्या सगळ्या वस्तु सुखमय स्वप्नांच्या मधुर फुलांनीं फुलल्या आहेत. सनईच्या मंद स्वरमाला शीतल वायुलहरींच्या हळुवार लाटांवर तरंगत तरंगत येत आहेत. प्रकाश किरणांचा झगझगाट अंधाराला दूर ढकलून भावी जीवनाचीं सुरम्य चित्रं रंगवित आहे. सकाळपासून भिक्षुकांनीं म्हटलेल्या मंत्र घोषांचे स्वर कानांत रेंगाळत आहेत. लाजा होमाच्या वेळीं दिलेल्या आहुत्या, त्यामुळें पसरलेला धूर अजूनहि समोर तरंगत असल्याचा भास होत आहे. तुझ्या बरोबरीच्या मुलींनीं चालवलेल्या थट्टाविनोदांचे पडसाद वातावरणांतला निरागस आनंद वाढवित आहेत...मंडप सकाळपासून शृंगारलेला आहे पण कां कोण जाणें, यावेळीं त्याची शोभा अधिक वाढल्यासारखी वाटते आहे कलाकारानें कुंचल्याचे हात पुन्हा पुन्हा फिरवून चित्राचं सौंदर्य वाढवावं त्याप्रमाणं रंगीबेरंगी दीपमालांचीं मंद कोमल किरणं भोंवतालच्या नेत्र-मोहक सौंदर्यांत वरचेवर भर घालीत आहेत...

वरात आतांच वाजतगाजत आली. लहान मुलं बालसुलभ आतुरतेनं मंडपांत घुसलीं. वयस्क मंडळी संथपणानं आंत येऊं लागली. नटवेपणाला संभाळीत पण अहंकाराला कुरवाळीत सुवासिनी आंत पाऊलें टाकीत आल्या...


आणि आतां तूं या घराच्या उंबऱ्याजवळ उभी आहेस. त्यावर ठेवलेलं तांदुळानं भरलेलं माप तुझे डोळे पहात आहेत. दृष्टि स्थिर भासली तरी मन मात्र संमिश्र भावनांनीं भरून गेल्याचं स्पष्ट दिसत आहे. जिव्हाळ्याच्या नातलगांचा निरोप घेतांना झालेलं दुःख अन् नव्या जीवनाच्या उंबरठ्यापलीकडील दिसणारं सुख यांची घनदाट छाया तुझ्या दृष्टीसमोर तरंगत आहे. सुकुमार सुगंधी कलिकांच्या टवटवीत मुंदावळींतून गांगरून गेलेली तुझी दृष्टि मात्र स्पष्ट दिसत आहे...आणि म्हणूनच मी तुला सामोरा येऊन स्वागतास सिद्ध झालों आहे. म्हणूनच मी तुला सांगतों आहे कीं...ये...आंत प्रवेश कर...आणि... स्वप्नसृष्टीच्या अथांग अवकाशांत मनसोक्त संचार करण्याची तयारी कर. सुख, समृद्धी अन् शांतता यांचा तृप्त मनानं उपभोग घ्यायची सुरुवात कर...

पण हें काय झालं? आनंदातिशयानं पुलकित होण्याऐवजीं तुझ्या डोळ्यांना पाणी कां आलं? ...समजलं... समजलं...आतां आपलं लग्न झालं. स्वतःचा संसार सुरूं झाला याच्या आनंदापेक्षां आपण सासरीं आलों याचं दुःखच तुला अधिक होत असावं. परंपरेनं सासर या शब्दाभोंवतीं हाल अपेष्टा अन् अपमान यांचीं कांटेरी वलयं निर्माण केलीं आहेत. तो शब्द ऐकल्याबरोबर छळणारी सासू, त्रास देणारा सासरा अन् क्षणोक्षणीं अपमान करणारी नणंद यांचीं चित्रं तरुण मुलींच्या मनांत उभीं राहतात. तसल्याच भीतीनं तुलाहि ग्रासलं आहे. आणि आनंदाच्या या आनंदक्षणीं दुःखाची तीव्र जाणीव तुला अस्वस्थ करीत आहे. अन् म्हणनच आंसवांनीं तुझे डोळे डबडबले आहेत...

कदाचित् अलंकारांचा अभाव तुला दुःख देत असेल! मध्यमवर्गीतला सामान्य कारकून

मी. मग माझा मुलगा तुझ्या गळयांत सुवर्णाचे अलंकार भरघोस कसे घालूं शकेल? महिन्याच्या पहिल्या तारखेला शेवटच्या तारखेकडे ढकलतांना किती यातना होतात ? किती निराशेचे चटके बसतात ? ते सहन करीत करीत चिमण्या बाळांची जोपासना करायची, त्यांना वाढवायचं, शिकवायचं अन् वयांत आल्यावर बोहोल्यावर उभं करायचं. हें नीटपणानं करतां करतां अवसान खचत जातं. उत्साह मावळूं लागतो अन् हातीं असलेले पैसे केव्हांच संपून जातात. मग माझ्या मुलाच्या लग्नांत अलंकार कुठचे मी विकत घेऊं ? तुझं लग्न ठरवतांना तुझ्या आईला मीं सांगितलं होतं— तुम्ही आम्हांला—मुलालादेखील कांहीं देऊं नका. मीहि तुमच्या मुलीला कांहीं देणार नाहीं. अलंकार न देऊन माझें म्हणणं मीं शब्दशः खरं केल्याचं पाहून कदाचित् तुला दुःख होत असेल नाहीं ? पण तुझ्या आईला त्याच वेळीं हेंहि सांगितलं होतं कीं, तुमची कन्या श्रीमंतींत लोळणार नाहीं, पण ती सुखी होईल... कारण मी तिला माझ्या मुलीप्रमाणेंच वागवीन. माझें शब्द ऐकतांना तुझ्या आईला गहिंवरून आलं होतं. आठवतं कां ? मग अलंकार न घातल्याबद्दल हे दुःखाश्रू कां ? माझ्या मुलाबरोबर संसार करतांना पैशाच्या राशी उधळायला मिळणार नाहींत. पण समाधानाच्या राशीवर बसून सुखी जीवनाचा उपभोग खासच घेतां येईल. सुवर्णालंकारांचं आर्थिक मूल्य कांहीं असेल पण एक मात्र खरं कीं, ते सुखाचे छेदकच आहेत, वर्धक नाहींत. म्हणूनच अलंकारांच्या आशा तूं बाळगणं चांगलं नाहीं. ते न मिळाल्यानं झालेलं दुःख नेत्रांवाटें पाझरूं देणं तर मुळींच इष्ट नाहीं...

शिवाय सोन्याच्या दागिन्यासाठीं तुझ्या मनांत उसळलेली आशा निराळ्या अर्थानं सफल झालीच आहे कीं ! माझा मुलगा म्हणजे अमूल्य असा दागिनाच नाहीं कां ? त्याला सर्वस्वीं तुझ्या स्वाधीन केल्यावर तुझ्या मनाला खंत कां वाटावी ? विवाहापूर्वीच्या चोरट्या नजरेनं त्याचे गुण नीट टिपून घेतले नसलेस तर आतां स्थिरतेनं त्याच्याकडे पाहा. तो फुलाहून नाजूक आहे तसाच दगडाहून कठीण आहे. येणाऱ्या संकटांना तोंड द्यायचं त्याला समजतं आहे, तसंच संकटांवर आघात करून त्यांचे तुकडे तुकडे करणंहि माहित आहे. मायेच्या हळुवार स्पर्शासाठीं तो भुकेला आहे. तसाच अपमान सहन करण्यापेक्षां सर्वस्वावर पाणी सोडण्याची धमकहि त्याच्याजवळ आहे. तारकांचं सौंदर्य त्याच्याजवळ आहे. विद्युल्लतेचं सामर्थ्यहि त्याच्यापाशीं आहे, पहिल्या पावसाचा अवखळपणा त्याच्याजवळ आहे. शेवटच्या पावसाच्या तृप्त-शांत धारांचें समाधान त्याला माहित आहे. अंधारांतहि प्रकाशकण शोधण्यासाठीं, दुःखांच्या सागरांत सुखाच्या मोत्यांनीं भरलेले शिंपले हुडकण्यासाठीं, फुलांच्या नाजूकपणाबरोबर त्यांतील मधुबिंदू हातीं लागावा म्हणून, तो जिवाचं रान केल्याशिवाय राहणार नाहीं... आतां सांग...इतका मोलाचा दागिना तुझ्या स्वाधीन केल्यावर अलंकारांचा अभाव तुला कां भासावा ? खूप अलंकार अंगावर घातले तर कदाचित् तरुण मुलींचा गळा भरून जाईल. पण माझ्या मुलासारखा अमोल एकमेव अलंकार तुझ्या साऱ्या भवितव्याला सुखाच्या शिखरावर चढवील याची कल्पना आहे कां ? म्हणून म्हणतो, हीं आंसवं पूस अन् या आनंद-अलंकाराकडे डोळे भरून पाहा...स्थिर दृष्टीनं पाहात राहा...जितकी पाहशील तितकं त्याचं मोल वाढेल. कारण तो अलंकारच तसा आहे...



छे...पण तो अलंकारहि नाहीं...तो म्हणजे माझ्या जीवनाचं विकसित झालेलं, मधुर गंधानं मोहित करणारं, टवटवीतपणानं पाहणाऱ्याला उल्हसित करणारं सुकुमार फूल आहे. हो...फूलच आहे! आपल्या अंगाखांद्यावर वाढलेलं फूल देवतांच्या चरणीं वाहण्यास दिलं जात असतांना वेलींना आनंद होतो. त्यांचं जीवन सत्कारणीं लागल्याचं समाधान लाभतं. हें तेजानं, गंधानं, अन् ताजेपणानं रसरसलेलं माझ्या जीवनाचं हें फूल तुझ्या स्वाधीन करतांना मला कितीतरी आनंद होतो आहे म्हणून सांगू ? याचा इतकीं वर्षं सांभाळ करतांना, त्याचा विकास करतांना, तें संपूर्ण फुलावं म्हणून धडपडतांना आम्हांला कितीतरी खस्ता खाव्या लागल्या. स्वतःच्या आशांना मुरड घालावी लागली. आकांक्षांना बंधनांत ठेवावं लागलं. त्याच्या बालसुलभ कोमल मनाला जीवनांतल्या उग्र समस्यांची झळ लागूं नये, त्याच्या टवटवीतपणाचा बहर संसारांतल्या चणचणीची जाणीव होऊन ओसरूं नये म्हणून आम्हांला क्षणोक्षणीं सावधपणानं वावरावं लागलं. त्याचा सूक्ष्मसा विकासहि माझ्या मनाला मोहित करी. त्याच्या निरर्थक बाललीलांतहि विशाल अर्थाचं दर्शन होई. त्याच्या बोबड्या बोलांतहि तीव्र प्रतिभेची भरारी आढळून येई... त्याच्या मनांत असमाधानाची सूक्ष्मशी लहरहि उत्पन्न होऊं नये म्हणून कांहींहि करायला आमच्या मनाची तयारी होई. त्याच्या तोंडावर दुःखाची अस्पष्टशी जरी छाया आढळली तरी माझ्या मनांत थरकांप होऊं लागे...हो इतक्या काळजीनं या फुलाची जोपासना आम्हीं केली म्हणून आज त्याचं रूपांतर एका टवटवीत फुलांत झालं आहे

प्रसन्नता, उत्साह अन् शालीनता यांचं मूर्त स्वरूप म्हणजेच हें माझ्या जीवनाचं फूल आहे. त्याच्याकडे जितकी पाहशील तितकी तूं प्रफुल्लित होशील...

अंतःकरण पिळवटून मी सारं सांगतों आहे. तरी तुझ्या नेत्रांचा ओलावा अजून ओसरला नाहीं. आपण सासरीं येतों आहों ही कल्पना अजून तुला भेडसावीत असेल कां ? पण ही

भीति मनांतून काढून टाक. या घरांत तूं प्रवेश करते आहेस ते रूढ अर्थाचं सासर नाहीं. तर तुझं हक्काचं घर आहे. इथं छळ, अपमान, उपासमार, टोंचून बोलणीं...यांना थारा नाहीं. इथं अन्यायाला जागा नाहीं. ढोंगीपणाला स्थान नाहीं. श्रीमंतीची धुंदी इथं नसेल पण तृप्तीची शांतता इथं भरपूर आहे. इथं कुणी सासू नाहीं... छे. जुन्या अर्थानं सासराहि नाहीं. तुझ्या वडिलांजवळ जितक्या जिव्हाळ्यानं तूं वागली असशील तशीच इथं वाग. आईजवळ जितक्या खेळकरपणानं वावरली असशील तशीच इथं राहा...म्हणजे माहेर अन् सासर यांतलं मनांत उत्पन्न झालेलं अंतर कमी होईल अन् हळूं हळूं सासरच माहेराप्रमाणं हवं हवंसं वाटूं लागेल...

पण हें एकाएकीं होणार नाहीं. तुलाहि त्यासाठीं तपश्चर्या करावी लागेल. हातांत कुणीं फूल आणून दिलं तरी त्याची जपणूक करावी लागते; म्हणजे तें सुगंध देत राहतं. नाहीं कां ? माझ्या जीवनाचं फूल मी तुझ्या हातीं देत आहे, त्याचाहि तूं अतीव प्रेमानं सांभाळ केला पाहिजेस. आज मी आहें. उद्यां कदाचित् या कंटकमय जीवनाचा मला त्याग करावा लागेल अन् हें नाजूक फूल वादळी झंझावातांत सांपडेल. त्यांत टिकाव धरण्यासाठीं त्याच्या ठिकाणीं भरपूर सामर्थ्य असायला हवं. तें उत्पन्न करणं आतां तुझं काम आहे. त्याच्या हातांत हात देतांना, त्याच्या सर्व जीवनाला तूं आधार देत आहेस हें तूं विसरूं नकोस. जोंपर्यंत तुमचे हात एकमेकांच्या हातांत आहेत तोंपर्यंत या जगांत कसलीहि भीति बाळगण्याचं कारण नाहीं. जीवनांतल्या चक्रीवादळांत त्याचा तोल जायला लागला तर तूं सावरलं पाहिजेस. त्यानंहि तुला सावरलं पाहिजे. म्हणजे संकटांचीं वादळं पराभूत होऊन पळ काढतील. पण एवढंच तुझं कर्तव्य आहे असं मात्र नाहीं...छे...छें...तुझ्याकडून कितीतरी अपेक्षा मी करतों आहे. लौकिक अर्थानं तूं माझ्या मुलाची पत्नी आहेस. दृष्टीनं मात्र तूं केवळ त्याची पत्नी नाहींस. मातेची वत्सलता, बहिणीचा खेळकरपणा, मैत्रिणीचा अवखळपणा, यांचं रम्य मिश्रण तुझ्या वागणुकींत आढळायला हवं. वेळ आली तर मातेच्या हळुवारपणाचा स्पर्श त्याला भासावा. बहिणीच्या थट्टाविनोदाच्या झालरीनं त्याचं मन चमकावं. मैत्रिणींच्या मोकळ्या अवखळपणानं त्याचं अंतःकरण खुलावं. त्याचं जीवन तुझ्या मोहक व्यक्तिमत्त्वानं भारलं जावं. त्यांत चैतन्य निर्माण व्हावं. दोन प्रवाह एकत्र आल्यावर दुप्पट जोरानं वाहूं लागतात. तुमचं एकत्र झालेलं जीवन असंच नव्या सामर्थ्यानं, प्रगतीच्या दिशेनं जात रहावं. यासाठीं तुला स्वतःच्या आशा-आकांक्षांना कदाचित् दुमडहि घालावी लागेल. पण एकदां तुमचं एकरूप जीवन झालं, समर्थ झालं अन् प्रवाही बनलं कीं...

याखेरीज सफल जीवनाचं आणखी कोणतं चित्र असूं शकेल ?...

तूं त्याचं जीवन फुलविण्याची पराकाष्ठा करशील या विश्वासानं त्याचा हात तुझ्या हातांत दिला आहे. संसारांतल्या कोणत्याहि क्षणीं विसरूं नको कीं, तुझा पति हा माझ्या जीवनाचं नवरम्य सुगंधी फूल आहे. अन् तें मी तुझ्या हातीं देत आहे...म्हणून वरात परत आल्यावर तुझ्या स्वागतासाठीं मी इथं मंडपाच्या दाराशीं उभा राहून तुला सांगत आहे कीं ये...हें फूल हातीं घे ! म्हणजे तुझं सारं जीवन सुगंधमय होईल...!

●●●



---

( बाजी--पान १० वरून चालू )

येऊन गेला' हें ऐकण्यासहि तो थांबला नाहीं. शेठलाहि शेअरची नव्यांत नवी 'वधघट' हवी होती म्हणून तो दुसरीकडं वळला.

तो जेवायला जाऊन येण्यापूर्वीच शिवाजीकडं बादशहाकडचा माणूस आला. भावानं काय भानगडी चालवल्या आहेत त्या कळाव्यात म्हणून त्यानं त्यालाच पांच-चार खुबीचे प्रश्न विचारले. त्याला एवढचं कळलं कीं, जिवावर सोंपवलेलं काम त्यानं बरोबर केलं नाहीं व पैसा मात्र पुरा घेतला. म्हणून शेठ गरम झालेला आहे व काम आज पुरं करायला सांगितलंय् !

जिवाला निरोप कळल्यावर तो थोडा अस्वस्थ झाला. पण जागरण जिरवण्यासाठीं त्यानं पार संध्याकाळपर्यंत आणखी एक लांब झोंप ताणली.


संध्याकाळीं तो केव्हां उतरून गेला तें शिवाजीला कळलंहि नाहीं. पण रात्रीं जेव्हां "तुम्हारे भाईको छुरी मारा, हॉस्पिटलमें चलो" म्हणून बोलावणं आलं तेव्हां तो पार घाबरून गेला. जिवावर त्याचा राग असला तरी प्रेमहि होतं.

हॉस्पिटलमध्यें तर तो जिवाची स्थिति पाहून ओक्साबोक्शी रडूं लागला. डॉक्टरनीं त्याला जिवा जगेल पण सुधारण्यासाठीं चार महिने लागतील असं सांगितलं व आत्माजीनंहि बरंच सांत्वन केलं.

बेशुद्ध जिवाच्या उशाशीं तो बसून होता. बादशहाचा निरोप घेऊन येणारे लोक जिवाला पहायला आल्यावर त्याला कमालीचा राग आला. त्यांतला एक जिवाला उद्देशून दुसऱ्याला म्हणाला, "सालेनें जानकी बाजी लगायी मगर विन नहीं प्लेस बैठी !" जिवानें रागानें तोंड फिरविलें आणि आदल्या रात्रींची हाणामार तो चवीनें आठवूं लागला.

●●●

# कविता



## सुख ठोठावतें दार !

माझें इवलालें घर
त्याची आगळीच आभा
शृंगारिता भिंती येई
इंद्र–उद्यानाची शोभा !

मातापित्यांच्या कुशींत
वाटे तुच्छ सुधारस
मोठ्या महाल–माड्यांची
नाहीं मज वेडी आंस !

इथे स्मित वदे अर्थ
शब्द घेई गोड गंध
पाणी पापणीमधलें
पुसे सगळा दुर्गंध !

मज वाटे अभिमान
माझ्या लाडक्या भावांचा
गोड संगतींत त्यांच्या
होई लाभ सौहार्दाचा !

माझी मनी आणि मोत्या
सांभाळती माझें घर,
तुळशीचें वृंदावन
घाली मायेची पांखर !

माझ्या इवल्या घरांत
नांदे समाधान फार
लक्ष लक्ष आरतीनें
सुख ठोठावतें दार !

यशवंत भिमाले

## तूंहि न घनानिळ

सर्वस्वाचें दान करूनि
धांवत आलें तुजपाठीं मी
जननिंदेला लाथ मारूनि
केवळ उरलें तुजसाठीं मी
दीपाक्षांनीं उजळित रात्री
विरह कंठिला तुझ्याच स्वप्नीं
कल्पकतेचे पंख लेउनी
तन-मन हरलें तुझ्याच गानीं
सप्तर्षि तूं मी अरुंधती
प्रीति–ध्रुव तूं मी ध्रुवमत्स्या
तूं माता मम पिता देवही
बंध एकची जीवनांत या
तुलाहि गमले मी रति, मदना,
मुग्ध चन्द्रिका शुक्र चांदणी
विसरुनि जाऊं जगताला या
वाटत होतें प्रेम–मीलनीं
हाय ! जाहली शापित परि रे
तृप्तीनें या प्रीत अ-वास्तव
तुला न उरलें स्वप्न–परी मी
तूंहि न घननिळ;–केवळ मानव !

रमेश वामन धोंगडे

## सांजवात

नयनांच्या दिपकांत
ज्योत कांचनाची जळे
माझ्या कांपऱ्या ओठांत
गीत सुगंधाचे खेळे
हृदयींच्या ताटव्यांत
धुंद मनाचा भ्रमर
कुंतलाच्या काळोखांत
तुझ्या श्वासांतून खेळे
माझ्या अंतरींचा श्वास
गोड स्मृतींच्या स्वप्नांत
रातराणीचा सुवास
कौमुदीचें तेज झरे
आकाशाच्या निलीम्यांत
तुझ्या प्रतिक्षेंत तेवे
मंद माझी सांजवात.

सुधाकर देशमुख

अंतोन आज जरा चिडला होता. त्याला कारणहि सबळ होत. एडवर्ड कॉलनींतील नाचाचं आमंत्रण आल्यापासून तर त्यांची विशेषच धांपळ उडाली होती. ऐन वेळेवर ल्यूसीनं—त्याच्या मैत्रिणीनं—नकार दिल्यामुळें त्याची निराशा झाली. तरी वेळ होतांच शोफरला गाडी बाहेर काढायला सांगितल्यावांचून त्याला राहवलं नाहीं. नाचायला जायचं म्हणजे कुणीतरी मैत्रिण आवश्यक होती, नाहीतर त्याच्या फजीतीस पारावार नव्हता. एडवर्ड कॉलनीत त्याच्या दूरच्या नात्यांतलीच एक मुलगी होती. पण तिच्याकडे जाऊन परत पार्टीला वेळेवर हजर राहण्याइतका भरपूर वेळहि नव्हता.

सुस्त पडलेल्या अजगरासारख्या त्या डांबरी रस्त्यावर गाडी भरधांव पळत होती. अष्टमीच स्वच्छ चांदण पडल होतं. दूरवर एक फेसाळलेला धवधवा टेकडीवरून आपल्या हंसऱ्या धारेनें उचावरून उडी घेत होता. मोटारगाडी एव्हांना वस्तीबाहेर आली होती. रस्त्याच्या दुतर्फा गर्द झाडी पसरली होती. रस्त्यावर चादण्याचे कवडसे पडले होते. आतां स्मशानाचा भाग दिसूं लागला. चद्राच्या नितळ प्रकाशात आसमंतातील वृक्षराजीची हालचाल निशाचराच्या हालचालीप्रमाणें भीषण वाटत होती. हिरव्यागार शालूवर काढलेल्या पाढऱ्या खडीप्रमाणे त्या हिरव्या मैदानावर इतस्ततः विखुलेली पांढरीं थडगी दिसत होती. शेकडों जीव त्यात चिरशातीचा अनुभव घेत पहुडले होते.

वळणावरच्या पुलापाशी वेग कमी करून स्टिअरिंग फिरविताना अतोनला पुलाच्या बाजूला एक तरुण स्त्री चद्रप्रकाशांत उभी असल्याचा भास झाला.

काहींतरी मनात येऊन अतोननें गाडी थांबवली. बाहेर येऊन झपाझप पावलें टाकीत तो तिच्यापाशी गेला. तिनें लव्हेंडर रंगाचा युरोपियन पेहराव चढविला होता. निश्चल जलाशयाप्रमाणे तिच्या चेहऱ्यावर कोणत्याच भावनेची लकेर दिसत नव्हती. वळणावरच्या पुलाला टेकून उभी असल्यामुळें कमरेच्या वरचा भाग समोर झुकला होता. आपल्या उन्नत उरोजांवर तिनें दोन्ही हाताची घडी लपेटली होती. वाऱ्याच्या मद झुळकेबरोबर तिचे भुरे केंस भुरभुरत होते. आपले पातळ, लिपस्टिकने रंगवलेले नाजुक ओठ विलग करीत ती कांहीतरी स्वतःशीच पुटपुटत होती.

एका सुदर स्त्रीला त्या स्मशानाच्या भयाण वातावरणांत पाहून एक विलक्षण कल्पना अतोनच्या मनात विजेसारखी चमकून गेली. लहानपणी त्याची आजी त्याला पिशाच्चांच्या गोष्टी सांगत असे. त्याचें अग शहारून केसन् केस ताठ उभा राहिला. तरी शेवटीं त्याने धीर करून विचारलेच, "गुड नाईट ! आपली हरकत नसेल तर मजबरोबर चलणार कां ? "

आपला लव्हेंडर रगाचा पायघोळ झगा सांवरीत ती उद्गारली, "छे, छे ! काहींच हरकत नाही, चलूया. "

शोफरनें गाडी सुरूं केली. थोडा वेळ अंतोन आणि ती एकमेकांकडे आळीपाळीनें पहात होती. अंतोनला प्रश्न पडला. आपल्या एका शब्दावरोबर, यत्किंचित्‌हि ओळखदेख नसतां ही मुलगी आपल्याबरोबर आली कशी ? ही कोण ? कुठें रहात असेल ? अपरात्रीं या भयाण जागेंत ही कशासाठीं उभी होती ? अंतोननें शेवटी न राहवून तिला विचारलें,

" तुमचें नाव काय ?"

आपल्या लव्हेंडर रंगाच्या फ्रॉकवरून नजर खेळवित ती म्हणाली "लव्हेंडर म्हटलंत तरी चालेल. आणि मला तुम्ही अहो— जाहो नका म्हणू. "

" छान आहे नाव ! तुझा आवडता रग दिसतो हा ! "

ती हंसून म्हणाली, "आपल्याला कुठं जायचंय् ? "

" एडवर्ड कॉलनीत ग्रीन पॅलेसमध्यें आज मला नाचाचं आमंत्रण आहे. माझी मैत्रिण येऊ शकली नाही. तुमची हरकत नसेल तर— तुम्ही—"

त्यालाच फक्त ऐकूं जाईल अशा बेतानें ती म्हणाली, " मी येईन पण तुमच्या मैत्रिणीची सर मला नसेल तर तुम्ही नाराज व्हाल नाहीं का ? "

त्यानें क्षणभर चाळवाचाळव केली. त्या प्रश्नानें तो किंचित् भांबवल्यासारखा झाला. हळूंच तिच्या हातावर हात ठेवीत त्यानें तिच्या प्रश्नाचें उत्तर दिलें.

कांहीतरी बोलायचं म्हणून ती उद्गारली, "आज आकाश ढगाळलेल दिसतंय्. पाऊस येतो की काय कोण जाणें !"

अतोन मोठेपणाचा आव आणीत म्हणाला, "माझ्या गाडीतून तुला पोहचवीन ना. अगदीं काळजी करूं नकोस. तुझ घर कुठं आहे ? "

" जिथं मी उभी होते नं त्याच पुलाजवळच्या झाडींत आमचं छोटंसं घर आहे. आमच्या घराभोंवतींची बाग तर पुलावरूनच दिसते. "

अंतोनने आणखी आपुलकीनें विचारलें, " तुझ्या घरीं कोण कोण असतं ?

ती गंभीर मुद्रेनं म्हणाली, "मी अन् माझी आई. "

स्वतःबद्दलच्या तिच्या या तुटक उत्तरामुळें तिला अधिक प्रश्न विचारणं अतोनला बरोबर वाटलं नाहीं. मनगटावरील घड्याळाकडे पहात तो उद्गारला, "आणखी दोन तासांनीं आपण परत येऊं. "

गाडी एडवर्ड कॉलनीत केव्हां घुसली हें दोघांनाहि कळलें नाहीं. एका हिरव्या बिल्डिंगपाशी गाडी थांबली. उतरताना लव्हेंडरला अंतोननें हात दिला.

बगलीसभोवतीं हिरवीगार बाग फुलली होती. चद्रप्रकाशांत बंगलीचा रग विशेष आल्हादकारक वाटत होता. बंगलीच्या पुढील बाल्कनीवर Green Palace अशीं सुबक अक्षरें कोरलेलीं होतीं. अतोननें दारावरचें बटन दाबलें. इतक्यांत एका वयस्कर गृहस्थानें त्यांना अभिवादन करून आंत नेलें.

रात्री बारानंतर ग्रीन पॅलेसमधील पार्टी व डान्सचा कार्यक्रम आटोपून अतोन व लव्हेंडर गाडीत बसली. गाडी स्टार्ट करून थोडा वेळ होत नाही तोच पावसाची चिन्हें दिसू लागलीं. अंधुक प्रकाशांतला झिमझिम पाऊस फारच लोभस दिसत होता. आकाशांतील तारकानीं रागोळी काढता काढता जणूं रांगोळीचें भाडें लवडले होतें. मोटारींत दोघहि थडीन कुडकुडत होती. गार वारा सुटला



# भेट

: लेखक :

**यशवंत पारखी**

होता. लव्हेंडर अंतोनला खेटून बसली होती. त्याच्या उबेंत आपली गोड ऊब मिसळत!

अंतोननें आपला उनी कोट काढून लव्हेंडरच्या अंगावर पांघरला. त्यांच्या हळूहळू इकडच्या तिकडच्या गप्पा सुरूं होत्या. इतक्यांत मोटर वळणावरच्या पुलाजवळ येऊन थांबली. लव्हेंडर इथंच उतरणार होती. अंतोन व लव्हेंडर दार उघडून बाहेर आलीं.

तिच्या गोऱ्यापान, लांबसडक बोटावर ओठ टेकवीत तो म्हणाला, "गुड नाईट डिअर!"

"ओ. के., गुड नाईट!" तिनें म्हटलें.

"थँक्स, ओ. के." तो गाडी स्टार्ट करीत उद्गारला.

लव्हेंडर जवळच्या झाडींत दिसेनाशी झाली. मोटारींत अंतोन व त्याचा ड्रायव्हर आपापल्या विचारांत गुंग होते. जरा वेळानंतर एकदम ड्रायव्हर अंतोनला म्हणाला, "छान आहे नाहीं कां ती?"

अंतोन त्याच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेनें पहात एका विलक्षण कैफांत हसला. जणूं तो ल्यूसीला विसरला होता. नाहींतरी त्यानें आपल्या हृदयांतील ल्यूसीची प्रतिमा दूर करून लव्हेंडरची नाजूक मूर्ति केव्हांच बसविली होती. फक्त त्याच्या मनांत येत होतं कीं, तिचं नांव लव्हेंडर खात्रीनं नाहीं, दुसरंच कांहीं तरी असलें पाहिजे. त्याच्या या विचारसमाधीचा भंग करीत ड्रायव्हर म्हणाला, "साहेब, ओव्हरकोट तिला बक्षीस दिला वाटतं?"

अंतोन स्वप्नांतून जागा झाल्याप्रमाणें गडबडीनें म्हणाला.

"अरे, विसरलोंच कीं; चल फिरव गाडी. ती येवढ्यांत झोंपली नसेल."

गाडी परत वळणावरच्या पुलावर आली. पाऊस आतांपर्यंत जरा थांबला होता. आकाश निवळलें होतें. तुरळक ढग इकडून तिकडे धांवत होते. त्यांच्या धांवपळींत चंद्र बाहेर पडायला कांकूं करीत असावा. तरी त्याचे किरण त्याला चुकवून ढगांच्या शिवाशिवीत सामील झालेच.

त्या विरळ प्रकाशांत लव्हेंडरनें उल्लेख केलेलें छोटेसें घर दिसलें. झपाझप चालत जाऊन अंतोननें दार ठोठावलें. थोड्याच वेळांत एक वृद्ध स्त्री बाहेर आली. घरांत

तेलाचा धुरकट दिवा मंदपणें जळत होता. लव्हेंडरची परिस्थिती जेमतेमच असावी असा त्याने मनात तर्क बांधला. म्हातारीचा चेहरा चितेनें ओढल्यासारखा दिसत होता. अतोनला पाहून ती म्हणाली,

" कोण आपण ? येवढ्या रात्री आमच्या घरी यायचं कारण काय ?"

अतोन म्हणाला " लव्हेंडर कुठं आहे ? माझा ओव्हरकोट तिच्याजवळ राहिला आहे. त्यासाठीं मी परत आलों "

क्षणभर म्हातारीच्या चेहऱ्यावरील विकार–चित्रांची अदलाबदल झाली. अंतोन व ड्रायव्हर यांना डोक्यापासून पायांपर्यंत न्याहळीत ती म्हणाली, " लव्हेंडर ? कोण लव्हेंडर ? हं, हं. लिली हांय ? माझ्या लिलीला लव्हेंडर रंग फार आवडायचा. तो पहा ना दाडीवर तिचा लेव्हेंडर रंगाचा फ्रॉक घडी करून ठेवला आहे. फार फार गोड होती माझी लिली ! आजूबाजूला, शाळेंत सर्वांची लाडकी. पण आतां काय त्याचें ? गेल्यावर्षीच ती मला सोडून गेली. कायमची." दारावर डोकें टेकवून ती हुंदके देत सांठलेल्या आठवणींना वाट करून देत होती. तिचें सुरकुत्या पडलेलें शरीर कापत होतें. आतां मात्र अंतोन व ड्रायव्हर फारच बुचकळ्यांत पडले.

लिलीच्या आईचा दु:खावेग ओसरल्यावर हळूच अतोन म्हणाला, " बाई, तुमची लिली हा लव्हेंडर रंगाचा फ्रॉक घालूनच माझ्यावरोबर आतां ग्रीन पॅलेसमध्यें नाचाला आली होती. इथच पुलापाशी ती उतरली. थंडी होती म्हणून मीच तिला माझा ओव्हरकोट पांघरायला दिला होता. पुलापाशीं सोडून जायच्या वेळीं कोट घेण्याच मी साफ विसरलों. या घराचा पत्ता तिनच सांगितला होता. आणि तुम्ही म्हणता ती मागच्या वर्षींच गेली म्हणून !"

म्हातारीला आश्चर्याचा धक्काच बसला. अतोन खोटं बोलत असेल असें तिला वाटेना. ती कळवळून म्हणाली, " अहो, माझी मुलगी मेली असं मी तुम्हाला खोट कसं सांगेन ? मी तिची आई आहे हें सगळ मला चमत्कारिक वाटतंय्. तुमची खात्री पटत नसेल तर ह्या समोरच्या पायवाटेनं जा अर्ध्या फर्लांगावर तिचं थडगं तुम्हांला दिसेल. ही गोष्ट खोटी ठरली असती तर माझ्यासारखी सुखी मीच झाली असतें. तुम्ही पाहूं शकतां तिचं थडगं."

अतोन व ड्रायव्हर दोघेहि बावरून गेले. सुन्न डोक्यानें म्हातारीनें सांगितलेल्या पाऊलवाटेने ते स्मशानात जाऊन पोहोचले. दोघांच्याहि मनात संशय,–भीति आणि काहींशी उत्सुकता थैमान घालीत होती.

लिली उर्फ लव्हेंडरचें थडगें हुडकून काढायला त्याना मुळीच वेळ लागला नाही. एका हिरव्यागार झाडाखाली तें चिमुकलं थडगें विसावलें होतें. आंत लिली चिरशांतीत पहुडली होती. त्यावर तिच्या नांवाचा कोरीव दगडहि बसविला होता.

आणि......आणि अंतोन आणि ड्रायव्हर दोघांचीहि नजर एकाच क्षणीं त्या थडग्याच्या मागील एका वस्तूवर खिळली. दोघांनीं एकमेकाकडें पाहिलें. अंतोनचा उनी कोट व्यवस्थित घडी करून थडग्याच्या मागील बाजूला ठेवला होता. ●●●

## साभार–पोंच

**विश्वमानव, श्री. मानवेंद्रनाथ रॉय**

लेखक : श्री. ना. ग. नाईक. सुषमा प्रकाशन संस्था, ३५ वल्लभदास तेजवाडी, घाटकोपर–मुंबई ७७, पृष्ठें ५६. किं. १ रु. २५ न. पै.

**भारतरत्न टंडनजी. व्यक्ति और कार्य**

लेखक : रंजन परमार. शैलजा प्रकाशन, ४१ बुधवार पेठ, पुणें २. पृष्ठें ९२ पाल किं. १ रु. ५० न. पै.

**जवानांचा जीवनधर्म**

लेखक : ना. ह. आपटे. प्रकाशिका : सौ. सरस्वतीबाई आपटे, आपटे आणि मंडळीकरितां कोरेगांव, ( जि. सातारा ) पृष्ठें १२८. किं. ३ रु.

**पाणी आणि शेवाळ**

लेखक : ना. ह. आपटे. प्रकाशिका : सौ. सरस्वतीबाई आपटे, आपटे आणि मंडळीकरितां, कोरेगाव ( जि. सातारा ) पृष्ठें १६०. किं. ३ रु. ५० न. पै.

**भागवत धर्म आणि ईश्वर साक्षात्कार**

लेखक व प्रकाशक : ह. भ. प. नामदेव फकिराजी गणगणे. मु. पो. शेगाव जि. बुलढाणा. ( महाराष्ट्र राज्य ). पृष्ठें १०२. किं. १ रु.

**कौटुंबिक हितगुज**

लेखक : श्री. वा. काळे. प्रकाशक : मु. शं. किर्लोस्कर, किर्लोस्कर प्रेस, स्वार गेट. पुणें २. पृष्ठें ११९. किं. ३ रु.

**इंद्रधनुचा पूल**

लेखिका : पिरोज आनंदकर. प्रकाशक : मु. शं. किर्लोस्कर, किर्लोस्कर प्रेस, स्वार गेट, पुणें २. पृष्ठें १२७. किं. ४ रु.

**हीं सात शल्यें मनीं**

लेखक : प्रा. ना. सी. फडके. प्रकाशक : मु. शं. किर्लोस्कर, किर्लोस्कर प्रेस, स्वार गेट, पुणें २. पृष्ठें २८. किं. १ रु.

# डॉ. गोखले यांचें डॉ. केतकर चरित्र

प्रा. भीमराव कुलकर्णी

मराठींतलें चरित्र वाङ्मय अनेक संकेतांना बळी पडलें आहे. 'हा तो अवघ्यांत श्रेष्ठ' या आपल्या परंपरेला तें जागलें आहे. समर्थन आणि गौरव या सहजसुलभ मानवी भावनांचे भक्कम स्तंभ या चरित्र-वाङ्मयाच्या पायाशीं असल्यामुळें वाङ्मय या दृष्टीनें स्वतःचें व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व क्षीण असल्याचें त्या वाङ्मयाला पदोपदीं जाणवलें आहे. हें चरित्र-वाङ्मय त्याच त्याच संकेतांना धरून वर्तुलगामी होत रहाण्याचे दिवस अद्यापहि संपले नाहींत आणि त्यांतच चरित्र-नायकासंबंधींच्या विवेचनांत औचित्य, अनौचित्य ह्या कांहीं भोंगळ कल्पना आपल्या मताच्या उराशीं अद्याप पक्क्या बसल्या आहेत. लौकिक व्यक्तित्व हें त्याच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग आहे. त्यामध्यें त्याच्या 'खाजगी' जीवनाचा प्रामुख्यानें अंतर्भाव होतो. आणि 'माणूस' बऱ्याच अर्थानें समजण्यासाठीं त्याचें 'खाजगी' जीवन कटाक्षानें न्याहाळावें लागतें. परंतु ही कल्पनाच कशीशी वाटण्याचे दिवस अद्यापहि संपलेले नाहींत. डॉ. गोखल्यांनीं लिहिलेल्या 'डॉ. केतकर' चरित्रांत ह्या संकेतापासून दूर जाण्याचा एक जाणीवपूर्वक निर्धार दिसत असल्यामुळें मराठी चरित्र-वाङ्मयांत एक विजयस्तंभ रोंवण्याचा मान त्यांनीं मिळविला आहे, हें सुरुवातीलाच स्पष्ट सांगून टाकण्यास हरकत नाहीं. केतकरांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल नाहीं म्हटलें तरी सुरुवातीपासून शेवटपर्यंत एक विशिष्ट कल्पना उराशीं बाळगूनच लेखक लिहित आहेत हें जरी खरें असलें, तरी 'सत्य' प्रतिपादनार्थ 'केतकर निरनिराळ्या वेळीं निरनिराळे' कसे होते हें पहाण्याचा अगदीं कसून प्रयत्न केला आहे.

## उपकारक गौरव-दोष

केतकरांसारख्या अफाट भावविवश परंतु प्रकांड बुद्धिमत्तेच्या जीवनाचें एक सलग असें चित्र उभें करणें अतिशय जिकीरीचें खरेंच; परंतु त्यांच्या जीवनांतील अनेकविध वावटळींतून हें चित्र इतक्या दक्षतेनें न्याहाळावें लागतें कीं, वावटळीच्या आणि वादळाच्या अनेक तडाख्यांत सांपडलेली त्यांची जीवननौका कधींकधीं दृष्टीच्या पलिकडची अगम्य आणि मागोवा काढण्यास अशक्य अशा प्रकारची ठरते. डॉ. गोखल्यांनीं एका तपाच्या चिकाटीच्या अभ्यासांतून सतत पाठलाग करावयाचें ठरविल्यामुळें बरेचसे सलग धागेदोरे त्यांच्या हातीं गवसले आहेत, परंतु त्यांच्या व्यक्तित्वाचें मूल्यमापन करण्यांत मात्र त्यांच्या प्रतिभेचे किरण असमर्थ ठरले आहेत. सबंध केतकर-चरित्रांत ज्या ज्या ठिकाणीं गोखले मूल्यमापन करूं पहातात, तेथें नाहीं म्हटलें तरी 'गौरव-दोषाला' ते बळी पडले आहेत. केतकरांचे दोष निर्भयपणें सांगणाऱ्या गोखल्यांची लेखणी त्यांच्या अनेकविध कार्याचें मोजमाप करतांना अनेक ठिकाणीं अडखळते, अनेक ठिकाणीं भावनाविवश होते. आणि 'अव्यक्त सत्य' अव्यक्तच राहतें असा पदोपदीं अनुभव येतो. फार मोठें उदाहरण म्हणून 'भटक्या राष्ट्रगुरु' या त्यांच्या प्रकरणाकडे बोट दाखवितां येईल. शीर्षकच मुळांत भडक आणि लेखकाचें 'आंधळें प्रेम' उघड करणारें आहे. १९१२ ते १९१५ या कालखंडांतील केतकरांचे विचार-प्रवाह अतिशय प्रगत व त्यांच्या तीव्र बुद्धिमत्तेचे निदर्शक आहेत. एक प्रकारच्या अति उत्साहाच्या भरांत संशोधनाच्या सहाय्यानें भराभर नवविचार प्रसृत करणारी त्यांची प्रज्ञा या काळांत विधायक कार्याच्या तळमळीनें देशभर संचार करीत होती, हें जितकें खरें आहे, तितकेंच त्यांच्या ह्या कालखंडातील विचार-मंथनाचें निरीक्षण केल्यास त्यांना राष्ट्रगुरु म्हणण्यांत लेखकाची 'उतावीळ' पल्लवित झालेली आहे हें लक्षांत येतें.

प्रतिज्ञा करूनहि न सुटलेला हा किंचित् 'गौरव-दोष' लेखकाला चिकटला आहे तो मात्र केतकर चरित्रांत उपकारकच ठरला आहे. कारण अगोदरच उपेक्षांनीं आणि गैरसमजांनीं (ह्या गैरसमजाला आणि उपेक्षेला केतकरच मोठे जबाबदार आहेत.) युक्त असलेल्या केतकरांच्या जीवनाची कर्तव्यकठोर चिरफाड कदाचित् अधिक अन्यायमूलक आणि तापदायक ठरली असती आणि चिपळूकर-आगरकरांच्याबद्दल कांहीं अति झालेल्या चिकित्सायुक्त आणि हेकट लिखाणांच्या जोडीला हें चरित्र बसवावें लागतें.

## संशोधनांतील उतावीळ

केतकरांचें हें चरित्र काळजीपूवक अभ्यासणाऱ्यास केतकरांच्याबद्दल कांहीं नवीन

पद्धतीनें विचार करावयास प्रवृत्त करील, आणि हेंच या चरित्राचें मोठें यश आहे. उदाहरणार्थ, संशोधनाचा प्रचंड आणि पद्धतशीर खटाटोप करणाऱ्या केतकरांच्या बऱ्याच लेखनास मान तुकवावी लागते ती त्यांच्या चट्कन निर्णय घेऊन बरेंच नवीन सुचविण्याचा पद्धतीमुळें. हें 'नवीन' बरेंचसें मुद्दाम ते आणीत असत आणि त्यामध्यें संशोधनापेक्षां तर्कटें लढविण्यांत आणि मोठमोठ्यांचा उपमर्द करण्यात ते अतिशय पटाईत होते. त्यामुळें त्यांचें संशोधनात्मक लेखन विद्वानांच्या उपेक्षेस व तुच्छतेस पात्र ठरलें. राजवाड्यांचें लेखन केतकरांस फार आवडत होतें. तें राजवाड्यांच्या याच गुणामुळें. या पाठीमागें केतकराच्या अमेरिकेतील वास्तव्याचा फार मोठा परिणाम असावा अशी एक कल्पना मनांत चमकून जाते. इग्रज सशोधनाची शिस्त अमेरिकन संशोधनाला अद्यापहि लाभली नाही आणि अमेरिकेची संशोधनाची बैठकहि पुष्कळशी सैल दिसते. केतकराच्या सशोधनाला शिस्त आणि बंदिस्तपणा लाभला असता आणि 'नामूलं लिख्यते किंचित्' ही दृष्टि त्यांनीं दिली असती तर केतकराची उपेक्षा खचित थांबली असती. केतकरांच्या या संशोधनांत एकाद्या महत्त्वाच्या विषयावर सखोल चिंतन करून, त्यावरून सावध व समाजपोषक निष्कर्ष काढण्यापेक्षां अभ्यासानें मनांत आलेलें चट्कन आणि तेंहि अफाटपणे बोलून दाखविण्याची एक अपरिमित हौस दिसते. त्यांचें जातिविषयक संशोधन अशा फार मोठ्या तडकाफडकी निर्णयाला बळी पडलें आहे. कलकत्यांतील दहा हजार स्त्रियांपैकी दहा हजार वेश्या आहेत किंवा व्यापारी वृत्तीच्या (विशेषतः गुजराथी, मारवाडी) लोकाची संतति क्वचितच त्यांची असते किंवा चित्पावनांनीं गोऱ्या कातडीच्या सारस्वत, प्रभूशीं लग्नें उरकावीत ही व यांसारखी हजारों अतिशय अविचारी विचाराची मुक्त हस्तानें उधळण करीत जाण्याचें त्याचें सशोधन फार मोठ्या दोषानीं युक्त असल्यामुळें त्याचें वाचन करणाऱ्यांना.

'फोलें पाखडतां तुम्ही '
निवडितो तें सत्त्व आम्ही निकें '

असें म्हणतच त्यांच्या प्रचंड कल्पनाशक्तीच्या व क्षणोक्षणीं धक्के देणाऱ्या विचारांचें दोहन करावें लागतें.

## केतकरांच्या कादंबऱ्या

केतकरांच्या कादंबऱ्यांविषयी गोखल्यांचें बरेचसें लेखन सदोष व अपुरें आहे. त्यामुळें त्यांच्या 'डॉ. केतकरांच्या कादंबऱ्या' या पुस्तकावर बरीच टीकाहि झाली आहे. डॉ. केतकरांनीं आपल्या सुरुवातीच्या कादंबऱ्या अमेरिकन पद्धतीनें लिहिलेल्या आहेत असा जो समर्थनार्थ मुद्दा 'विद्यासेवकां' तून टीकाकारांच्या तोंडावर फेंकला आहे. त्या आधारानें गोखले गेले असते तर त्याच्या कादंबरीलेखनाचें बरोबर मर्म त्यांच्या हाती आलें असतें. जातिविषयक सशोधनांतून त्याचे जे कांही ग्रह पक्के झाले होते त्याचा आडनावासह त्यांनीं हेतुपुर:स्सर उपयोग कादंबऱ्यातून केला आहे. केतकराच्या कादंबऱ्यातील आडनावें घेऊन हेतुपुर:स्सर कांही जातीबद्दलचे त्याचे ग्रह अभ्यासण्यासारखे आहेत. कोकणस्थाबद्दल एकहि टोमणा मारण्याची संधि न चुकविणारे शेजवलकरदेखील केतकरांबद्दल पुळका दाखवितात तो त्यानिमित्तानें पुणेरी कोकणस्थांवर सूड उगवावा म्हणून. खरोखर केतकरानी शेजवलकरांना चांगलेच चकविलें आहे, परंतु शेजवलकरांच्या तें लक्षांत आलेलें नाही.

केतकरांच्या कादंबऱ्यांचा विचार करतांना आणखी दोन महत्त्वाचे मुद्दे मुद्दाम सुचविण्यासारखे आहेत. केतकरांच्या कादंबरी-विश्वाची तुलना 'ऑगस्ट स्ट्रिंडबर्ग' या प्रसिद्ध पाश्चात्य नाटककाराशी करण्याचा मोह अनावर होतो. स्ट्रिंडबर्गनें स्वत:च्या अंवतीभोंवती घडणाऱ्या अनेक घटनांना, खुद्द आपल्या आत्मचरित्रालासुद्धां वाङ्मयीन घाट दिले आहेत. स्त्रीसबंधीं कमालीचा सशय, मत्सर व दीर्घद्वेष हे त्याचे कांहीं विशेष सोडले तर स्वत:च्या भोंवतीं रेशीम गुंडाळणाऱ्या एककल्ली किड्यासारखें त्याचें वाङ्मय-विश्व आहे. समाजशास्त्राच्या अभ्यासानें लक्षात आलेल्या उपेक्षित जीवनांतील काहीं भयंकर सत्यें उजेडात आणताना केतकर स्ट्रिंडबर्गप्रमाणे स्वत:चा जीवनकोशच उलगडीत आहेत, हें लक्षांत येईल.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा असा कीं, कादंबरीलेखनाच्या बाबतीत केतकरांनी आपल्या मूळ स्वभावाला मुरड घालण्याचा प्रयत्न केला आहे. कालिदास व प्राचीन महाराष्ट्राच्या संशोधनाबाबतीत प्रखर टीका होऊनहि त्यांतला एक शब्दहि न बदलणारे केतकर 'ब्राह्मणकन्या' कादंबरी लिहितांना ती कलात्मक व्हावी याची धडपड करतांना दिसतात व 'गांवसासू' मध्यें एकहि महाराष्ट्रीयन पात्र येऊं न देण्याची दक्षता घेतात. केतकरांच्या कादंबऱ्यांचें व त्यांच्या प्रचंड ज्ञानकोशाचेंहि असें निरनिराळ्या दृष्टिकोनांतून निरीक्षण करण्याची वेळ अजून संपलेली नाहीं, म्हणून 'यापुढें केतकरविषयक ग्रंथ-लेखनाचा निरोप घेण्याची' डॉ. गोखल्यांची मनीषा मनांत विषाद निर्माण करते.


## मानाचा मुजरा

या ग्रंथांत वापरलेल्या शुद्धलेखनाच्या पद्धतीनुसार देखील बरेंच लिहिण्यासारखें आहे. सर्व प्रकारच्या शास्त्रीय अनुस्वारांची हकालपट्टी करून मनसोक्त विचारांनीं लिहिलेलें हें पुस्तक वाचतांना महानुभावांच्या गांवांतून हिंडत असल्याचा भास होतो. जोंपर्यंत शुद्धलेखनासारख्या प्रश्नांत निश्चित एकवाक्यता होत नाहीं, तोंपर्यंत अशा प्रकारचें नियमांचे कितीहि समर्थन करतां येत असलें तरी स्वत:च्या मन:पूत नियमांनी लिहिणें धोकादायक आहे निदान दुसऱ्यांच्या लेखनांतील उतारे घेतांना ते भ्रष्ट न करण्याकडे तरी लक्ष दिलें पाहिजे. तसेंच जुन्या पद्धतीच्या असो, साऱख्या बंगरूळ शब्दपद्धतीचा त्याग करणेंहि गोखल्यांना कठिण गेलें नसतें. स्पष्ट लिहिण्याच्या निर्णयांत अजूनहि 'एन' आणि 'एम्' अशांसारख्या गुपितांचा त्याग करतां आला नाही. हें दुबळेंपण लवकरच नष्ट व्हावें अशी आशा आहे.


परीक्षणाच्या निमित्तानें केवळ दोष दिग्दर्शन करण्याच्या हेतूनें वरील विचार मांडलेले नसून त्या अनुषंगानें सुचलेल्या एक-दोन विचारांचें दिग्दर्शन करणे हा या पाठीमागें हेतु आहे.

मराठी चरित्र-वाङ्मयात मानाचा मुजरा द्यावा, या श्रेष्ठतेचें हे चरित्र आहे याची जाणीव मला आहे, एवढें सांगितलें म्हणजे पुरें.

●●●



# राजा शिवछत्रपति



भाग एक ते दहा

ब. मो. पुरंदरे

एक : जन्म आणि पूर्वस्थिती

दोन : स्वराज्याची प्रतिष्ठापना

तीन : अफजलखान-मोहीम

चार : सिद्दीजौहर-मोहीम

पांच : शाइस्तेखान आणि सुरत

सहा : मिर्झा राजे जयसिंह-मोहीम

सात : आग्रा : कैद आणि सुटका

आठ : सुराज्याची प्रतिष्ठापना

नऊ : राज्याभिषेक

दहा : दक्षिण दिग्विजय

मूल्य :: सोळा रुपये

राजहंस प्रकाशन : ४१९ नारायण पेठ, पुणें २.



लिओनार्ड मोस्ले यांच्या
**" The Last days of the British Raj "** या ग्रंथाचा

प्रदीर्घ परिचय.

+

रा. म. शास्त्री

प्रसिद्ध आंग्ल लेखक लिओनार्ड मोस्ले यांचें ' The last days of the Britise Raj ' ( इंग्रजी सत्तेचे शेवटचे दिवस ) हें पुस्तक चाळीत असतांना, एका पानावर नमूद केलेला खालील संवाद नजरेस पडला.

**म. गांधी** :—कॅबिनेट मिशनच्या मनांत जें आहे, प्रत्यक्ष आहे आणि जें आहे असें आम्हीं समजतों यांत कदाचित् तफावत असेल.

**लॉर्ड व्हॅवेल** :—ही वकिली मखलाशी आहे. कृपा करून मला समजेल असें बोला. मी साधा शिपाईगडी आहे. आणि तुमचें हे वकीली शब्दश्लेष मला समजत नाहींत.

**पं. नेहरू** :—आम्हीं वकिलीचा अभ्यास केलेला आहे हा कांहीं आमचा दोष नाहीं.

**लॉर्ड व्हॅवेल** :—खरं आहे, पण भारताच्या भवितव्यतेच्या आणि उत्कर्षाच्या दृष्टीनें निदान प्रामाणिक निःसंदिग्धतेने बोलाल कीं नाहीं ?........

**पं. नेहरू** :—दुसऱ्या शब्दांत सांगायचें म्हणजे मुस्लिम लीगच्या घातपाती कारवायांना आपण शरण जाऊं इच्छितां........

**लॉर्ड व्हॅवेल** :—( संतापानें ) माफ करा—याविषयीं (Blackmail) बोलणारे तुम्ही कोण ?



अपयशी व्हॉइसरॉय
लॉर्ड वेव्हेल

# स्वातंत्र्य केव्हां मिळालें

वरील संवाद वाचूं लागतांच या संपूर्ण पुस्तकाविषयीं कुणाच्या हि मनांत विलक्षण कुतुहल जागृत झालें असतें. १९४२ ते १९४८ या काळांत घडलेलें रामायण ज्यांनीं पाहिलें, वाचलें आहे, अशा माणसानें तर हें पुस्तक वाचलेंच पाहिजे. या कालखंडाविषयीं आर्. पी. मसानी यांनीं आपल्या The British in India या पुस्तकांत म्हटलें आहे—

" ब्रिटिश सत्तेच्या भारतांतील शेवटच्या दिवसांचा जो इतिहास तूर्त प्रसिद्ध आहे त्यांत अनेक प्रश्नांचीं उत्तरेंच मिळत नाहींत. लॉर्ड वॅव्हेल यांनीं भांडणाऱ्या दोन बलाढ्य राजकीय संस्थांना एकत्र आणण्याचे काय प्रयत्न केले ? श्री. अॅटली यांना एकाएकीं माऊंट बॅटनना व्हाइसरॉय म्हणून भारतांत कां पाठवावें लागलें ? सुखासमाधानानें भारताची फाळणी कां होऊं शकलीं नाहीं ? भयानक हत्याकांडें टाळण्याकरतां पुरेशी खबरदारी कां घेतली गेली नाहीं ? या सर्वांचीं उत्तरें कुणींतरी निःपक्षपातीपणानें द्यायला हवींत—"

श्री. मोस्ले यांनीं प्रस्तावनेंत म्हटलें आहे कीं, त्यांच्या पुस्तकाचा हेतू वरील प्रश्नांचीं उत्तरें शोधण्याचा आहे. ते लिहितात—

" जवळ जवळ तीन वर्षांच्या भारतांतील, पाकिस्तानांतील आणि इंग्लंडमधील संशोधनाचें प्रस्तुत पुस्तक हें फल आहे. जी माहिती कुणाहि इतिहासकाराला यापूर्वी उपलब्ध करण्यांत आली नव्हती—ती मला उपलब्ध होऊं शकली. १९९९ पर्यंत सत्तादानासंबंधींचे सरकारी कागदपत्र प्रसिद्ध होणार नाहींत. परंतु १९५९ ते १९९९ या मध्यंतरीच्या काळांत कां होईना अनेक अनुत्तरींत प्रश्नावर हें पुस्तक प्रकाश टाकील. "

लेखकानें सर्व उपलब्ध कागदपत्र, खासगी पत्रें हीं तर चाळलींच

परंतु त्यानें या संबधांत पंडित नेहरू, अयूबखान, माऊंटबॅटन, लॉर्ड इस्मे, इव्हन जेकिन्स, चौधरी महंमद अल्ली, व्ही. पी. मेनन, रॅडक्लिफ, बेगम लियाकत अल्ली, कनु मुनशी, जनरल थिमय्या, तारासिंग, कॅम्बेल जॉनसन् राजगोपालचारी, या आणि अशा असंख्य हयात व्यक्तींशी या पुस्तकांतील खरे-खोटेंपणाविषयी बोलणेंहि केलें. एवढ्या प्रयासानंतर लिहिलें गेलेलें हें पुस्तक अत्यंत महत्त्वपूर्ण झालें नसतें तरच नवल !

हें पुस्तक म्हणजे फाळणीच्या काळाचा अद्यावत् इतिहासच आहे. या पुस्तकाची ओळख अगदी थोडक्यात करून द्यायची म्हटली तरी बरीच पाने खर्ची पडणार आहेत. कारण यातील प्रत्येक पान आणि पानावरील ओळन् ओळ महत्त्वाची असून काय गाळावें आणि वाचकांसाठीं काय उधृत करावें हें ठरवणें कठीण झालें आहे.

## कलकत्त्याचें हत्याकांड

या पुस्तकाची सुरवात लेखकाने कलकत्त्याच्या हत्याकांडापासून केली आहे. या हत्याकांडाचें तसेच महत्त्व फाळणीच्या इतिहासांत आहे. १६ ऑगस्ट १९४६ ला पेटलेल्या आणि नतर सतत तीन दिवस धुमसलेल्या या जातीय दगलीच्या कुंडांत कमींत कमी ६००० लोकांना भोसकून, जाळून व कत्तल करून यमसदनास धाडण्यात आलें आणि सुमारें २०००० स्त्रियामुलावर पाशवी अत्याचार करण्यांत आले. १९४३ च्या बंगालच्या दुष्काळांत सुमारें तीन लाख लोक मृत्यु पावले आणि त्यामानानें हा आकडा लहान वाटला तरी हें हत्याकाड इतिहासांत कुणाला डावलता येणार नाही.

या तीन दिवसात फक्त कलकत्ता बेचिराख झालें नाही, फक्त निरपराधांचीच हत्या झाली असें नाही. तर त्यांनीं भारताच्या अखंडत्वाच्या सगळ्या आशा जाळून टाकल्या. भारताचा नकाशा या हत्याकांडानें फाटला, आणि इतिहासाचा ओघ पालटून टाकला. माणसांचीं, स्त्रियांची आणि अर्भकांची प्रेतें याचीच केवळ गिधाडांनीं चिरफाड केली नाहीं तर भारताच्या एकतेचीहि या गिधाडानीं चिरफाड केली.

वस्तुत: १९४६ सालाइतका भारत स्वातंत्र्याच्या जवळ कधीच पोंचलेला नव्हता. या वेळेची भारताची स्थिति श्री. मोस्ले यानी अचूक टिपलेली आहे–

" १९४५ सालीं महायुद्ध सपलें. त्याच क्षणापासून सर्वांनाच याची खात्री पटली होती की, अत्यत थोड्या कालातच भारताला स्वातंत्र्य मिळणार. स्वतंत्र जनतेचे कैवारी म्हणून आपण लढाई लढलों. या ब्रिटिश राजसत्तेच्या घोषणेचा पर्याय एकच होता की, भारताला स्वातंत्र्य देणें ! युद्धाला कटाळलेले ब्रिटिश सैनिक घरी जाण्यास उत्सुक होते. जय झाला असला तरी ब्रिटिशाच्या आशियातील सत्तेला भयानक हादरा बसला होता.

" युद्धाच्या अखेरीस भारताची राजकीय एकता कायम राहिलेली असली तरी त्यातील ३५ कोटी जनता ही दुभंगलेली होती. कॉंग्रेस ही सस्था प्रबळ झालेली होती. भारतातील सर्व जमातीच्या वतीनें आपण बोलतों असा तिचा दावा होता. कॉंग्रेसचा अध्यक्ष मुसलमान असला तरी सस्थेंत वर्चस्व हिंदूंचें होतें.

" मुस्लीम लीगनें उघडउघड आपण फक्त मुसलमानांच्याच हितसबंधाची काळजी करणार ही भूमिका घेतलेली होती. ९ कोटी मुसलमानांची आपण प्रतिनिधि असल्याचा तिचा दावा होता.

" जवळजवळ ९० टक्के मुसलमानांचा मुस्लीम लीगला पाठिंबा होता. जिनांचें वर्चस्व सर्वत्र अबाधित झालेलें होतें.

" कॉंग्रेसप्रमाणेच मुस्लीम लीगलाहि स्वातंत्र्य हवें होतें. परंतु कॉंग्रेस राजसत्तेला फक्त 'चालते व्हा' (Quit India) सांगत होती. उलट 'फाळणी करा आणि चालते व्हा' असा जिनांचा मुसलमानाच्या वतीनें कमुखी आग्रह होता.

**" जिनांची पाकिस्तानची मागणी हा एक पोरखेळ आहे अशा घमेंडींत आझाद, गांधी, नेहरू, पटेल आदि नेते वावरत होते.** जवळ जवळ सर्व हिंदी मुसलमान आणि स्वत: जीना हे पूर्वाश्रमींचे हिंदूच असल्यामुळें स्वतत्र राष्ट्राचा त्याचा दावा मान्य होऊं शकत नाही; असे नेहरू सांगत असत. या उलट हिंदूंच्या छळाखालीं मुसलमानांना डांबण्याचें कॉंग्रेसचें कारस्थान आम्ही हाणून पाडूं अशा गर्जना जीना अधूनमधून करीत असत. "

## गोऱ्यांचे मुसलमान लाडके

वरीलप्रमाणें भारताची स्थिति सांगितल्यावर मोस्ले यांनीं ब्रिटिशांना मुसलमान अधिक जवळचें वाटत हें सत्य सागून टाकलें आहे. ते लिहितात–

" सर्व इग्रजी अधिकाऱ्यांना मुसलमान अधिक जवळचे वाटत. वागायला मुसलमान अधिक चांगला. मुसलमान कमी उद्धट आणि अधिक इमानी. याउलट परकीय गोऱ्या माणसानें घरांत पाऊल टाकलें तर घर अशुद्ध झालें या पराकोटीची हिंदु माणसाच्या ठिकाणीं द्वेषबुद्धि, युरोपियन लोक अस्वच्छ असतात हा त्यांचा कायम समज आणि ब्रिटिशाचा राज्यकर्ते म्हणून द्वेष करण्यात हिंदु माणसाला अभिमान वाटे–"

वरील समजाला पोषक अशाच घटना युद्धकालात घडत गेल्या. युद्धांत सहभागी होण्यास कॉंग्रेसनें नकार दिला. सुरुवातीला कॉंग्रेसची भूमिका देशभक्तीची होती. भारतीय जनतेच्या समतीशिवाय भारताला युद्धांत गोंवण्याचा ब्रिटिशाना अधिकार काय ? परंतु १९४२ सालीं जपानी सैन्यें भारतावर धडका देऊं लागल्यावरहि कॉंग्रेसनें युद्धसहकार्याला नकारच दिला. या उलट युद्ध प्रयत्नांत सहकार्य देणाऱ्या आणि मुसलमानाना सैन्यांत शिरण्याचा आदेश देणाऱ्या मुस्लीम लीगला ब्रिटिशांना मिठी मारावीशी वाटे यांत नवल नाहीं.

लेखकानें या ठिकाणीं सैन्यांतील हिंदूंच्या प्रमाणाविषयीं म्हटलें आहे--

" उत्तर आफ्रिका, इटली, मलाया, आणि ब्रह्मदेशात ज्या हिंदी फौजा लढत होत्या त्यात ६५ टक्के भरणा मुसलमानाचा होता. "

**याचा परिणाम असा झाला कीं, ब्रिटिशांची भारतांतील सत्तेची चौकट युद्ध संपल्यावर पूर्णपणें मुस्लीमधार्जिणी झाली होती. पण ती पाकिस्तानला अनुकूल होती कां ?**

**लेखकानें या प्रश्नाचें उत्तर नि:संदिग्ध शब्दांत दिलें आहे कीं, 'नाहीं–' याला पुरावा म्हणून लेखक सांगतो कीं, मार्च १९४५ पर्यंत दिल्लीच्या सरकारी दप्तरांत पाकिस्तान द्यावें लागलें तर काय करायचें याचा नुसता विचार करणारा एकहि कागद आज उपलब्ध नाहीं.**

एप्रिल १९४५ मध्यें यासंबधींचें पहिलें टिपण सांपडतें. तें केले आहे लेफ्टनंट जनरल सर फ्रॅन्सिस टुकर यांनीं. हे गृहस्थ त्यावेळीं

भारताच्या पश्चिम विभागाचे जनरल ऑफिसर इन् कमांड होते. त्यांनीं दिल्ली येथील युद्ध–कचेरीच्या चिटणीसांना पाकिस्तान आलें तर काय होईल यासंबधीं कांहीं टिपण पाठवले होतें. त्याचें उत्तर दि. ९–४–४६ ला देतांना सेक्रेटरी डुड्स् यांनीं लिहिलें आहे– "तुमचे भारत व पाकिस्तान यांवरील विचार चिंतनीय वाटले. पण याचा विचार करण्याकरतां लागणारी सत्ता आपल्या दोघांपाशीं नाहीं. तेव्हां जें होईल तें पहावें झालें !" हें टिपण तसेंच धूळ खात पडलें नसतें आणि श्री. डुड्स् यानी तें वरिष्ठांकडें पाठविलें असतें तर दीड वर्षानंतर झालेली सहार्थेहजार जीवाची हत्या टाळता आली असती.

## वॅव्हेलची व्यक्तिरेखा

लॉर्ड वॅव्हेल याची व्यक्तिरेखा या पुस्तकांत फारच उत्तम उतरली आहे. भारताच्या फाळणीला वॅव्हेल याचा तीव्र विरोध होता. इतिहासाचा एक अभ्यासक म्हणून त्याचें असें मत होतें कीं, भारताची फाळणी करणें म्हणजे भारताच्या बाल्कनीकरणाची नांदी होय. एकदां कां धर्म हे फाळणीकरतां तत्त्व म्हणून स्वीकारले की, भारत शतखड होण्यास उशीर लागणार नाही. मुसलमानाच्या पाठोपाठ शीख स्वतंत्र राज्याची मागणी करतील आणि भाषावार प्रांताची मागणी पुढें येईल. मुख्य म्हणजे भारताच्या फाळणीबरोबर हिंदी सैन्यासारखें वाकबगार, शूर सैन्य दुभगावें लागेल. वॅव्हेलसबधीं मोस्ले लिहितो–

"शिपाईगडी म्हणून वॅव्हेल सर्वांना माहीत असले तरी दुसऱ्या महायुद्धात त्याच्या नशिबीं सतत पराभवच लिहिलेला होता. सोमालीलॅंडवर मुसोलिनीनें हल्ला चढवताच, बर्बेरा या राजधानीतून वॅव्हेलला प्रथम मागें हटण्यास सागण्यात आलें. अगदीं शेवटच्या क्षणीं बर्बेरा लढवण्याचा हुकूम त्याला झाला. परंतु लढाईंत इटालीनें पराभव केला आणि सैन्य एडनच्या दिशेनें पळवावें लागले. चार दिवसांत इटालियन सैन्य सिद्दीं बराणीवर आलें. आणि वॅव्हेलला 'मेसामात्रूह' पर्यंत माघार घ्यावी लागली. अर्थात् नंतर वॅव्हेलने पुनः मार्शल ग्राझियानीला सोमालीलॅंडमधून पिटाळून लावलें. तरीहि प्रथम आफ्रिकेत जी इग्रजाची नाचक्की झाली ती भरून आली नाही. वॅव्हेलच्या माथीं अपयशी हाच शिक्का कायम झाला

"मुत्सद्दीपणाला आवश्यक असलेले तरल बुद्धिमत्ता, दूरदर्शीपणा आणि ठरवलेले काम उरकण्याची धमक यापैकी एकहि गुण वॅव्हेलजवळ नव्हता. शिवाय भारतासारख्या बडबड्या लोकांच्या देशात जो सर्वांत मोठा दुर्गुण समजावयास हवा तो मुखदुर्बलता हा वॅव्हेल यांचा सर्वांत मोठा दोष होता.

"भारतांत सर्व राजकारणी माणसांना अवाच्या सवा बोलण्याचें खास वेड आहे. जेव्हां तोडातून अक्षर निघू नये तेव्हादेखील हे महापुरुष अफाट बोलत असतात. लाळेसारखे शब्द त्याच्या तोडातून सारखे गळत असतात. वॅव्हेलना भेटण्यासाठीं एकामागून एक गाधी, जीना, नेहरू, आझाद, लियाकत यांच्या स्वाऱ्या येत असत आणि त्याच्या शब्दाच्या धोधाटचापुढें या साहेबाची नेहमी तारांबळ उडत असे.

"गाधी, जीना, नेहरू हे सगळे बॅरिस्टरच होते. बाकीचे निदान वकिलीचा अभ्यास तरी केलेले होते. वॅव्हेलला वकिलांबद्दल एकंदरीत तिटकारा होता. महात्मा गाधी सर्व भारतभर वंद्य होते. परंतु वॅव्हेलला गांधी संधिसाधू वाटत. गांधीजींविषयीं त्यांना जरी आदर होता आणि त्याच्या सामर्थ्याविषयीं शका नव्हती तरी त्यांच्याशी प्रत्यक्ष भेट त्यांना त्रासदायक वाटे. एकदां गाधीजी भेटून जातांच वॅव्हेलनें सांगितले–" अर्धा तास त्याचें माझ्याशी बोलणें झालें आणि तरीहि नेमकें गाधीना काय सागायचें आहे तें मला समजू शकलेलें नाही. त्याचें प्रत्येक वाक्य द्वयर्थी होते. माझी जर कुणीं अशी खात्री पटवली की, आपण निश्चित काय बोलतों हें त्याचें त्याना तरी समजते तरी मला आनंद होईल.

वॅव्हेल–गांधीजींच्या भेटीचें वर्णन वॅव्हेलच्या सेक्रेटरीनें असें केलें–

"गाधीचे बोलणें सुरू असे. वॅव्हेल या कोपऱ्यात बसत असत. आणि त्याच्या चेहऱ्यावर प्रेतकळा असे. हातातल्या पेन्सिलीनें ते कागदावर चाळा करीत असत. आणि वेळ सपत आली की त्याचा निकामी न झालेला डोळा एकदम लकाकल्यासारखा होई. शेवटी एवढेंच म्हणत 'I see Thank you' (आलं लक्षांत. आभारी आहे.)

वॅव्हेलसाहेबाचें चित्र रेखाटल्यावर शेवटी मात्र मोस्लेनें लिहिलें आहे कीं, भारताच्या स्वातंत्र्याच्या अखेरच्या प्रवेशांत ज्याना ज्याना रंगभूमीवर नाचावें लागलें त्या सर्वांत फक्त वॅव्हेलच सत्य बोलत असत. बाकीच्यांच्या दृष्टीनें सत्याला अनेक फाटे फुटलेले असत. यासबधीं मोस्ले सागतो–

"गाधीना एकदा विचारण्यांत आले कीं, तुमचें म्हणणें थोडक्यात सांगा. गाधीनीं सांगितलें की, मी पाच वाक्यात माझें म्हणणें लिहून देतों. बातमीदारानें ती पाच वाक्यें उतरवून घेतलीं. तीं नंतर वाचताना त्याच्या लक्षात आले की, प्रत्येक वाक्य परस्पराच्या विरोधी होतें. आणि त्यांतून १२५ अर्थ निघाले असतें. नेहरू नेहमी आस्थापूर्ण बोलत. परंतु एखादी पळवाट राखून ठेवीत. उलट जीना भेटीत संपूर्ण समाधान झाल्याचे सागून थोड्याच काळात नवी मागणी पुढें माडीत–"

## कॅबिनेट मिशन आलें

१५ मार्च १९४१ रोजी पंतप्रधान ॲटली यानी कॉमन्स सभागृहात मत्रिमडळातील तीन सदस्याची एक समिती भारताला स्वातंत्र्य देण्याच्या मार्गांतील अडचणी सोडविण्यासाठी पाठवीत असल्याची घोषणा केली. लॉर्ड वॅव्हेल हे त्यावेळी भारताचे व्हाईसरॉय होते. त्याना केलेल्या खाजगी तारेत ॲटली यानी कॅबिनेट मिशनची नियुक्ति ही व्हाईसरॉयला गुडाळून ठेवण्यासाठी झाली नसल्याचा खुलासा केला. आणि वॅव्हेल यानीं सहकार्य द्यावे अशी सूचना केली. यावर वॅव्हेल यानी काढलेले उद्गार हताशपणाचे द्योतक आहेत. त्यांनीं म्हटले– "सहकार्य देण्याची विनंति कशाला? मग मी इतके दिवस दुसरे काय करीत होतों?"

सर स्टॅफर्ड स्त्रिप्स, लॉर्ड पेथिक लॉरेन्स आणि अलेक्झाडर हे तिघे कॅबिनेट मिशनचे सभासद होते. मोस्ले लिहितो की, "यापैकी श्री. अलेक्झांडर हे नुसते नावाला होते. त्यानी कधी कसल्या चर्चेत महत्त्वाचा वाटा उचलला नाही. सर्व जबाबदारी स्क्रिप्स व लॉरेन्स या दोघांवरच होती."

भारतात येताक्षणींच कॅबिनेट मिशनने पुढाऱ्यांशीं चर्चा सुरू केली. कॉंग्रेसचे त्यावेळचे अध्यक्ष मौलाना आझाद याच्याशीं त्याची प्रदीर्घ बोलणी होत. श्री. मोस्ले यांनीं आझादाविषयी सागितले आहे–

" आझाद जातीनें मुसलमान होते. भारताला स्वातंत्र्य मिळालें तर बहुसंख्य हिंदूंच्या रेटयाखालीं ९ कोटी मुसलमान चिरडले जातील आणि त्यांचा अल्पसंख्यांक म्हणून छळ होईल, अशीहि त्यांना भीति वाटत होती. परंतु जीनाचें पाकिस्तान हा त्यावर एकच उपाय आहे असे मात्र त्याना वाटत नव्हतें. १५ एप्रिल १९४६ ला मौलाना आझाद यानी एक पत्रक प्रसिद्ध केले. हें पत्रक आज सोईस्करपणें विसरलें गेलें आहे. तें सपूर्ण उधृत करणेंच अगत्याचें आहे–"

एवढें लिहून श्री. मोस्ले यांनीं तें सपूर्ण पत्रक दिले आहे. या पत्रकांतले विचार फारच सुस्पष्ट आणि हिंदूना धक्का देणारेहि आहेत. तें सर्व इथें वाचकांना देणें शक्य नाहीं. त्यातील कांही भाग कसा आहे तो पहा–

" पाकिस्तान हा शब्दच मला घृणास्पद वाटतो. जगातला कांहीं भूभाग हा पाक लोकांचा म्हणजें शुद्ध लोकांचा आहे-आणि बाकीचा पर्यायानें नापाक आहे असें सांगणें हें इस्लामच्या शिकवणीला धरून नाहीं. पैगंबर म्हणतो, ' परमेश्वराने निर्माण केलेलें हे सर्व जग मला एका मशिदीसारखें भासते. ' ......

" भारतांत मुसलमान नऊ कोटी आहेत. ही संख्या इतकी मोठी आहे कीं, भारताच्या सरकारी यंत्रणेवर आणि धोरणावर तिचा प्रभाव पडल्यावाचून रहाणार नाही. शिवाय निसर्गत: ( ! ) विशिष्ट भागात ते बहुसंख्य आहेत.

**भारताची परिस्थिती अशी आहे कीं, मध्यवर्ति एकमुखी सत्ता निर्माण करण्याचे प्रयत्न इथें फसल्याशिवाय रहाणार नाहींत.** मुसलमानांना जिथें ते बहुसख्य आहेत तिथें अंतर्गत स्वायत्तता असावी परतु ते प्रांत अखंड भारताचे घटक रहावेत ही कॉंग्रेसची योजनाच मुसलमानांच्या हिताची आहे......

" कांहीं झालें–समजा हा प्रयोग फसला तरी कुठल्याहि परिस्थितींत नऊ कोटी मुसलमान हे एवढे बलाढ्य आहेत की, त्याना आपलें हितसंरक्षण करणे कधींच कठीण जाणार नाहीं–"

भारताचें राजकारण हें सर्वस्वी मुसलमानांच्या हितसंबंधाचेंच राजकारण कसें बनलेलें होते याचें वरील पत्रक हा खरोखर उत्कृष्ट पुरावा आहे. चर्चा फक्त मुसलमानांच्याच हितसबधांची. तूर्त हें स्वीकारा. नाहीच जमलें तर काय करायचें तें पहाण्यास मुसलमान समर्थ आहेत अशी मुसलमानाची ही अध्यक्षीय भलावण.

## आझादी योजना

कॉंग्रेसची योजना, लीगनें धुडकावल्यावर कॅबिनेट मिशननें आपली म्हणून जी योजना तयार केली ती मूलत: मौलाना आझादाच्या सूचनांवरच आधारलेली होती. ती योजना थोडक्यांत अशी–

(१) भारत अखंड राहील. मात्र मध्यवर्ति सरकार–सरक्षण, परराष्ट्रीय संबंध आणि दळणवळण या तीनच बाबतीत अधिकारी राहील.

(२) भारताच्या राज्यकारभाराच्या सोईच्या दृष्टीनें तीन भाग कल्पिण्यांत येतील.

( A ) हिंदु बहुसंख्यांक प्रदेश. ( B ) पंजाब, सिंध, वायव्य सरहद्द आणि बलुचिस्तान हा मुसलमान बहुसंख्याक प्रदेश. ( C ) बगाल आणि आसाम–जेथें मुसलमान फार अल्पसंख्येनें बहुमतात आहेत.

आश्चर्याची गोष्ट घडली. ही योजना कॉंग्रेस आणि मुस्लीम लीग या दोघांनीं स्वीकारली. महात्मा गांधीनीं तर सांगितलें–" खरोखर ही योजना म्हणजे जिथें दुःख औषधाला नाहीं असें नंदनवन निर्माण करणारी संजवनी आहे " ( The seed to convert this land of sorrow into one without sorrow or suffering. )

सर्वत्र उत्साहाचें वातावरण पसरलें. आझादांनी कॉंग्रेसच्या ए. आय्. सी. सी. पुढें परिणामकारक भाषण करून ही योजना कॉंग्रेसनें स्वीकारावी अशी भलावण केली. कॉंग्रेसनें ती स्वीकारली. ही योजना स्वीकारून वस्तुत: कॉंग्रेसनें हिंदूचें आणि मुसलमानांचें दैनंदिन राज्यकारभारांत ऐक्य आणि विश्वास अशक्य आहे या जीनांच्या घोषणेवर शिक्कामोर्तबच केला. जीना म्हणतील तशी लीग वाकत असल्यामुळें हा योजनास्वीकृतीचा फार्स त्यानीं केलाच नाही.

कॉंग्रेसचे नेते हुरळून गेले. परंतु जीना संशयग्रस्त होते. कॉंग्रेसशीं हातमिळवणी केली तर सर्व फायदा हिंदूच्याच वाटयाला येतो असा त्याना युक्त प्रातांत अनुभव होता. " अखेरची घोडदौड जिंकायची असली तर जॉकीला उपाशी राहून प्रसंगीं वजन घटवावें लागतें. " तसाच काहीसा प्रकार जीनानीं या योजनेला समति देतांना केला, असें श्री. मोस्ले लिहितो.

कॅबिनेट मिशन इग्लंडला रवाना झालें. त्यानीं हिंदी पुढाऱ्यांना आभाराची पत्रें लिहिली.

कॉंग्रेसच्या वर्तुळांत नव्या अध्यक्षपदाची सूत्रें हलू लागलीं. कॉंग्रेसमधल्या पुष्कळांची इच्छा या आणीबाणीच्या वेळी अध्यक्षपद पटेलांकडे असावे अशी होती. नेमकी हीच गोष्ट आझादाना नको होती. त्यांनीं पंडित नेहरूना गळ घालून त्याच्यासाठीं प्रचार सुरू केला. पुढें गांधी खुनापूर्वी जे नेहरू-पटेल मतभेद विकोपाला गेले त्याची सुरुवात याचक्षणी झाली असे मानावे लागतें. स्वातंत्र्य दृष्टीपथात येतांच मतभेद वर डोकें काढू लागले.

एकंदर वारें ओळखून पटेलानीं यावेळीं थोडी माघार घेतली. नेहरूंची कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड झाली.

श्री. मोस्ले यानी नेहरूंच्या विचारांतली या कालांतील नेमकी चूक दाखवली आहे. लेखक म्हणतो–

" जीना या व्यक्तींत दोष असतील. पण जीना ही प्रबळ शक्ति होती. तो खबीर नेता होता. **जीना सर्व मुसलमानांच्या वतीनें बोलत आहेत ही गोष्टच नेहरूंनीं प्रांजलपणें कधीं कबूल केली नाहीं.** ' मी मुसलमानांना ओळखतो. माझे अनेक मुसलमान मित्र आहेत. जीना कुराणदेखील वाचीत नाहीत ' असल्या पोरकट विधानानें ते जीनांना कमी लेखण्याची सधि गमावीत नसत. "

## पंडितजींची घोडचूक

अध्यक्ष झाल्यावरोबर पंडितजीनीं जी मोठी घोडचूक केली तिचा उगम याच ताठयात होता. त्यानी दहा जुलैला वृत्तपत्र प्रतिनिधीना मुलाखतीला बोलावलें. ही वेळ अशी होती कीं, कमीतकमी बोलणें आवश्यक होतें. एखादी चूक सगळा डाव उधळून लावील हें सर्वश्रुत होतें मायकेल ब्रीचर या नेहरूंच्या चरित्र-लेखकानें म्हटल्याप्रमाणें नेहरूंनीं आपल्या चाळीस वर्षांत केली नव्हती अशी मोठी चूक त्यांनीं त्या दिवशी केली. वृत्तपत्र प्रतिनिधींनीं नेहरूंना प्रश्न केला–

"कॅबिनेट मिशनची योजना काँग्रेस आहे तशी ( In toto ) स्वीकारणार आहे काय ?"

यावर नेहरूंनी मासलेवाईक उत्तर दिले

"काँग्रेस कसल्याहि कराराला बांधलेली नाही. जसजशी परिस्थिति येईल त्याप्रमाणें आम्ही वागूं."

यावर एका प्रतिनिधीनें खुलासा मागितला.

— "याचा अर्थ कॅबिनेट मिशनच्या योजनेंत आपणास फेरबदल करतां येईल असा होतो काय ?"

नेहरू गरजले–

"काँग्रेसचा अध्यक्ष म्हणून या योजनेंत मला अनेक बदल अभिप्रेत आहेत. जे गट योजनेत अभिप्रेत आहेत ते तसें आस्तित्वांत येणार नाहीत. 'बे' हा गट हिंदुबहुसंख्याक प्रदेशाचा असल्यामुळें तिथें आमचें म्हणण्याप्रमाणें या गटाना विरोध होईलच. वायव्यसरहद्द प्रांतातहि हीच आशा आम्हांला आहे. बंगाल आणि आसाम या ठिकाणीहि 'सी' गटाला विरोध होईलच. तेव्हां कसाहि विचार केला तरी हे गट आस्तित्वांत येणें कर्मकठीण आहे—"

मोस्ले लिहितो—

"आपण काय बोलतो हें तरी पडित नेहरूना समजत होतें काय ? नेहरूचें हे म्हणणें म्हणजे वचनद्रोह होता. ( Act of sabotage ) हें वक्तव्य करताना बहुधा एकतर नेहरू, जीना आणि मुस्लीमलीग ही कळसुत्री बाहुली आहेत असें तरी समजत होते किंवा स्वतःच्या मोठेपणाच्या तोन्यांत जेव्हां एक शब्दहि बोलायला नको होता. तेव्हाच तोंड उघडण्याची त्यांना दुर्बुद्धि झाली असावी. अलिकडे मात्र या वक्तव्याविषयी नेहरू कसलेहि मत व्यक्त करण्यास राजी नसतात. नेहरूंचा चरित्र-लेखक ब्रीचर यानें सागितले आहें की, नेहरूचें हें वक्तव्यहि राजनैतिक चूक होती. यामुळें जीनांना उघडपणें वचनभंगाचे टेपर काँग्रेसवर ठेऊन पाकिस्तानचीच मागणी पुढें करण्याची सुवर्णसंधि मिळाली."

मौलाना आझाद या वक्तव्याविषयीं "India wins freedom" या पुस्तकात लिहितात–" पुष्कळदा नेहरू तात्त्विक विचारात इतके गुरफटत कीं, वस्तुस्थितीचा बरोबर अंदाज त्याना घेतां येत नसे. १९४६ ची ही चूक भारताला महाग पडली—"

२७ जुलै १९४६ ला जीनांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या मुस्लीम लीगच्या वर्किंग कमिटीने काँग्रेस ही संस्था विश्वासपात्र नसल्याचें, नेहरूंच्या वक्तव्याने खात्री पटल्याचें कारण देऊन कॅबिनेट मिशनची योजना फेटाळली.

यावेळी लॉर्ड वॅव्हेल यानीं काँग्रेस पुढाऱ्याची मनधरणी करून कॅबिनेट मिशनच्या योजनेवर आपला विश्वास असल्याचा ठराव पास करवून घेतला. नेहरूच्या वक्तव्याशीं वर्किंग कमिटी सहमत नाहीं असें सांगण्यांतहि आलें.

### जीनांची धमकी

परतु आलेली संधि निघून गेली होती. जीनानी यापुढें हिंदूच्या मनधरणीचे प्रयत्न आपण करणार नाही असे घोषित केले. मुस्लीम लीगने ब्रिटिशांकडून मिळालेले सर्व मानमरातब आणि पदव्या याचा मुसलमानानी त्याग करावा असा आदेश दिला. १५ ऑगस्ट १९४६ हा दिवस हा पाकिस्तानवरील मुसलमानाच्या अढळ निष्ठेचा आणि प्रत्यक्ष कृतीचा म्हणून मुक्रर करण्यांत आला.

जीनांनीं या ठरावावर पुढें जाहीर खुलासा केला.

"आज आम्ही जें ठरवलें आहे त्याला आमच्या इतिहासात आगळें स्थान आहे. आजपर्यंत लीगने फक्त सनदशीर मार्गानेंच चळवळ केली, परतु आता अशी वेळ आली आहे कीं, सनदशीर मार्गांना आतां आम्ही रामराम ठोकीत आहोत. आम्हीं आतां पिस्तूल रोखलें आहे. आणि तें वापरण्याची ताकद आमच्या मनगटात आहे."

वॅव्हेल साहेबांनीं चूक पदरात घातल्यामुळें पडित नेहरू १५ ऑगस्ट १९४६ या दिवशी जीनांना भेटण्यासाठीं त्याच्या मलबार हिलवरील बगल्यावर गले काळजीवाहू सरकार दिल्लीत स्थापन होण्याचा हालचाली सुरू झाल्या होत्या. या सरकारातील पांच जागा मुस्लीम लीगसाठीं मोकळ्या सोडण्यात आल्या होत्या. व्हॉइसरायचा व्हेटो सोडला तर सर्व सत्ता काँग्रेस-लीगच्या हाती येणार होती. जीनाना प्रत्यक्ष कृतीपासून परावृत्त करण्यासाठी नेहरू जीनासाहेबाचा उबरठा झिजवीत होते.

*जीनांचें मत बदलणें ही गोष्ट अशक्य होती. आणि* जर काहीं एखादा टक्का शक्यता असली तर नेहरू भेटावयास गेल्यामुळें तीहि आशा नव्हती. आपल्याविषयीं नेहरूना यत्किंचितहि प्रेम नाही–असलाच तर भरपूर तिरस्कार आहे हें जीना जाणून होते. जीना ज्याला 'उध्दट आणि लुच्चा काश्मिरी ब्राह्मण' म्हणत असत त्या नेहरूनीं जीनांना भेटणे म्हणजे खडकावर डोके आपटण्याचाच प्रकार होता.

परंतु नेहरूंची अवस्था दयनीय होती. ज्याच्याविषयीं यत्किंचितहि प्रेम नाहीं अशा माणसाची मनधरणी करण्याची नामुष्की त्यांच्या पदरी आली होती. याला ते स्वतःच कारण असल्यामुळें त्याना सर्व गोष्टीचा पश्चात्तापहि होत होता.

दोघाची भेट झाली. त्या दीड तासाच्या भेटीत नेहरूंची खात्री पटली कीं, स्वातत्र्याच्या मार्गातिला अडसर फक्त जीना आहेत.

नेहरूची मोटार मलबार हिलवरून परतली तेव्हां मुंबईला मुसलमान मोहल्ल्यांत घराघरांवर काळीं निशाणें लटकत होती प्रत्यक्ष कृति अमलात येत होती. मात्र मुबईत हिंदु बहुसख्य असल्यामुळें काळीं फडकी घरावर चढण्याखेरीज मुसलमानानी काही हालचाल केलेली नव्हती.

### — सुऱ्हावर्दींची 'सुरा' वर्दी —

यावेळी बंगालचे गव्हर्नर होते–सर फेडरिक बरोज. मुस्लीम लीगचें मत्रिमडळ गादीवर होतें. शहीद सुऱ्हावर्दी हे पाताळयंत्री मुख्यप्रधानकीची वस्त्रें अंगावर घालून होते. सुऱ्हावर्दी लीग वर्किंग कमिटीचे सभासद होते. म्हणून जीनाचा चाबूक वाजतांच या जनावराने लीगचा ठराव प्रत्यक्षात उतरवण्याची योजना केली होती. सुऱ्हावर्दीविषयी मोस्ले लिहितो–

> "पैशावर प्रेम करावे, यथेच्छ दारू प्यावी, नाईट क्लबांत लोळत पडावें आणि जमेल तितकी वैषयिक भूक भागवावी असा या माणसाचा दिनक्रम होता. कलकत्त्यातले प्रमुख मुसलमान गुड त्यानें संरक्षक म्हणून जवळ बाळगले होते."

सुऱ्हावर्दीनें १५ ऑगस्ट १९४६ या दिवशी कलकत्ता शहरांत सरकारी सुटी जाहीर केली. बगालच्या विधिमडळात बहुसख्येच्या जोरावर या दिवशी सुटी द्यावी हा ठराव त्यानें पास करून घेतला.

५ ऑगस्ट १९४५ च्या "स्टेट्समन" या इंग्रजी पत्रांत या हैवानानें एक लेख खरडला. त्यांत त्यानें लिहिलें आहे "रक्तपात आणि अदाधुंदी या गोष्टी मूलतः वाईटच असतात असें नाही. मात्र त्या चांगल्या कामाकरतां राबवल्या गेल्या पाहिजेत. आजच्या मुसलमानांना पाकिस्तान प्राप्तीइतकें दुसरें कुठलें पवित्र कार्य आहे ? "

१० ऑगस्टला सुऱ्हावर्दीनें दिल्लीत जाहीर केले—"जर मध्यवर्ति सरकार काँग्रेसने आस्तित्वात आणले. तर बंगाल ते मानणार नाही. बंगालच्या उत्पन्नाचा एक छदाम या सरकारला मिळणार नाहीं—"

प्रत्यक्ष १५ ऑगस्ट १९४६ या काळधाकुट्ट दिवशी त्याच्या एका ए. डी. सी. नें "लडके लेगे पाकिस्तान—" अशीं सुऱ्हावर्दीच्या वतीने घोषणाच केली.

### — कलकत्ता पेटलें —

भारताचे तुकडे करण्याचें अग्निकुंड याच दिवशी पेटवण्यात आलें. मोस्ले लिहितो—"१५ ऑगस्टची पहाट फुटण्यापूर्वी हजारों मुसलमान गुंडाचे जथे हुगळी नदी ओलांडून कलकत्त्यात घुसले. लाठ्या चाकू, सुरे, वाटल्या, लोखंडाच्या कांबी, पेट्रोलचे भरलेले डबे या गोष्टींनी हे दंगेखोर सुसज्ज होते.

"गल्ली गल्लीतून गुंड फुटून गेले. दुकानें उघडण्याची वेळ झाली. हरताळांत सामील न होणाऱ्या हिंदु दुकानदारांची दुकानें उघडू लागतांक्षणीच दुकानाची फळी उघडत असतानाच दुकानदारांचे भराभर खून पाडण्यात आले. कुणी आंतडी बाहेर काढल्यामुळें मेले; कुणाचीं डोकीं लोखंडाच्या कांबीनें ठेंचण्यांत आली, कुणीं उरापोटांत बसलेल्या लाथांच्या वर्षावानें गतप्राण झालें.

"चौरंगी चौकातून सायकलवरून येणाऱ्या एका गोऱ्या माणसानें लिहिलें आहे—की, तो सायकलवरून जात असताना समोरच्या बाजूनें एक भंगी पळतांना त्याने पाहिला. तो सायकलीवरून उतरला त्या माणसापाठोपाठ धांवणाऱ्या जमावानें त्याला गाठलें. त्याच्या पायाच्या नडग्यांवर एवढ्या जोराने काठ्या मारण्यात आल्या कीं त्याची हाडें कडाकड मोडल्याचा आवाज आला. तो खाली पडतांच जमावातल्या एका माणसानें त्याचा गळा कापला. त्याचा कान कापून घेतला. तो इंग्लिश माणूस बाजूला उभा होता, जमावानें त्याला सलाम केला आणि जमाव पुढें सरकला.—हा सर्व प्रकार इतक्या निमिषार्धांत घडला की काय घडलें यावरच त्याचा विश्वास बसेना.

"एका म्हाताऱ्या हिंदु स्त्रीला जमावानें रस्त्यांत अडवलें. तिची परस्परांकडे ढकलाढकल केली आणि ती ठेंचाळून निघाल्यावर लाठीनें तिचें डोके फोडण्यात आले. स्त्रिया, मुलाना पकडून त्याना गाई रस्त्यावर मारून त्याचें मांस खावू घालण्याचा प्रकार सर्रास घडत होता.

"दुपारपर्यंत हे प्रकार सुरुं होते. दुपारीं दोन वाजतां कलकत्त्यांत सुऱ्हावर्दीच्या अध्यक्षतेखालीं मुसलमानांची विराट सभा झाली. सुऱ्हावर्दीचें भाषण चालू असताना कलकत्ता शहरांत सभेच्या ठिकाणापासून एक दोन गल्ल्यांवर माणसाचे मुडदे पडदे पडत होते. रॉकेलचे डबे ओतून घरांना आगी लागत होत्या. परंतु सुऱ्हावर्दीनीं किंवा पोलिसानीं त्याची दखल घेतली नाहीं. कलकत्त्यातले बहुसंख्य पोलीस मुसलमान होते.

"दुपारनंतर हिंदु शिखांनीं प्रतिकाराला सुरुवात केली. मुसलमानानीं निरपराध हिंदु, स्त्रिया मुलाचे खून पाडले होते. त्याचा बदला त्याच न्यायाने घेण्यांत येऊं लागला. सूडाची भावना पेटली होती आतां विवेकाचा अंत झाला होता. म्हातारे, स्त्रिया, आणि अर्भकें मारण्यांत येत होती.

"ब्रिटिशाविरुद्ध जीनांनीं प्रत्यक्ष कृतीचा आदेश दिला असताना, दंगल सुरूं झाल्यापासून कलकत्त्यातील एकाहि इंग्लिश माणसाला मात्र मुसलमानांनी हात लावला नाही.

"कलकत्त्यातील हॉस्पिटले जखमी माणसांनीं आणि गटारें प्रेतांनीं भरून गेली होतीं. अठ्ठेचाळीस तासांनंतर पेटलेली आग शमू लागली मृत्यूची भीषण छाया कलकत्त्यावर आतां पसरली होती. अजून घरें धुमसत होती. धुरामुळें हवा जड झाली होती. व्यवहार बंद झाले होते. रस्त्यांत चिटपाखरुहि नव्हतें. गटारांत स्त्रियाची, पुरुषांचीं मुलाची आणि मारलेल्या गाईंचीं शवें गळ्यांत गळा घालून पडलेलीं होती. गिधाडांनी त्याचा कबजा घेतला होता.

"चार हजार माणसें मारलीं गेली होतीं. एवढें होत असतांना पहिल्या दिवशीं लष्कर बोलावण्यांत आलें नाहीं. लष्कर दुसऱ्या दिवशीं आलें. सुऱ्हावर्दीने सर फ्रेडरिक बरोजना पहिल्या दिवशी लष्कराची जरूर नाही असे खोटेंच सांगितलें.

"It was only when the Hindus and Sikhs had come out in retaliation that the Chief Minister had called for military aid afraid for the first time of the enormity of tragic events which had been set in train" ( जेव्हां हिंदु आणि शीख सूडाच्या इर्षेनें बाहेर पडलें तेव्हांच मुख्यमंत्र्याने घाबरून लष्कराला निमंत्रण दिलें. कारण आपण पेटवलेल्या भस्मकुंडाचें रौद्र स्वरूप तेव्हांच कुठें त्याच्या ध्यानीं आलें होतें.)

जीना यांनीं नंतर कलकत्त्यांतील हत्याकांडाचा साळसूद निषेध केला. या हत्याकांडामुळें जीनाना जरी खरोखर धक्का बसला असें मानलें तरी जर हिंदु मुसलमानाना एकत्र डांबण्याचा प्रयत्न झाला तर केवढी यादवी माजेल याचा हा पुरावा त्याच्या पथ्यावरच पडला यांत शंका नाहीं.

●●●

### वॅव्हेल यांची उचलबांगडी

२७ ऑगस्ट १९४६ ला वॅव्हेलसाहेबांनी म. गांधी व पं. नेहरू यांना भेटीस बोलावलें. वॅव्हेलनीं सांगितलें—"मी नुकताच कलकत्त्याला जाऊन आलों. तिथें जें मी पाहिले त्यानें मला धक्का बसला आहे. हिंदी माणसाच्या कृत्याबद्दल काही बोलणें मला योग्य वाटत नाही. परंतु जोंपर्यंत मी व्हाईसरॉय आहे, तोंपर्यंत अशा तऱ्हेची कत्तल पुनः होऊ नये म्हणून उपाय योजणें हें मी माझें कर्तव्य मानतों. याबाबतीत तुमचे सहकार्य हवें आहे."

कलकत्त्याला असतांना नाझिमुद्दीन या लीग पुढाऱ्यामार्फत—काँग्रेस कॅबिनेट मिशनची योजना जशीच्यातशी राबविण्याची हमी देत असल्यास लीग आपल्या निर्णयाचा फेरविचार करील असें आश्वासन वॅव्हेल यानी मिळवलें होतें. म्हणून वॅव्हेलनीं महात्माजींना प्रश्न केला कीं—"लीगला हवी असलेली हमी काँग्रेस देईल काय—?"

गांधी उत्तरले—"एकदां काळजीवाहू सरकार अस्तित्वांत आलें कीं, योजनेसबंधी विचार तें सरकार करील. हा सरकारी प्रश्न आहे. काँग्रेस यांत कांही करूं शकणार नाहीं—"

व्हेलनीं सांगितलें कीं, लीगनें या सरकारवर बहिष्कार घातला असल्यामुळें सरकार फक्त कॉंग्रेसचेंच आहे. तेव्हां या प्रश्नाचा इतका कायदेशीर विचार करतां येणार नाहीं.

पंडीत नेहरूंनीं यावेळीं एकदम आवेशाने म्हटलें–" कॉंग्रेसच्या स्वरूपाविषयीं महाराज, आपला गैरसमज आहे. कॉंग्रेस हिंदुधार्जिणी नाहीं. मुसलमान विरोधीहि नाहीं. सगळ्या हिंदी लोकांची ही संस्था आहे. मुसलमानांच्या हितसंबंधाविरुद्ध कधींहि कायदे होणार नाहींत–"

**व्हेलनें पं. नेहरूंना आडवलें**

" पण हे मुसलमान कोण? कॉंग्रेसी मुसलमानच ना? ज्यांना लीग फितूर मानतें? लीगचें समाधान होईल असें कांहीं करण्याची अजून तुम्हांला गरज वाटत नाहीं कां? लीगला विश्वास वाटेल अशी योजनेसंबंधी लेखी हमी तुम्हीं द्यायला हवी–"

व्हेलसाहेबांनीं उठून टेबलाच्या ड्रावरमधून पूर्वींच लिहून ठेवलेला हमीचा मसुदा बाहेर काढला. आणि गांधीजींपुढें ठेवला. महात्माजींनीं तो कागद तसाच नेहरूंच्या हातीं दिला.

नेहरू म्हणाले–" ही हमी स्विकारणें म्हणजे पर्यायानें कॉंग्रेस जखडबंद करण्यासारखेंच आहे–"

यानंतर जो वादविवाद झाला तो या लेखाच्या सुरुवातीला दिला आहेच.

व्हेलना भेटून गांधीं–नेहरू बाहेर पडले आणि दोघांनीं व्हेलच्या विरुद्ध उपाय योजण्याच्या दृष्टीनें हालचाल सुरू केली. गांधीजींनीं पंतप्रधान अॅटली यांना त्याच रात्रीं तार केली. त्या तारेंत गांधीजींनीं म्हटलें–" बंगालमधील दुर्दैवी घटनेमुळें व्हेल यांना फारच मानसिक ताण पडलेला आहे. त्यांना एखादा हुशार आणि कायदेशीर सल्लागार असल्याखेरीज त्यांना आपलें काम नीट पार पाडतां येणार नाहीं–"

पाठोपाठ त्याच रात्रीं व्हेलना लिहिलेल्या पत्रांत गांधीजी लिहितात––

" इंग्लंडच्या राजाचे प्रतिनिधी म्हणावणारा माणूस फक्त सैनिक असून चालणार नाहीं. कायदा त्याला धुडकावतां येणार नाहीं. शिवाय हे कायदे तुम्हींच केलेले आहेत. वाटल्यास तुम्ही चांगला कायद्याचा सल्लागार मागवून घ्या. तुम्हीं मला व पंडित नेहरूंना अशी धमकी दिली कीं, जर तुम्हीं पुढे ठेवलेल्या फॉर्म्युल्याप्रमाणें आम्ही वागलों नाहीं तर तुम्ही कॉन्स्टिटयूएंट असेंब्लीच बोलावणार नाहीं. हाच जर तुमचा विचार होता तर तुम्हीं १२ ऑगस्टची घोषणा केलीत कशाला? "

व्हेलवर, पंडित नेहरूंनीं लेबर पार्टीमधील मित्रांना पाठविलेल्या पत्रांत व्हेल हे लीगधार्जिणे असल्याचा आरोप केला होता. नेहरूंनीं लिहिलें होतें कीं, व्हेलचे दोन सल्लागार सर फ्रॉन्सिस मुडी ( मुंबईचे गव्हर्नर ) आणि जॉर्ज अॅबेल ( प्रायव्हेट सेक्रेटरी ) हे कॉंग्रेस विरोधानें भारलेले असून ते लीगधार्जिणेपणाचा सल्ला त्यांना सारखा देत असतात.

परस्पर अविश्वासाचें वातावरण त्यावेळीं कसे गुदमरलें होतें याचें वर्णन मोस्ले करतो–

" जीना आणि लीग यांचा कॉंग्रेसवर विश्वास नव्हता. कॉंग्रेसचा व्हाईसरॉयवर नव्हता. व्हाईसरॉयचा अॅटली सरकारवर नव्हता; आणि अॅटलींचा व्हेलवर अविश्वास नसला तरी फारसा विश्वासहि नव्हता–"



**कलकत्त्यांत असे सहा सहस्र— !**

२ सप्टेंबर १९४६ ला व्हेलनीं अॅटलींच्या दडपणामुळें काळजीवाहू मध्यवर्ति सरकार–लीग–शिवाय अस्तित्वांत आणलें. व्हेलचा या कृतीला विरोध होता. कर्तव्य म्हणून त्यांनीं नेहरू, जीना, लियाकत यांच्याशीं या संबंधींच्या वाटाघाटी चालू ठेवल्या. पण गांधीजींना मात्र पुनः भेटण्याचें त्यांनीं टाळलेंच.

एक गोष्ट मात्र व्हेल समजून चुकले होते कीं, भारत सोडण्याची आपली वेळ नजिक आलेली आहे. परंतु भारत सोडणें म्हणजे असंख्य निरपराध्यांच्या कत्तली डोळ्यांपुढें पहाणें अशी परिस्थिति आहे. त्यांनीं आपले प्रमुख सल्लागार जॉर्ज अॅबेल यांच्या मदतीनें भारतांतून ब्रिटिशांनीं कसा काढता पाय घ्यावा याचें एक वेळापत्रक आंखलें. एक एक प्रांत हिंदी सरकारच्या हवालीं करावा. एका प्रांतांत राज्यकारभार स्थिरावला कीं, पुढचा प्रांत सुपूर्त करावा अशी ती योजना होती.

व्हेलच्या भारतांतील कारकीर्दीतला शेवटला अंक सुरू झालाच होता. १७ फेब्रुवारी १९४७ ला व्हेलसाहेब जॉर्ज अॅबेल यांचेबरोबर सकाळची न्याहरी करीत बसले असतांना ' प्रायव्हेट अॅन्ड कॉन्फिडेन्शिअल ' अशी शिक्का असलेली तार व्हाईसरॉयना मिळाली. व्हेलनें ती फोडून वाचली आणि मुकाटयानें ते समोरच्या फाय् एग्जकडे वळले. अॅबेलचे व्हेलशी फार जवळचे संबंध होते. व्हेलच्या चेहऱ्यावरील–विकारांवरून कांहींतरी विशेष घडलें आहे असा त्यांनीं तर्क केला. जवळजवळ पांच मिनिटें निस्तब्धेंत गेलीं. शेवटीं अॅबेल यांनीं विचारलें–

"कांहीं खास कळलं कां–?"

वॅव्हेलनीं उद्‌गार काढले– "जॉर्ज, अखेर मला त्यांनीं या पदावरून दूर केलंच—"

थोड्या शांततेनंतर ते पुढें म्हणाले—

"मला वाटतं त्यांनी केलं तें योग्यच केलं"

वॅव्हेलच्या या उद्‌गारात ब्रिटिश माणसाचा विशिष्ट स्वभाव दिसून येतो. ब्रिटिश सरकारनें आपल्याला व्हाईसरॉय पदावरून दूर केलें याचा अपमान गिळून वॅव्हेलनें आपल्या सरकारविषयीं एकहि अनुदार उद्‌गार काढला नाहीं. कांहीं दिवसानंतर यासंबंधीं त्यांनीं एवढेंच म्हटलें– "मला वाटतं मी अपेशीच आहे. प्रत्येक बाबतीत अखेर खापर माझ्यावर फुटत–"

२० फेब्रुवारी १९४७ ला कॉमन्स सभागृहांत पतप्रधान अॅटलींनीं वॅव्हेलच्या राजिनाम्याची घोषणा केली आणि अॅडमिरल माउंटबॅटन यांना गव्हर्नर जनरल म्हणून त्यांच्या जागी नेमल्याचें घोषित केले.

त्याचबरोबर अॅटलीनीं असाहि दिलासा दिला कीं, जून १९४८ पूर्वी जबाबदार हिंदी सरकारच्या हातीं सत्ता सोंपविण्याचा त्यांच्या सरकारचा निर्धार आहे.

अॅटलीच्या या घोषणेनें भारतांत आनंदीआनंद पसरला. नेहरूनीं सागितले—

"सध्यांच्या वातावरणांत या घोषणेनें एकदम उत्साह पसरून सगळ्या प्रकारची निश्चिती आतां येईल. ब्रिटिशांविषयीचें संशयहि आतां या घोषणेनें संपतील—"

जीनासाहेब फार बोलण्याच्याविरुद्ध असत. त्यांनीं फक्त सांगितलें–

"या क्षणी मी कांही बोलू इच्छित नाही. फक्त एवढेंच सांगतो, पाकिस्तानच्या मागणीपासून मुस्लीम लीग एक रेसभरहि ढळणार नाही—".

## नेहरू आणि मॉउंटबॅटन

२२–३–१९४७ ला माउंटबॅटनचा व्हॉईसरॉय म्हणून दिल्लींत शपथविधी झाला. हा शपथविधी होण्यापूर्वीच भेटीसाठीं बॅ. जीना, म. गांधी याना निमत्रणे रवाना झालीं होतीं. असे असलें तरी माउंटबॅटन यांची पहिली मुलाखत झाली ती पं. नेहरूंशीच. मलायांत हिंदी सैन्याला भेटण्यासाठीं पं. नेहरू गेले असतांना यापूर्वी एकदां दोघाची गाठ पडली होती. श्री. मोस्ले या दोघांसंबधी लिहितो–

"दोघात साम्यस्थळें फार होतीं. दोघे अभिमानी. दोघे सरंजामदारींत वाढूनहि लोककल्याणासाठीं आयुष्य घालवलेले. भावनाप्रधानता आणि विचाराची खोली नेहरूपाशी अधिक असली तरी पूर्णतेच्या आनंदप्रसंगीदेखील नेहरूंचा संशयात्मा आणि दोलायमान स्थिति कायमच असे. यामुळेंच कदाचित् नवीन व्हाईसरॉय (माउटबॅटन) यांच्याकडे नेहरू लवकर आकृष्ट झाले असावे. कारण माउंटबॅटन हे अत्यंत आत्मविश्वासू, स्वत वर संपूर्ण ताबा असलेले आणि सबधांत आलेल्या प्रत्येक व्यक्तीवर कबजा बसण्याच्या व्यक्तिमत्वाचे होते."

एवढें लिहून मोस्ले यानी एक फार मार्मिक विधान केलें आहे.

"नेहरूना माउंटबॅटनशी बोलताना बिलकूल आडपडदा वाटत नसे. ते मोकळेपणानें व्हाईसरॉयशीं बोलत आणि धूर्त व्हाईसरायनी नेहरूंच्या स्वभावानला हा दोष झटकन् टिपला होता. थोडेंसे प्रोत्साहन दिलें कीं, नेहरू निरनिराळ्या गप्पवार्ता बोलू लागतात आणि आपले मित्र आणि सहकारी यांच्यासबधीं अनुदार बोलण्यासहि कमी करत नाहींत–" (या ठिकाणीं मूळ वाक्य असें आहे– He cannot help when encouraged being gossipy and malicious about his friends and colleagues)"

पं. नेहरूंच्या ठिकाणीं मोस्लेनें वर्णन केलेला हा दोष असंख्य सामान्य जनांत आढळतोच. परंतु नेहरूंसारख्या जबाबदार माणसाच्या ठिकाणीं असलेल्या या दोषानें काय हानि होते हें मोस्लेनें लिहिलें आहे.

"नेहरूंच्याकडूनच माउंटबॅटन यांनीं बरीच स्फोटक माहिती गोळा केली आणि पुढें प्रसग येतांच याचा त्यांनीं इतर कॉंग्रेस नेत्यांविरूद्ध भरपूर उपयोग केला."

पुढें मोस्ले लिहितो—

"या पहिल्या मुलाखतीनंतर माउंटबॅटननीं नेहरूना जिंकलेंच. यानंतर पुढें माउंटबॅटनच्या पत्नी एड्‌विना याच्याशी नेहरूची जेव्हां ओळख झाली, तेव्हां माउंटबॅटन या व्यक्तीविषयी त्याना वाटणाऱ्या आकर्षणात उलट भरच पडली. भारताविषयीं लेडी माउंटबॅटन यांना प्रेम होतेंच आणि भारतीयांना मदत करण्याची चालून आलेली संधि राबवण्याची त्याची इच्छा होती. या त्यांच्या वृत्तीमुळें नेहरूना लेडी माउंटबॅटन यांच्याबद्दल वाटणाऱ्या भावनाचें स्वरूप निव्वळ कौतुकाचें न रहातां जिव्हाळ्याचें झालें."

## वाटाघाटींतून गांधीजी हद्दपार

माउंटबॅटन यांचे आकर्षक व्यक्तिमत्त्व आणि एड्‌विनाबाईचें सौजन्य याचा महात्माजीवर मात्र यत्किंचितहि प्रभाव पडला नाहीं. बोलावणें पोंचतांच गाधीजीनी कळवले– 'सध्या मी बिहारमधील एका दंगलग्रस्त भागाकडे जात आहे. २८ मार्चनंतर मी कधीं येऊ शकेन तें कळवतो–'

गांधीजी भेटण्यास आले. भेट दोन दिवस चालली होती. पहिल्या दिवशीं गांधीजी जवळजवळ तीन तास एकटेच बोलत होतें. माउंटबॅटनना असें वाटत असें की, कुठल्याहि माणसाला स्वत.चीं संपूर्ण मतें दुसऱ्याला समजावण्यासाठी एक तास हादेखील फार झाला. परंतु गाधीजीनीं त्याना धक्का दिला. दुसऱ्या दिवशीं गांधीजीनीं व्यवहारी योजना पुढें मांडली. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें–लीग–कॉंग्रेस तंटा मिटविण्याचा सोपा उपाय म्हणजें व्हाईसरॉयनीं जीनांनाच सरकार बनवावयास सागावें. मग भले त्यात जीना सर्व मुसलमान मंत्री घेवोत.

व्हाईसरॉयनी विचार केला–गाधीजींची ही योजना कॉंग्रेस मान्य करणें शक्य नाही. मग उगाच गाधीजीना कां दुखवा–? त्यानी गाधीजींना सागितलें, कीं, 'योजना फारच विचार करण्यासारखी आहे. जर कॉंग्रेसला ही योजना पटत असेल तर आपण त्याचा जरूर विचार करूं'

गांधीजी निघण्यापूर्वी माउंटबॅटननीं गाधीजीचा, आपला व लेडी माउटबॅटन यांचा हंसऱ्या चेहऱ्यांचा फोटो काढून घेतला. आपली कन्या पमिला हिची गाधीजीशी ओळख करून दिली. आणि सागितलें–' उद्यां तुमच्या सायंप्रार्थनेला पमिला येणार आहे.'

प्यारेलाल आपल्या Last Phase या पुस्तकांत या भेटीसंबंधी लिहितात—

"व्हाईसरॉयसाहेबांच्या आस्थेविषयीं गांधीजीची खात्री पटली. त्यांच्या उमद्या स्वभावाचीहि त्यांना प्रचिती आली."

वस्तुतः गांधीजीची पाठ फिरतांच गांधीजीच्या योजनेला सुरूंग लावण्याचा उद्योग माउटबॅटन आणि त्यांचे सहकारी यांनीं सुरूं केला. इतर कॉंग्रेस पुढाऱ्यांचीं खलबतें झाली आणि कॉंग्रेसनें गांधीं-जींच्या योजनेची योग्य ती वासलात लावली. गांधींजींना या घटनेचा एवढा धक्का बसला कीं, त्यांनीं व्हाईसरॉयला कळवून टाकलें– " यापुढें वाटाघाटींत मी कसलाहि भाग घेणार नाहीं. सल्ला देण्याचें काम मला करतां येईल. मी पुनः बिहारांत जात आहे. "

मोस्ले लिहितो–

" अशा रीतीनें भारतांत आल्यापासून पंधरा दिवसांच्या आंत व्हाईसरॉयनी स्वातंत्र्याच्या वाटाघाटींतून गांधीजींना हद्दपार केलें. याला फार महत्त्व होतें. कारण जीं दोन माणसे कसल्याहि दडपणाला अथवा प्रचाराला बळी न पडतां अखेरपर्यंत फाळणीला विरोधकच राहिलों त्यातले एक म्हणजे गांधीजी होत. " ( दुसरे-नुकतेंच कैलासवासी झालेले बाबू टंडन असावेत ! )

याउलट जीनांच्या भेटीनंतर व्हाईसरॉयनी उद्गार काढले–" काय म्हणावें या माणसाला ! इतका भावनाशून्य माणूस मीं पाहिला नाहीं. त्यांना आपलेसे करण्याचे माझे सारे यत्न वायां गेले. "

मुलाखतीला सुरुवात होण्यापूर्वीच जीना म्हणाले–

" फक्त एका अटीवर मी या वाटाघाटीस तयार आहे–

माउंटबॅटननीं प्रसंगावधानानें हंसत सांगितलें–" मिस्टर जीना, आपली ओळखहि झालेली नसताना कसल्याहि अटीची चर्चा करणें मला अप्रस्तुत वाटते. मला तुमची ओळख तर करून घेऊं द्या–"

परंतु सत्तरीची झुळूक लागलेल्या जीनांपुढें माउंटबॅटनचें सारें आर्जव फुकट गेलें. मुलाखतीच्या शेवटी जीना वार्ताहरांजवळ फुत्कारले– " व्हाईसरॉयना समजच कमी आहे–Just does not understand "

जीनाचें हें मत मात्र सपशेल चुकीचें होतें. जें समजावें अशी जीनाची इच्छा होती तें व्हाईसरॉयना केव्हांच समजले होतें. कॅबिनेट मिशनच्या योजनेप्रमाणें लवकरांत लवकर कॉन्स्टिटयुऐंट असेंब्ली बोलावून ब्रिटिश कॉमनवेल्थमध्यें असणारें भारतीय सरकार निर्माण करणें ही माउटबॅटनची जबाबदारी होती. त्या दृष्टीनें पुढाऱ्यांशीं केलेल्या वाटाघाटी फसल्या होत्या. आतां पर्याय शोधणें भाग होतें. तो पर्याय एकच होता आणि तो म्हणजे फाळणी ! भारताची हिंदु भारत आणि मुसलमान भारत अशी फाळणी ! परतु फाळणी नेहरू–गांधींच्या गळ्यात कशी बांधायची ? इंग्लंडात सरकारचें मन याकरतां कसें वळवायचें ? माउंटबॅटनचें विचारचक्र याच दिशेने प्रथमपासूनच फिरत असावें, कारण वाटाघाटीचा शिमगा सपताच फाळणीचें कवित्व त्यांनीं गायला सुरुवात केली.

### पटेलांच्या जाळ्यांत सारेच अडकले

कॉंग्रेस वर्किंग कमिटीनें मार्चच्या सुरुवातीलाच सर्व सत्ता जीनांच्या हवालीं करण्याच्या गाधीजीच्या योजनेचें श्राद्ध करणारा जो ठराव पास केला त्यामुळें गांधीजींचें नेतृत्व कॉंग्रेसने जवळजवळ झुगारल्या-सारखें होऊन हा सगळाच डाव माउटबॅटनच्या पथ्यावर पडला. या ठरावाचें जनकत्व होतें सरदार पटेलाचें. या ठरावान्वयें कॉंग्रेसनें पंजाबची हिंदु मुसलमान तत्त्वावर फाळणी मागितली आणि शीखांना त्यांचें भवितव्य ठरविण्याची मुभा द्यावी अशी तरतूद केली.

जर एका प्रांताची विभागणी हिंदु-मुसलमान या तत्त्वावर कॉंग्रेसला मान्य झाली तर देशाची फाळणी कॉंग्रेसला नाकारावयास तत्त्वाची बैठकच रहात नाहीं. या ठरावाचें तात्कालिक कारण असें होतें कीं– इटेरिम सरकारांत लीग सामील झाल्यावर अर्थखातें लियाकतअली खानांकडे होते. आणि त्यांनीं आपल्या नव्या वर्षाच्या अंदाजपत्रकामुळें कॉंग्रेसच्या पुंजीवादी भक्तांच्या पोटांत धडकी उठली होती. या अंदाजपत्रकाला विरोध करावा तर समाजवादी घोषणांचें पितळ उघडें होतें, स्वीकारावी तर कॉंग्रेसचा पाया हादरतो अशा पेंचांत कॉंग्रेस पडलेली होती. अशा तऱ्हेच्या माणसांबरोबर रहाण्यापेक्षां वेगळें होणें परवडलें असा ठाम विचार पटेलांचा झालेला होता.

# पोलादी पुरुषाचें अंतरंग

" कदाचित् हा योगायोग असेल; पण १९४७ सालीं भारताच्या राजकारणांत जे पुढारी म्हणून वावरत होते; हे तिघे विधूर होते. जीना, नेहरू, पटेल ही ती त्रयी होय. असे सांगत की, बायकोच्या मृत्यूचें वृत्त आलें तेव्हां सरदार पटेल मुबईच्या कोर्टांत एक दावा लढवीत होते. भाषण चालूं असतांना त्यांना तार मिळाली. त्यानी तार खिशांत ठेवली आणि दावा पुढें चालूं ठेवला–"

ही हकीगत सागून मोस्ले सरदारांविषयीं पुढें लिहितो—

" मांउटबॅटनची व्हॉईसरॉय म्हणून नेमणूक होताच सर-दारांनीं आपल्या लंडनमधील हस्तकांकरवीं माउटबॅटनसंबंधी संपूर्ण माहिती काढली. त्याना कळलें की, माउटबॅटन हे उदार-मतवादी सरंजामदार असून शिवाय ते क्रांतीवर विश्वास ठेव-णारे आहेत. (Liberal aristocrat with revolutionary leanings. ")

यावर सरदार म्हणाले–

" हें खेळणं जवाहरलालजींना खेळायला ठीक आहे–"

यावेळी त्यांचें वय ७२ वर्षांचें होतें. कॉंग्रेसची पोलादी संघटना सरदारांच्या अर्ध्या वचनांत असे; कारण ते सर्व सरदारांचेंच कर्तृत्व होतें.

## जाळ्यांत गावला !—कोण कुणाच्या ?



पटेल व माउंटबॅटन

परंतु आपल्या मनांतील खऱ्या हेतूचा सुगावा पटेलांनीं वर्किंग कमिटीला लागूं दिला नाहीं. त्यांनीं वर्किंग कमिटीच्या एका सभासदाला लिहिलेल्या पत्रांत लिहिलें आहे—"जर लीगला पाकिस्तानच हवें असेल तर त्याचाच एक भाग म्हणून पंजाब-बंगालची फाळणी करायला हवी. मला वाटतें, ब्रिटिश सरकारला ही उपफाळणी मंजूर होणार नाहीं आणि त्यांना अखेर भारतांतील सर्वांत बलाढ्य पक्षाला सत्तादान करून निघून जावें लागेल. उद्यां मध्यवर्ति सरकार प्रबळ असेल तर आज जरी पूर्व बंगाल, पश्चिम बंगाल किंवा बलुचिस्तान यांना संपूर्ण स्वायत्तता दिली तरी त्यांना ती उपभोगणें कठीण जाईल..."

नेहरूंनीं पटेलांच्या या ठरावाला पाठिंबा दिला, त्यांना वाटलें असावें पटेलांच्या या राजनैतिक डावानें फाळणी ढारगळल्याशिवाय राहाणार नाहीं. या ठराव पुढें आला तेव्हां गांधीजी बिहारांत आपलें काम करीत होते. आणि आझाद आजारी होते. या ठरावाची वातमीदेखील गांधीजींना कळवण्यांत आली नाहीं. जेव्हां या ठरावाचा मसुदा गांधीजींच्या वाचनांत आला तेव्हां त्यांनीं लगेच नेहरू–पटेलांना पत्रें लिहिलीं. नेहरूंना लिहिलेल्या पत्रांत गांधीजींनीं लिहिलें–

"मला या ठरावामागील भूमिका समजून घ्यावयाची आहे. याबद्दल मला कांहीं बोलावयाचे आहे. परवां कृपलानींनीं मद्रासला सांगितलें कीं, ज्या तत्त्वावर पंजाबची फाळणी मागितली तेंच तत्त्व बंगाललाहि लाविलें पाहिजे. मला नुकतेंच एका लीग पुढाऱ्यानें विचारलें कीं, मग हेंच तत्त्व बिहारला लागू आहे कीं, नाहीं ? जातीय तत्त्वावर किंवा द्विराष्ट्रवादावर आधारलेली फाळणी मला मंजूर नाहीं. सक्तीनें कांहींहि करतां येईल पण जर एखाद्या गोष्टीला मनापासून संमति हवी असेल तर ती गोष्ट बुध्दीला आणि अंतःकरणाला पटली पाहिजे."

सरदार पटेलांनींहि गांधीजींनीं लगोलग पत्र लिहिलें. पटेलांनीं गांधीजींना लगेच उत्तर धाडलें. त्यांत पटेल लिहितात.—

"पंजाबसंबंधींचा ठराव तुम्हांला समजावणें हें कठीण काम आहे. पराकाष्ठेच्या विचारविनिमयानंतर तो करण्यांत आला. घाई गर्दीत किंवा पुरेसा विचार न करतां तो केलेला नाहीं. तुम्हीं त्या ठरावाविरुद्ध मत व्यक्त केलें हें आम्हांला वृत्तपत्रांतूनच कळलें. अर्थात् तुम्हांला जें योग्य वाटतें तें सांगण्याचा तुम्हांला अधिकार आहे. पंजाबमधील परिस्थिति बिहारहून वाईट आहे. लष्करानें कबजा घेतलेला आहे आणि परिणाम म्हणून वरवर कांहींशी शांतता भासत आहे इतकेंच. परंतु परिस्थिती केव्हां उलट खाईल यासंबंधीं कुणी खात्री देऊं शकत नाहीं. मला वाटतें तसें झालें तर दिल्लीलाहि त्याची झळ लागल्याखेरीज रहाणार नाहीं. अर्थात् दिल्लींत कांहीं गडबड झाली तर त्याचा समाचार घेण्यास आम्ही समर्थ आहोंत.

नेहरूंचें पत्र पटेलांच्या पत्रानंतर एक दिवसानें गांधीजींना मिळालें. या पत्रांत निराशेचा सूर अधिक गडद आहे. नेहरूंनीं लिहिलें–

"पंजाबच्या फाळणीविषयीं म्हणावयाचें तर आमच्या पूर्वीच्या निर्णयानुसारच हा ठराव आहे. पूर्वी ठराव नकारात्मक होते. परंतु आतां निर्णय घेण्याची वेळ आली आहे. आणि नुसते ठराव करून मतप्रदर्शन करणें याला फारसा अर्थ नाहीं. माझी खात्री झाली आहे व जवळजवळ सर्वत्र वर्किंग कमिटीच्या सभासदांचीहि अशी खात्री आहे कीं, आपण तावडतोब पंजाबची फाळणी मागितली पाहिजे. म्हणजे वस्तुस्थितीचा चटका सर्वांना जाणवेल. जीनांच्या पाकिस्ताननच्या मागणीला हेंच एकमेव उत्तर आहे."

अजूनहि पंडितजी याच भ्रमांत होते कीं फाटकें तुटकें पाकिस्तान नको म्हणून जीना पाकिस्तानचीच मागणी सोडतील !

माउंटबॅटननीं आतां वेळ गमाविण्यांत अर्थ नाहीं हें लगेंच ताडलें. त्यांनीं पटेलांना भेटीचें निमंत्रण पाठवलें. पटेल आले. आतां परिस्थितीचा अंदाज लागताच पटेलांची भूमिका ही कट्टर हिंदु पुढाऱ्यांची भूमिका झालेली होती, असें मोस्लेनें नमूद केलें आहे. मोस्ले लिहितो-

"पटेलांनीं माउंटबॅटनशी बोलतांना भोळीभाबडी भूमिका घेतली. माउंटबॅटननीं त्यांना कॉंग्रेसच्या ठरावाचा अर्थ पाकिस्तानला मान्यता असा होतो हें समजावलें. आणि पटेलांनीं तें सर्व शांतपणें समजावून घेतलें. जणूं त्यांना हें कळतच नव्हतें ! पटेलांच्या मनांत विचार होता तो असा कीं—पाकिस्तान देऊन पाकिस्तानांत मुसलमानांची एकदां हकालपट्टी झाली कीं, कॉंग्रेस आपल्या ताकदीवर स्वतंत्र भारताचा उत्कर्ष विना अडथळा साधूं शकेल"

पटेलांची मुलाखत संपतांच माउंटबॅटननें आनंदानें उद्गार काढले—

"काम फत्ते झालें ! हा कठीण नारळ फुटणार कसा याच्या मी विवंचनेंत होतों. परंतु एकदां करवंटी फुटतांच आंत सगळें गोड खोबरें निघालें–

माउंटबॅटनला हें कळलेलें नव्हतें कीं, पटेलांनीं फार मोठें जाळें केव्हांच विणावयास सुरवात केली होती. या जाळ्यांत–नेहरू, आझाद, गांधी, सगळें व्यवस्थित अडकले—

### पं. नेहरूंचा विरोध विरघळला

"यानंतर माउंटबॅटननीं आपला मोहरा नेहरूंकडे वळवला-" मौलाना आझादांनीं आपल्या पुस्तकांत पुढें म्हटलें आहे– "जवाहरलाल सुरवातीला या फाळणीस तयार होईनात. फाळणीच्या कल्पनेंविरुद्ध ते एकदम उसळलेहि. परंतु लॉर्ड माउंटबॅटन यांनीं पायरी पायरीनें नेहरूंना खालीं आणलें आणि जवाहरलालजींचा विरोध विरघळला. फाळणीला जवाहरलालनीं पाठिंबा जरी दिला नाहीं तरी त्याबद्दल ते उदासीन तरी झाले–"

मोस्ले लिहितो—

"नेहरूंमधील या आश्चर्यकारक बदलाला अनेक तात्कालिक

गोष्टींचा वांटा होता ही गोष्ट खरी असली तरी त्यांतील कांहीं वांटा लेडी माउंटबॅटनचा होता यात शका नाहीं. लेडी माउंटबॅटन यांचीं मुख्य शस्त्रें होती त्याचें आकर्षक व्यक्तिमत्व आणि भारताविषयींची त्यांची कळकळ ( charm & sympathy ) जहाल ब्रिटिशद्वेष्टया भारतीयानादेखील गोऱ्या स्त्रीचें आकर्षण वाटतें. आणि सरंजामदारीच्या परावर्तित प्रकाशांत ती स्त्री चकाकत असेल तर त्याचे डोळेच दिपतात ही गोष्ट जाणवण्याइतक्या लेडी माउंटबॅटन चाणाक्ष होत्या. त्यानीं आपल्या व्यक्तिमत्त्वाचा, सौंदर्याचा आणि उपलब्ध असलेल्या पार्श्वभूमीचा परिपूर्ण उपयोग केला."

मौलाना आझादानी लिहिलें आहे– " More than the influence of Patel or Mount batten upon him was the influence of lady Mountbatten."

अर्थात् इतर परिस्थितीचा रेटा नसता तर केवळ लेडी माउंटबॅटनच्या प्रभावामुळें नेहरूनीं पाकिस्तान स्वीकारलें असतें असें म्हणणें म्हणजें नेहरूंच्या व्यक्तित्वावर शितोडे उडवण्यासारखें होईल. नेहरू स्वत: पंजाबांत जाऊन आले होते. तिथें मार्च एप्रिल मध्यें उसळलेल्या जातीय दंगलीत दोन हजारावर माणसे मारलीं गेलीं होती भारतात रक्तपात आणि द्वेष याचें थैमान उठलें होतें. आणि नेहरूना एक प्रकारची अगतिकता आलेली होती. नेहरू म्हणतात– ' मी पंजाबात जी भयानक दृश्यें पाहिली आणि माणुसकीला लाज आणणाऱ्या ज्या गोष्टी लोकानी केलेल्या पाहिल्या त्यानी गुडाची मानदेखील खाली जाईल—"

याच सुमारास एकदां नेहरू आझादांच्या भेटीस गेले असतांना त्याचें जें बोलणे झालें तें आझादानी नमूद केलें आहे.

आझाद लिहितात– " नेहरूनीं मला मोठ्या निराशेनें म्हटलें की, फाळणीला दुसरा काही पर्यायच उरलेला नाही. फाळणी ही घातुक आहे हे त्याना कळत होते. परंतु परिस्थितीचा रेटा त्याच दिशेला आहे हेंहि त्यांना ठाऊक होतें. त्यानी मला फाळणीला विरोध करू नका असे सांगितलें. ते पुढें म्हणाले की, फाळणी आता अटळ आहे आणि तिला विरोध करण्यात फारसा शहाणपणा नाही. या प्रश्नावर लॉर्ड माउंटबॅटनना विरोध करणें मला सुज्ञपणाचें वाटत नाहीं."

झाली ! अखेर फाळणी निश्चित झाली. मोस्ले लिहितो–" व्हाईसरॉयनी नेहरूवर केलेले हें चेटूक म्हणजे फाळणीची किल्लीच हातात घेण्याचा प्रयत्न होता. कारण नेहरूंची संमति नसती तर कांग्रेसनें कधींहि फाळणीला मान्यता दिली नसती."

जीनाना जन्माचें समाधान लाभले होते. जरी वरवर त्यानी गंभीर्य सोडलें नव्हतें तरी त्यांचा आनंद व्हाईसरॉय एवढाच होता. कांग्रेस इतक्या लवकर फाळणी पत्करेल असें जीनांना वाटत नव्हते. कांहींचें असें मत आहे कीं, पाकिस्तान अस्तित्वांत खरोखर येऊं शकेल असें खुद्द जीनांनाहि वाटत नव्हतें. परंतु निमिषार्धांत जीना पाकिस्तानच्या उंबरठ्यावर उभे झाले.

११ एप्रिल १९४७ ला लॉर्ड इस्मे यांनी व्ही. पी. मेनन यांना पुढील तयारीचा इशारा दिला. व्हाईसरॉयहाऊस मधून मेननना गेलेला सरकारी खलिता असा होता–

" या पत्रासोबत भारताला सत्ता कशी सुपूर्त करावयाची याचा एक कच्चा आराखडा पाठवीत आहे. यावर आपण विचार करावा अशी व्हाईसरॉयसाहेबाची इच्छा आहे. यात काहीं बदल सुचवावेसे वाटले तर सुचवावे आणि सत्तादानाची घोषणा होतांच लगेच काय गोष्टी कराव्यात याहि सुचवाव्या. उदाहरणार्थ, लगेच एखादी सार्वत्रिक निवडणूक घ्यावी काय ? पजाब, बगाल आणि आसाम याची फाळणी कशी करावी ? ... वगैरे ...

फाळणीची चक्रें फिरू लागलीं. भारतांतल्या सर्व गव्हर्नरांना सहकुटुंब दिल्लीला येण्याचे निमन्त्रण मिळाले. व्हाईसरॉयनी सर्वांना खाना दिला. आणि येणाऱ्या फाळणीची जाणीव करून दिली.

अॅटलीनी कांग्रेस सभागृहांत घोषणा करताना १ जून १९४८ ही सत्तात्यागाची अखेरात अखेरची तारीख म्हणून घोषित केली होती. यावेळी विन्स्टन चर्चिल यानी या घाईबाबत आश्चर्य व नापसति व्यक्त केली होती. परंतु दिल्लींत पाय ठेवल्यापासून पधरा महिन्यांच्या आंतच माउटबॅटननीं फाळणीची योजना कांग्रेसच्या गळीं उतरवण्यांत यश मिळवले होतें. ( अपूर्ण )

[ एवढें सर्व सुरळीत जमूनहि शेवटीं पजाब पुन्हां कां पेटला ? बंगाल कां शात राहिला ? १ जून १९४८ ही तारीख पुढें कां ढकालावी लागली ?

भारताबरोबरच पाकिस्तानचे पहिले गव्हर्नर जनरल होण्याचे माऊटबॅटनचे मनसुबे जीनांनी कसे धुळीस मिळविले ?

' माणूस 'च्या सप्टेंबर १९६२ च्या अकात या पुस्तकपरिचयाचा दुसरा आणि शेवटचा हप्ता प्रसिद्ध होईल. त्यात हा सर्व खेदजनक पण तितकाच उद्बोधक इतिहास वाचकांना सादर करण्यांत येईल. ]

# संस्थानिकांच्या लीला

संस्थानिकांविषयी मोस्ले आपल्या पुस्तकांत लिहितो–

" काश्मिरचा महाराज एवढा श्रीमत होता की, त्याने शेंकडो स्त्रिया ३०० रुपयांपासून तो तीस लाख रुपयापर्यंत किंमत देऊन विकत घेतल्या होत्या. लडनच्या एका हॉटेलांत एक रात्र विलासांत काढण्याकरता त्यानें एका इग्लिश स्वैपाकिण स्त्रीला पधरा लाख रुपये दिले. मात्र संस्थानांत कुणीं गाय मारली वा गोमास विकलें तर त्याला सात वर्षांची सजा संस्थानांत जारी होती. जुनागडच्या नवाबाचा प्रतिवर्षी कुत्र्यावर जेवढा खर्च होई तेवढा संस्थानातील हॉस्पिटलांवर होत नसे. अल्वारच्या महाराजानें रेसमध्यें मागें पडला म्हणून आपल्या उमद्या घोड्याला अंगावर पेट्रोल ओतून जिवंत जाळलें. बहुतेक संस्थानिक मॉंटे कार्लो, पॅरिस किंवा लडन येथें ऐषारामात जेंवढा काळ घालवीत तेवढा आपल्या राजवड्यांत घालवीत नसत."

तरीपण एवढ्या नादान सहार्शें संस्थानिकाच्या विलीनकरण करारावर स्वाक्षऱ्या घेणें हें एक महा कर्मकठीण काम होतें. सरदार वल्लभभाई व त्याचे विश्वासू सहकारी श्री. व्ही. पी. मेनन यानी हें कार्य कसें कौशल्यानें तडीस नेलें त्याचा वृत्तात " माणूस " च्या सप्टेंबर अकात–मोस्ले–पुस्तक–परिचयाच्या उत्तरार्धात–आम्ही वाचकाना सादर करणार आहोंत.

# आयुष्मान् भव....!

## तुमच्या दीर्घायुष्याची वाटचाल

पु. ना. ओक

लेखांक पहिला

आपण सुंदर आणि सशक्त व्हावें, अनेक वर्षे जगावें व शारीरिक पीडेविरहित आयुष्य कंठावें असें प्रत्येकास वाटतें. वास्तविक ' अनेक वर्षे जगावें ' या इच्छेंतच हें अभिप्रेत आहे कीं, मानवी आयुष्य अनुकूल परिस्थितींत अमर्याद वाढवतां येईल. तसें नसतें व आयुष्याला मर्यादा असती तर आरोग्याचे नियम पाळा असें कानींकपाळीं ओरडण्याची जरूरच नव्हती. तें आपण आवर्जून व आर्जवून सांगतों. ह्याचाच अर्थ आरोग्याचे नियम जितके अधिक पाळाल तितके अधिक जगाल. हेंच लक्षांत घेऊन मानवी आयुष्य जास्तींत जास्त किती वाढवतां येईल तें आपणास पाह्यचें आहे. ह्या मर्यादेबद्दल स्पष्ट कल्पना आली म्हणजे तें ध्येय गांठण्यासाठीं काय करावें त्याचा विचार करतां येईल.

ह्याच बाबतींत उपनिषदांत एक अर्थपूर्ण ऋचा आहे. ती अशी :–

> जीवेम शरदः शतम्
> पश्येम शरदः शतम्
> शृणुयाम शरदः शतम् ॥

ही ईश्वरास केलेली असहाय प्रार्थना नसून एक प्रयत्नशील असें ध्येय–वाक्य आहे. ह्या ऋचेचा अर्थ असा कीं, " (आमची दिनचर्या अशी असावी कीं जिनें ) शंभर वर्षे जगणें आम्हांला शक्य व्हावें. ( नुसते कसेंबसें अंथरुणावरच जगावें असें नव्हें तर) आमची दृष्टि शंभर वर्षे ठणठणीत रहावी. (व एवढेंसुद्धां बहिरेपण न येतां) आम्हांला शंभर वर्षे खणखणीत ऐकूं यावें. " ह्या ऋचेचीच विचारसरणी पुढें चालू ठेवून असें म्हणतां येईल कीं, शंभर वर्षेपर्यंत दांत नीट शाबूत रहावेत, केंस पिकूं नयेत, गाढ झोंप यावी वगैरे वगैरे.

### आजची परंपरा

शंभर वर्षे सशक्त जीवन जगण्याची शक्यता नसती तर उपनिषदांत तसा उल्लेख झाला नसता. प्रत्यक्षांत आपल्याला शंभर वर्षांहून अधिक जगणाऱ्या व्यक्ती माहितहि आहेत. परंतु आजकाल पहावें तों आठव्या वर्षी चष्मा, नवव्या वर्षी टॉन्सिल्स सुजणें, दहाव्या वर्षी अपेंडिसायटिसची शस्त्रक्रिया अशा परंपरेंत, ब्लडप्रेशर, मधुमेह मुळव्याध हे होत होत ३० – ३५ वें वर्षी हार्टफेलनें मृत्यु अशीच अनेकांची जीवनकथा ऐकूं येते. एवढेंच नव्हें तर दिवसेंदिवस अशा शोकांतिकांचें व निष्प्रभ जीवनक्रमाचें प्रमाण झपाट्यानें वाढत आहे. ही अनिष्ट परंपरा नष्ट करण्यास काय करावें ह्याचा सांगोपांग विचार करणें जरूर आहे. तेवढ्यासाठींच आपण मानवी आयुष्याची अधिकांत अधिक मर्यादा किती असूं शकते ह्याचा विचार करूं.

वर उधृत केलेल्या ऋचेंतील शंभर वर्षांचा काल ही मानवी आयुष्याची कमाल मर्यादा नसून किमान मर्यादा आहे हें उघड दिसतें. कारण जो शंभर वर्षे धट्टाकट्टा राहील तो पुढें गलितांग होऊन तर कितीतरी जगूं शकेल. शिवाय जो शंभर वर्षे धट्टाकट्टा राहूं शकतो त्याला ११० वर्षे सशक्त व सुदृढ कां रहातां येऊं नये असा साहजिक प्रश्न मनांत उभा रहातो. आजकालसुद्धां १२५, १४० वर्षेपर्यंत जगणाऱ्या व्यक्ती आहेत. पुराणांतून तर कांहीं व्यक्ती सहस्रावधि वर्षे जगल्याचे उल्लेख आहेत. यावरून हें सिद्ध होतें कीं, तार्किक किंवा शुद्ध तात्विक व सिद्धांत ह्या दृष्टीनें आदर्श परिस्थितींत मानवी जीवनास मर्यादा अशी नाहीं. अमुक इतक्या वर्षांचा झाल्यावर माणूस कशाहि परिस्थितींत मेलाच पाहिजे असें शारीरशास्त्रदृष्ट्या म्हणतां येत नाहीं.

अनुकूल परिस्थिति व योग्य प्रयत्न झाल्यास माणूस अमर्याद वर्षे जिवंत व कार्यक्षम राहूं शकतो हें सिद्धांत म्हणून मान्य करावें लागतें. मात्र पृथ्वीलोकांत सदासर्वकाळ तशी आदर्श परिस्थिति लाभतहि नाहीं व लाभली तरी माणूस आरोग्याचे नियम डावलतो. म्हणूनच रोग, अपंगता व अकाली मृत्यु हीं त्याच्या पदरीं येतात.

### मानसिक सामर्थ्याचा पाया

म्हणून ज्यांना सशक्त, सुंदर, रोगमुक्त व दीर्घायु जीवन जगायची इच्छा असेल त्यांनीं वरील विवेचनावरून ही मनाची पक्की खात्री करून घेतली पाहिजे कीं, आपलें वय कांहींहि असो, आपण गलितांग झालेले असा, योग्य उपाय व प्रयत्नानें तुम्ही पुन्हा सशक्त, जोमदार व तरुण होऊं शकतां.

ह्याचाच अर्थ असा कीं, आयुरारोग्य साध्य करूं इच्छिणाऱ्यांनीं पहिली गोष्ट करावी ती ही कीं, आपण मर्त्य आहोंत, वाढत्या आयुष्याबरोबर आपण मरणाच्या जवळ चाललों आहोंत ही कल्पना मनांतून अजिबात काढून टाकली पाहिजे. कायाकल्पाचा हा मूळ सिद्धांत व उपाय आहे. मनानें मरणाची धास्ती घेतल्यास इतर बाहेरील उपाय परिणामकारी ठरत नाहींत हें आपल्याला माहित आहे, एवढ्याचसाठीं रोगी मरणासन्न असतांहि त्यास कोणी तसें सांगत नाहीं. " तूं आठ-दहा दिवसांपेक्षां जास्त जगणरा नाहींस " असें एकाद्या अत्यवस्थास सांगितलें तर तो चार-पांच दिवसांतच मरेल. यावरून हें स्पष्ट दिसतें कीं, आयुर्मान हें मरणाच्या धास्तीनेंच अर्धें कमी होतें.

एका व्यक्तीच्या आयुष्याची जर ही कथा तर पिढयान्‌पिढया "जीवन क्षणभंगूर...आहे दोन घडीचा काळ...आपण मर्त्य आहोंत... चाळिशी आली... वयाचीं साठ वर्षें झालीं म्हणजें लांकडें स्मशानांत गेलीं" असें जें क्षणोक्षणीं कानींकपाळीं बिंबवलें जातें त्याचा आयुर्मान खच्ची होण्यांत केवढा परिणाम होत असेल तें वरील रोग्याच्या उदाहरणावरून स्पष्ट दिसेल.

उलट प्रत्येकाची जर मनोमन अशी खात्री झाली कीं, मानवी आयुष्यास मर्यादा अशी नाहीं. अनुकूल परिस्थितींत निश्चयानें व प्रयत्नानें आपण आपलें आयुष्य वाटेल तितकें वाढवूं शकूं तर तेवढ्या मनोमन खंबीरपणामुळेंच प्रत्येकाचें आयुष्य पन्नास टक्क्यानें तरी वाढेल. ही खात्री पटली तर दीर्घायुष्य व कायाकल्प ह्यांचा मूलभूत मानसिक पाया तयार होऊन अर्धी लढाई जिंकली असें म्हणतां येईल.

म्हणून आपलें वय कांहींहि असो, केंस पिकले असोत, चष्मा लागून अनेक वर्षें झालेलीं असोत, अनुकूल परिस्थितींत आपण योग्य प्रयत्न केलांत तर आपली शारीरिक अधोगति थांबून आपण पुन्हा सशक्त, सतेज, सुंदर व तरुण होऊं शकतो ही प्रत्येकाची मनोमन खात्री पटली पाहिजे. ही दीर्घायुष्य व कायाकल्पाची पहिली पायरी होय.

कोणी म्हणेल कीं, एवढें जगून काय करायचें? हा प्रश्न तितकासा सचोटीचा नाहीं. कारण तसें असतें तर पन्नास–साठ वर्षें तरी कां जगावें असा उलट प्रश्न त्यांना विचारता येईल. शिवाय हा प्रश्न जो तो दुसऱ्यापुरता विचारतो. म्हणजे ज्याला त्याला वाटतें, लोकांनीं एवढें जगून काय करायचें? मी तेवढा नीट व दीर्घकाळ जगलों म्हणजे झालें.

दुसऱ्या एका दृष्टीनेंहि "एवढें जगून काय करायचें आहे? हा प्रश्न अयुक्त आहे. ह्याचें कारण असें आहे कीं, ज्याला लवकर मरायचें असेल त्याला अनेक मार्ग मोकळे असतात. परंतु ज्याला जगायचें असतें त्याला मात्र जगावें कसें हा मोठा पेंच पडतो. म्हणून एकाद्यानें "काका, मला वांचवाहो" असा टाहो फोडला तर त्याला वांचवण्याचा एक तरी मार्ग मोकळा आहे असा दिलासा द्यायचा आमच्या मुख्य हेतु आहे.

### अपंगत्वावर विजय

शिवाय ह्या प्रश्नाला दुसरी एक महत्वाची बाजू आहे. ती अशी कीं, तुम्ही एकवीस वर्षें जगा किंवा १२१ वर्षें जगा. परंतु जोपर्यंत तुम्ही जिवंत आहांत तोपर्यंत क्षय, अर्धांगवायु वगैरेंसारख्या रोगांनीं अपंग व जर्जर होऊन अंथरुणाला खिळून राहण्याचे हाल नकोत असें सर्वांना वाटतें ना? ह्याचा अर्थ जिवंत असेपर्यंत तरी अपंग न होण्याचा कांहीं उपाय सांपडल्यास प्रत्येकास हवा असतो. असें जर आहे तर अपंगत्व न येण्यासाठीं तुम्हाला जें करणें जरूर आहे त्यानें आपोआप आयुष्य वाढतें. किंवा हाच सिद्धांतच आपण उलटवून असें म्हणूं शकूं कीं, तुम्ही दीर्घायु होण्याकरिता जे उपाय अंगिकाराल त्याने आपोआप अपंगत्वेंहि टळेल. म्हणजे शक्ति कमावण्याचा सतत प्रयत्न केलांत तर लवकर गलितांग होण्यापासून जेमतेम वांचूं शकाल. ह्याबाबतींत Alice In The Wonderland ह्या पाश्चात्य कथेंत एक मोठें मार्मिक वाक्य आहे. त्या कथेंतील लहान नायिका म्हणते "जेथल्या तेथें रहाण्यासमुद्धां मला सारखें पळावें लागत होतें." मानवी शरीरप्रकृतीचें तसेंच आहे कीं, अटोकाट प्रयत्न केला तर माणूस हळूं हळूं वृद्ध होतो एवढेंच. असें असूनदेखील नव्याण्णव टक्के लोक आपली शक्ति, तारुण्य व सौंदर्य टिकविण्यासाठीं आपण होऊन कांहीं करत नाहींत. एवढेंच नव्हे तर प्रकृतीस अपाय करणाराच दिनक्रम हटकून अंगिकारतात. म्हणून ते अचानक, एकाएकीं तरी दिवंगत होतात किंवा खितपत, झिजत, कण्हत, कुंथत हालहाल होत मरतात.

असा दुर्धर प्रसंग स्वतःवर ओढवूं नये व त्यानें आपले सगेसोयरे, आश्रित लोक इत्यादींहि निराधार होऊं नयेत एवढ्यासाठीं प्रत्येकानें सशक्त, सुंदर, दीर्घायु होण्याचा निश्चय केला पाहिजे व ह्याबाबतींत प्रत्येकानें हें समजून घेतलें पाहिजे कीं, निसर्गानें मानवी जीवनाला मर्यादा अशी घातलेली नाहीं. आदर्श, अनुकूल परिस्थितींत आपण तें वाटेल तेवढें वाढवूं शकतो. म्हणून आपलें वय कितीहि असो, आयुष्य अधिकाअधिक वाढवण्याचा प्रयत्न प्रत्येकास करतां येईल अशी मनाची पक्की खात्री झाली तर दीर्घायुष्य व कायाकल्प ह्यांचा अवलंब करण्यास जरूर ती मानसिक बैठक अंशतः तरी तयार झाली असें समजण्यास हरकत नाहीं. ● ● ●



# न फुललेलें,

# न बहरलेलें भारताचें नंदनवन

**कादंबरीकार ना. ह. आपटे यांची काश्मीर वरील एक निराळी मुलाखत**

"श्री. ना. ह. आपटे नुकतेच काश्मीर-प्रवासाला ज़ाऊन आले आहेत. 'माणूस' साठीं वाटल्यास त्याची मलाखत घेऊं. सध्या २–३ दिवस त्यांचा मुक्काम पुण्यांतच आहे." 'माणूस' कार्यालयांत एका सहकाऱ्याने मुलाखतीच्या विषयाला चालना दिली.

मी प्रथम या गोष्टीला फारसा अनुकूल नव्हतों. काश्मीरप्रवासाचीं इतकीं वर्णनें आजवर आलेलीं आहेत, मोठमोठ्या लेखकांनीं यावर लिहिलेल आहे, की ना. ह. आपटे झाले तरी आतां नवीन काय सांगणार ? असा विचार माझ्या मनांत आला.

'पाहूं तर या' या सुरात शेवटीं जायचें ठरले. श्री. ना. ह. आपट कांटेकोर शिस्तीचे असल्यानें अगाऊ वेळ वगैरे ठरवून घेतली. भेटीत प्रकृतीची विचारपूस झाली. पाऊणशें वय असतांनाहि एवढा लांबचा प्रवास आपटे यांना झेपला हें खरोखरच आश्चर्य होतें.

## काश्मिरी जनतेचें चित्र

मुलाखतीच्या आरंभीच मीं म्हटलें—

"काश्मीरचें नयनमनोहर सौंदर्य, तीं हिमाच्छादित पर्वतशिखरें, तें खिलनमर्ग, गुलमर्ग, तें डाल सरोवर, शिकाऱ्यातील ती संथ जलक्रीडा याच्याशी या घटकेला आम्हाला कांही कर्तव्य नाहीं. आपण कादंबरीकार असला तरी आपल्या कादंबऱ्यांतून केवळ कलाविलासापेक्षां कांही सामाजिक आदर्शांचा विचारच अधिक दृष्टीस पडतो. तेव्हां काश्मीरच्या नैसर्गिक सौंदर्यापेक्षां आपण काश्मीरी समाजाचें कांही अवलोकन केलें असल्यास तेवढें आम्हांला सांगा. तेथील सामान्यजनाला भारताविषयीं काय वाटते ? भारतसरकार काश्मीरच्या विकासासाठी कोटयवधि रुपये खर्च करीत आहे. याचा तेथील जनतेच्या राहणीमानावर काय परिणाम होत आहे ?"

"तस म्हणाल तर यात्रा कंपनीबरोबर गेल्यामुळें या गोष्टी पाहण्यास आम्हांला सवडच मिळाली नाही. ठराविक वेळांत ठराविक ठिकाणें पाहण्याचा सरधोपट कार्यक्रम असल्यानें ज्या गोष्टीत माझ्यासारख्या ७५ वर्षीच्या वृद्धाला रस नाही तेथें मला इतराबरोबर विनाकारण वेळ दवडावा लागला व ज्या बाबी मला महत्त्वाच्या वाटत होत्या त्यांच्याविषयी अधिक माहिती मिळविणें कार्यक्रमांत बसू शकत नव्हतें. तेव्हा घाईगर्दीत जें काही संभाषणातून ऐकलें, दृष्टीनें पाहिले तेवढ्यावरच आपल्या प्रश्नांची उत्तरें मला द्यावी लागतील" श्री. आपटें यांनी आपली बाजू स्पष्ट केली.

**प्रतिनिधि :** हरकत नाहीं. जेवढी मिळेल तेवढी. आज या दृष्टीनें काश्मीरवर कोणीच लिहित नाहीं. तेव्हा आपली त्रोटक माहितीहि वाचकाना नवीनच वाटेल.

**आपटे :** पूर्वीची संस्थानी राजवट बरी असेच सर्वसाधारण काश्मीरी माणसाचें मन असल्याचें मला दिसले. अर्थात् हें काश्मीरी जनतेच्या मागासलेपणाचेंच लक्षण म्हणावें लागेल. कारण सर्व प्रकारच्या वैचारिक आणि सामाजिक जागृतीपासून काश्मीरी समाज अजून पूर्णपणें वंचित आहे. मला तेथें वर्तमानपत्रें आढळली नाहीत. शाळा, शिक्षणसंस्था, वाचनालयें याचें प्रमाण कमीच दिसलें. स्त्रियामध्यें गोषाची चाल अजून प्रचलित आहे.

**प्रश्नः** संस्थान तर आतां खालसा झालें. आतां प्रश्न आहे काश्मीरी माणसाला हिंदुस्थान जवळचा वाटतो की पाकिस्तान ?

**उत्तरः** काश्मीरमध्यें हिंदुमुसलमान हा संघर्ष दिसत नाहीं. सर्वसाधारण व्यवहारांत आचारविचारांत, राहणींत हिंदू कोण व मुसलमान कोण हें एकदम पाहणाऱ्याला समजतहि नाहीं. हिंदू माणसाच्या कपाळाला गंधाचा ठिपका असतो एवढीच त्याला ओळखण्याची खूण. मुसलमान बहुसंख्य असले तरी पाकिस्तानी शिरजोर मनोवृत्तीचा येथें अद्याप तरी प्रवेश झालेला दिसत नाहीं. शिवाय पाकिस्ताननें टोळीवाल्यांच्या मदतीनें काश्मीरवर

सुरुवातीस आक्रमण केल्यामुळें व या टोळीवाल्यानीं येथील जनतेची बरीच लूटमार करून तिच्यावर अत्याचार केलेले असल्यामुळें पाकिस्तान म्हणजे टोळीवाले अशी सुप्त भीतीच येथील जनतेच्या मनांत घर करून बसलेली दिसते. भारतीय सैन्यानेंच टोळीवाल्यांच्या अत्याचारापासून सीमेवरील जनतेची सुटका केली याचेहि स्मरण येथें आहे. यावरून असें दिसतें की, आज तरी काश्मीरी जनतेला पाकिस्तानपेक्षा भारतच अधिक जवळचा वाटत असावा.

### विकासाची खरी दिशा

प्रश्नः–भारत सरकार सालोसाल काश्मीरच्य विकासयोजनासाठीं कोटचवधि रुपये खर्च करीत आहे. त्याचाहि परिणाम या अनुकूलतेवर होत असेल ?

उत्तर : मला तर या विकासयोजन काश्मीरमध्यें कुठच आढळल्या नाहीत. हा पैसा कुठें जातो. कशासाठी खर्ची पडतो हे एक गूढच आहे. पण काश्मिरी जनतेच्या राहणीमानावर त्याचा काहीच परिणाम झालेला दिसत नाहीं. येथील सर्वसामान्य जनता कमालीच्या दैन्यावस्थेंत जीवन कंठीत आहे. काश्मिरी लोकाचें दारिद्रय दरिद्री महाराष्ट्रातील माझ्यासारख्या निर्धन माणसालाहि पाहवलें नाहीं.

प्रश्नः–परंतु काश्मीर म्हणजे डोंगराळ भाग. निसर्गानें सौंदर्याची लयलूट केली असल्यामुळें प्रवासी वाहतुकीचा धदाच (Tourism) येथें मुख्य असणार. आपल्याकडील सारख्या शेतीविकास किंवा औद्योगिकरणाच्या योजना आपणाला तिकडे दिसणार कशा ?

उत्तर.–हा भाग डोंगराळ असला तरी येथें औद्योगिक व शेतीविकासाला वाव नाहीं ही समजूत मात्र बरोबर नाही. येथें पाईन, सफेदा, चिनार, अक्रोड, देवदार या वृक्षांची प्रचड जगलें आहेत. या संपत्तीचा उपयोग कां होऊ शकत नाहीं ? येथील लोक लाकडावर कोरीव काम करण्यात कुशल आहेत. तो त्याचा पिढीजाद व्यवसाय आहे. पण या व्यवसायाचा शास्त्रशुद्ध विकास करणें, या मालाला आधुनिक बाजारपेठा उपलब्ध करून देणें या गोष्टीकडे योजनाकारांचें लक्ष गेलेलें दिसत नाही. येथला कारागीर आपला जिन्नस मातीमोलानें विकत असतो. मुंबईसारख्या शहरांत याच मालाच्य किंमती चौपट-पाचपटीनें वाढवून दलाल-दुकानदार ही उपरी मडळी भरमसाट नफे उकळीत असतात. येथें केशराच्या बागा आहेत. त्यांची शास्त्रशुद्ध निगा राखून हाहि व्यवसाय वाढवितां येणार नाही कां ? येथील मेंढचा चांगल्या असतात. तेव्हां मेंढपाळी व लोकरउत्पादन हेहि व्यवसाय येथें वाढू शकतात. काश्मिरांत सरोवरें पुष्कळ आहेत. ती आकारानेहि प्रचंड आहेत. मच्छीमारीचा धंदा येथें वाढविण्यास काय हरकत आहे ? श्रीनगरजवळ हरवानस्थान म्हणून एक मोठा जलाशय आहे. तेथें मत्स्यसवर्धनाचा काहीं विशेष प्रयत्न होत आहे असें समजल्यावरून मी मुद्दाम तेथें गेलों. पाहिलें तो Trout culture अशी एक पाटी फक्त तेथें लटकत होती ! तळचांत नाहीं म्हणायला अंगठचाएवढे मासे गिरक्या घेत होते. नैसर्गिक साधनसपत्तीची आबाळ, उपेक्षा आणि भलतीकडेच बारेमाप खर्च असा आपल्याप्रमाणेंच तेथेंहि विकासाचा मामला वाटला मला. आपण म्हणतां त्याप्रमाणें प्रवासी व्यवसाय वाढावा, जगांतील प्रवासप्रेमी लोक येथें आकृष्ट व्हावेत, त्यांनीं येथें जास्तींत जास्त राहावे या दृष्टीनें तरी कोठे योजनाबद्ध प्रयत्न होत आहेत ? येथील एस्. टी. गाडचा पाहिल्या की, नको तो प्रवास असे वाटतें. बनिहाल घाटांत अपघात तर वरचेवर होतात. सर्वसाधारण सधनतेला परवडतील अशी राहण्याची ठिकाणेंहि नाहींत. घाण तर इतकी कीं, सुधारलेल्या देशातील कोणत्याहि माणसाला येथें फार दिवस राहवेसे वाटणारच नाहीं. लीडरनदीच्या कांठाकाठाने आम्ही चाललों होतो. दुपारची जेवणाची वेळ झाली. जेवायला बसावें म्हणून आम्ही आसपास जागा शोधूं लागलो तर त्या नदीतटाकावर २–३ फर्लांग काही आम्हाला दुर्गंध नसलेली जागा सापडू शकली नाही.

### काश्मीरचें सौंदर्य

आम्ही दोन-तीन जण या कार्यक्रमांत सहभागी होतों. आमच्यातील एकाचा ना. ह. शी पूर्वीचा परिचय होता. अगदीं सहजपणें त्यानें या 'अवघे पाउणशें वयमान' असणाऱ्या गृहस्थाला प्रश्न विचारला–"का हो ! काश्मीरमधल्या स्त्रिया विशेष सौंदर्यसपन्न असतात असं आम्ही ऐकतों. याबाबतच आपलं मत काय झालं ? "

"माणूस" चा प्रतिनिधि या नात्यानें मी थोडा चरकलों. हा प्रश्न अप्रस्तुत तर होणार नाही, असेंहि भय मला वाटलें. पण प्रश्न ऐकल्यावर ना. ह. आपटे हंसले व म्हणाले, "या प्रश्नाचं उत्तर खुमासदार किंवा खुलासेवार देणे काहीस कठीण आहे. पहिली अडचण ही कीं, गोषापद्धतीमुळें काश्मिरांत उघडचा मुखानें व मोकळचा मनानें पुरुषवर्गांत मिसळून हिंडणाऱ्या स्त्रिया दिसतच नाहीत. शिकारासहल करितांना कांही मुखचद्र पाहण्यास सांपडले. तेसुद्धां ढगाआड लपलेल्या चंद्राप्रमाणें. त्यावरून तिकडची महिला नाकींडोळी सुरेख व गुलाबी सौंदर्याची आहे एवढें ध्यानी आलें. पण त्यांत स्त्री सौंदर्याला मोहक करणारी अभिव्यक्ति दिसली नाहीं. ठराविक ठश्याचे पुतळे किंवा पुतळचा वाटल्या ! —या दृष्टीने मला आपल्याकडील स्त्री वर्गांत आढळणारी कमनीयता व लास्य विशेष आकर्षक वाटतें. "

"हा परिणाम शिक्षणाचा असूं शकेल का ? "

"तसा संभव आहे. आपल्याकडील कॉलेजकन्यका व त्याचें सौंदर्यप्रसाधन लक्षांत घेतल्यास ही गोष्ट विशेष प्रतीत होतें. तुलनात्मक दृष्टचा हें सांगितलें. काश्मीरमध्यें पुरुष शिक्षणच अभावाने आहे. मग तिकडील स्त्रीजाती कोणत्या अवस्थेंत आहे, याचें वर्णन काय करावं ? —"

आपटे क्षणिक थांबले व पुढें म्हणाले, "काश्मिरातील पुरुषवर्गामध्येंसुद्धा महाराष्ट्रांतील माणसाचा कणखरपणा व तडफ आढळत नाही. काश्मीरी गोरा आहे. उचापुरा आहे, प्रकृतीनेहि काहीसा बरा आहे. पण सौम्य दिसतो. मुस्लीम असूनसुद्धां. "

अशाप्रकारे हा मुद्दा रगू लागला असताच आपटे एकदम म्हणाले, "हो, एक सांगितलें पाहिजे. काश्मीरविषयक असें बोलताना माझें वार्धक्यहि ध्यानात येतें. मला वाटतें, वृद्धपणी नवी सृष्टी, नवें सौदर्य पाहिल्यावर आश्चर्यचकित व मुग्ध होण्याची शक्तीहि मंदावत असावी. कारण, काश्मिरातील निसर्गसौदर्य काय किंवा स्त्रीरमणीयता काय पाहून मला विशेष असे काहीं वाटलें नाहीं."

याचा खुलासा झाल्यावर आम्ही सारेंच हंसलों व मग आपटे याच्या कन्या सौ. मंगला साठे यानी पुढें आणून ठेविलेल्या खमग पदार्थांचा आस्वाद घेत मुलाखत संपविली. ●●●

# " हरियाली और रास्ता"

## ' किंचित् हिरवळ व बराच रस्ता '

रंगा मराठे



शशिकला

चित्रपट पाहून मी आणि माझा मित्र थिएटरच्या बाहेर पडलों तेव्हां रात्रीं नऊ वाजले होते. गर्दीतून वाट काढीत असतांना आमच्या कानांवर अनेक उद्‌गार पडत होते.

" गाणीं फार मस्त आहेत, नाहीं ? "

" सीनसिनेरी फारच छान आहे. अगदीं दार्जिलिंगला गेल्यासारखं वाटतं. "

एक गृहस्थ जांभई देत म्हणाले,

" आपल्याला तर बुवा कंटाळा आला. "

" तरी मला वाटलंच होतं कीं, रिटा निदान ८॥ ला मरणार म्हणून, त्याशिवाय चित्रपट संपूंच शकत नाहीं. "

माझा मित्र म्हणाला,

" चित्रपटांत हिरवळ फारच कमी आहे, आणि रस्ता मात्र खूपच लांबवलाय्. "

चित्रपट पाहून माझं डोकं मात्र सुन्न झालं होतं. जशी मागणी तसा पुरवठा याला अनुसरून चित्रपटाचा व्यापार चालला आहे. नाच-गाणीं व सीनसिनेरी हें भांडवल प्रेक्षकांना पुरविलं कीं बस. सुरुवातीला एखादी चांगली कथा घ्यायची अन् शेवटीं तिचा विचका करायचा. हळुवार हातानं प्रेक्षकांच्या भावनांना स्पर्श करण्याचं सामर्थ संपुष्टात आलं कीं काय असं अनेकदां वाटतं. मूळ कथानकाला प्राधान्य देण्यापेक्षां नायक-नायिकेच्या प्रणय प्रसंगांना व गाण्यांना अधिक महत्त्व दिलं जातं. समाजाला वळण लावण्याचं चित्रपट हें एक प्रभावी माध्यम आहे. त्या माध्यमाचा सध्यां दुरुपयोग केला जातो असं नाइलाजानं म्हणावं लागतं. " प्रणय " हा एकच मध्य-बिंदू घेऊन चित्रपटाची निर्मिती होते व प्रेक्षकांवर ती लादली जाते. प्रेक्षकांनाहि आतां त्याची संवय झाली आहे. चांगलीं गाणीं, नाच व सीनसिनेरी असली कीं वेळ बरा जातो, घटकाभर करमणूक होते. या चित्रपटाचे सारे प्रणय-प्रसंग दार्जिलिंगच्या निसर्गरम्य पार्श्वभूमीवर घेतले आहेत. त्यामुळें प्रणय बघवला नाहीं तरी पार्श्वभूमि बघवते. चित्रपटांतील बराचसा भाग याच कामाकरितां खर्च झाला आहे.

### कथानक

चित्रपटाचं कथानक थोडक्यात असं :

रमाकान्तः—दार्जिलिंगमधल्या चहाच्या मळ्याचा मालक

शिवनाथः— (मनमोहनकृष्ण) रमाकान्तचा बालमित्र. कलकत्त्यास नोकरी.

शंकरः— (मनोज) रमाकान्तचा मुलगा.

शोभनाः— (माला सिन्हा) शिवनाथची मुलगी.

रिटाः— (शशिकला) शंकरची वाग्दत्त वधु.

रमाकांत अतिशय आजारी असल्यामुळें कलकत्त्यास असलेल्या आपल्या मित्राला दार्जिलिंगला आपल्या घरीं बोलावून घेतो. शिवनाथ आपल्या ७-८ वर्षांच्या मुलीला—शोभनेला— घेऊन दार्जिलिंगला येतो. रमाकांत आयुष्याचे शेवटचे क्षण मोजत असतो. शिवनाथ आल्यावर आपली अखेरची इच्छा रमाकांत त्याला सांगतो. दार्जिलिंगमधील चहाच्या मळ्याच्या अफाट इस्टेटीचा शिवनाथला त्यानें ट्रस्टी नेमलेला असतो व त्याचा मुलगा शंकर याचा त्याच्या मित्राच्या मुलीशीं विवाह करावा अशी त्याची इच्छा असते. या दोन्ही गोष्टींचं तो शिवनाथकडून वचन घेतो व प्राण सोडतो.

शिवनाथ आपली कलकत्त्याची नोकरी सोडून दार्जिलिंगला शोभनेसह चहाच्या मळ्याच्या इस्टेटीचा ट्रस्टी म्हणून देखरेख करण्याकरितां रहातो. शोभना आणि शंकर एकमेकांच्या सहवासांत लहानाचे मोठे होतात. त्यांचं एकमेकावर प्रेम असतं. शिवनाथ इस्टेटीची व्यवस्था पहात असल्यामुळें त्याचं तिकडं दुर्लक्ष होतं. त्यांच्या प्रेमाचा बराच बोलबाला झाल्यावर तो दचकून जागा होतो. मित्राला दिलेल्या वचनाची त्याला आठवण होते. शंकरची वागदत्त वधु रिटा असते व रमाकांतच्या इच्छेनुसार शंकरचं लग्न रिटाशीं होणं आवश्यक असतं.

रिटा परदेशांत शिक्षणासाठीं गेलेली असते. ती परत येते. रिटाचे वडील शिवनाथला पत्र पाठवून रिटा व शंकरच्या विवाहाची आठवण करून देतात. त्यांच्या कानावर शंकर—शोभनेच्या प्रेमाची कुणकुण येते. रमाकांतच्या इस्टेटीवर डोळा ठेवून शोभनेचं शंकरशी लग्न व्हावं असा स्वार्थी हेतु शिवनाथच्या मनांत असल्याचा रिटाचे

वडील शिवनाथवर आरोप करतात. मित्रप्रेम व दिलेलं वचन डोळयांपुढें ठेवून काम करणाऱ्या निस्वार्थी शिवनाथला हें सहन होत नाही. तो शंकरची कानउघाडणी करतो व आपल्या वडिलांची इच्छा पुरी करण्याकरिता त्यानं रिटाशीं लग्न केल पाहिजे हें त्याला पटवून देतो. पण शोभनेवर निःस्सीम प्रेम करणाऱ्या शंकरला तें पटत नाहीं. शोभनेचं शंकरवर प्रेम असतं पण आपल्या पित्याचं वचन पुरं करण्याकरितां ती शंकरला रिटाशी लग्न करण्याची जाणीव करून देते. रिटाच्या वडिलांनी केलेला अपमान सहन न होऊन शिवनाथ दार्जिलिंग सोडून कलकत्त्यास जातो. वाटेंत गाडीला अपघात होतो. शिवनाथ व शोभना त्या अपघातांत सांपडतात. रेल्वेचा पूल मोडल्यामुळें गाडी नदीत कोसळतें व त्या अपघातात शोभना मेली असं शिवनाथ व शंकरला वाटतं. शंकर तिचा खूप तपास करतो पण ती सापडत नाही. शिवनाथ बराच जखमी होतो पण त्याचे प्राण वाचतात.

इकडे शोभना नदीत वहात जाऊन किनाऱ्याला लागते. होडकं घेऊन जाणारे कोळी तिचा प्राण वांचवतात. आपण मेलों या जाणिवेनं आपल्या प्रेमाचा शंकरला विसर पडेल व तो रिटाशी लग्न करील या उदात्त हेतूनें शोभना आपण जिवंत असल्याचं कुणालाच कळवत नाहीं. विषण्ण मनःस्थितीत रस्त्यातून जात असताना ती मोटार अपघातात सापडते. तिच्या हाताला दुखापत होते. ज्याच्या मोटारखालीं तिला अपघात होतो तो एक डॉक्टर असतो. शोभना आपलं नांव बदलून कमला असं नाव धारण करतें व त्याच डॉक्टरांच्या हॉस्पिटलमध्यें नर्सची नोकरी धरते.

इकडे शंकर दार्जिलिंगला एकटाच अस्वस्थ मनःस्थितींत दिवस घालवत असतो. शोभना गेल्यामुळें कुणाशीच लग्न न करण्याचा तो निश्चय करतो. पण त्याच्या मळयांत काम करणाऱ्या जोसेफची बायको मेरी त्याचं मन वळवितें. मेरीवर शंकरचं आईसारखं प्रेम असतं. तिच्या आग्रहामुळें तो रिटाशीं लग्न करण्यास तयार होतो. तो एकाच अटीवर, शिवनाथ जर दार्जिलिंगला त्याच्याजवळ राहून इस्टेटीचं काम साभाळणार असेल तरच. रिटाचे वडील शिवनाथचं मन वळवितात. रिटा शंकरचं लग्न होत व शिवनाथ पुन्हा दार्जिलिंगला परत येऊन शंकरजवळ राहू लागतो.

पण रिटाबरोबर संसार करण्यांत शंकरचं मन रमत नाहीं. त्याला शोभनेची सारखी आठवण येते. रिटाचा स्वभाव उधळया असतो. ती शंकरचा पैसा क्लब आणि पार्टी करिता हवातसा खर्च करते. तिचं घरात लक्ष नसतं. व्याख्यान, ट्रिप्स, क्लब अशा सोशल लाइफमध्यें ती रममाण होते व ती कलकत्त्याला येऊन रहाते. तिला एक मुलगा होतो. पण त्याच्याकडेहि ती दुर्लक्ष करतें. तो आजारी पडतो व त्याच्या हाताला fractur होतें. रिटा त्याला हॉस्पिटलमध्यें ठेवते. योगायोगानं ज्या हॉस्पिटलमध्यें शोभना नर्सचं काम करतें त्याच हॉस्पिटलमध्यें रिटा मुलाला ठेवते. आणि त्याच्या शुश्रुषेचं काम कमलाकडे ( शोभनेकडे ) येतं. आपल्या मुलाला हॉस्पिटलमध्यें ठेवला आहे हें शंकरला मुळीच खपत नाही. त्याचं व रिटाचं खूप भांडण होतं व तो मुलाला घेऊन दार्जिलिंगला परत येतो. रिटा कलकत्त्याला वडिलांजवळ रहातें. या साऱ्या धांवपळीत शोभना शंकर व रिटाला टाळते. आपण जिवंत आहोंत हें शंकरला कळता कामा नये याकरितां हॉस्पिटलमध्यें ती शंकरला आपलं अस्तित्व जाणवू देत नाहीं व त्यांत तिला यश मिळतं.

इकडे शंकर विषण्ण मनःस्थितीत मुलाला घेऊन दार्जिलिंगला परत येतो. रिटानं त्याचा संसार उध्वस्त केलेला असतो. शोभनाचं प्रेम तो विसरूं शकत नाहीं. बालपण आणि तारुण्यांत शोभनेच्या सहवासात त्याचा काळ गेलेला असतो. दार्जिलिंगला जागोजाग शोभनाच्या सहवासांत काढलेल्या साऱ्या स्मृति उफाळून वर येतात. तिच्याबरोबर म्हटलेलीं गाणीं त्याला आठवू लागतात. प्रीतीच्या रस्त्यावर नुसतीच हिरवळ नसते, काटेहि पसरलेले असतात. शंकर आजारी पडतो, तो बेभान होतो. सैरावैरा भटकतो, बेचैन होतो. शोभनेचा ध्यास घरतो. त्याचा आजार जास्तच बळावतो व त्याची शुद्ध हरपते.

दार्जिलिंगहून कलकत्त्याच्या हॉस्पिटलमध्यें Trunk-call जातो. डॉक्टरना पाचारण केल जातो. Trunk-call योगायोगान कमलाच ( शोभना ) घेते. शंकर अत्यवस्थ असल्यानें ती घाबरून जाते. डॉक्टर कमलेसह दार्जिलिंगला जातात. शंकरला तपासतात. त्याची परिस्थिति गंभीर असते. तो " शोभना " " शोभना " असं पुटपुटत असतो.

डॉक्टर कमलाला म्हणतात, ' परिस्थिति गंभीर आहे. ही शोभना जर आली तरच शंकरचे प्राण वाचतील.' कमला सांगते ' शोभना मागेंच अपघातात मेली. ' डॉक्टर शंकरचे प्राण वांचविण्याची आशा सोडतात. कमलाला आपणच शोभना आहोत हें सांगण्याचा मोह अनावर होतों, पण तो ती आवरते. कर्तव्य म्हणून शंकरचे प्राण वाचविले पाहिजेत याची तिला जाणीव होते. शंकर ज्या खोलीत असतो त्या पलिकडल्या खोलीत जाऊन ती गाणें म्हणू लागते. शंकरचं ते फार आवडतं असतं व तिनं आणि त्यान मिळून तें गाणं म्हटलेलं असतं. त्या गाण्याचे स्वर ऐकून शंकर हळू हळू शुद्धीवर येऊ लागतो. पण त्याला शोभना कुठेंच दिसत नाही. तो बिछान्यावरून उठून शोभनेला शोधत ती गात असते तिथ येतो. इकडे रिटा शंकर अत्यवस्थ असतो म्हणून त्याची प्रकृति पहायला येते. ती हा सारा प्रकार पहाते. शंकर–शोभनेच उत्कट प्रेम पाहून तिचा जळफळाट होतो. ती मुलाला बळजबरीनं मोटारीत घालून निघून जाते.

शंकरचे प्राण वांचले, आता आपलें कर्तव्य संपले या जाणिवेनं शोभना निघून जाऊं लागते. तिच्या मागून शंकर धावू लागतो रिटा बळजबरीनें मुलाला मोटारीत घालून निघून जात असते. वाटेंत शोभनेची व तिची गाठ पडतें. शोभना रिटाची मोटार अडवतें व तिला शंकरकडे परत जाण्याची विनवणी करते. ' मी शंकरचे प्राण वाचविले, आता मी निघून जातें ' असं शोभना तिला सांगते. पण रिटा तिचं ऐकत नाहीं. इतक्यात मोटारींत असलेला रिटाचा मुलगा पळत सुटतो. त्याला पकडण्याकरिता शोभना व रिटा त्याच्यामागून पळत सुटतात. पळताना रिटाचा पाय घसरतो व ती कड्यावरून कोंसळून दरीत पडतें. तिच्यावर औषधोपचार केले जातात, पण त्याचा काहीहि उपयोग होत नाही, रिटा प्राण सोडण्यापूर्वी शंकरचा हात शोभनेच्या हातात देते. शंकर आणि शोभनेचं मीलन होत व चित्रपट संपतो.

## प्रणयाचे ठराविक रूळ

चित्रपटाच्या मूळ कथानकाचा मध्यबिंदू रमाकान्त व शिवनाथ यांच्या मैत्रींत आहे. मित्रप्रेमाकरिता शिवनाथ त्याग करतो, त्याला दिलेलें वचन पूर्ण करण्याकरिता वाटेल ते कष्ट सोसतो. पण ह्यावर भर न देता शंकर शोभनेच्या प्रणय प्रसंगाना जास्त प्राधान्य

दिलं आहे. हे प्रसंग दार्जिलिंगच्या निसर्गरम्य पार्श्वभूमीवर असल्यामुळें व ते जास्त उठावदार केल्यामुळें प्रेक्षकांच लक्ष मूळ कथेपेक्षा या प्रसंगावरच जास्त केंद्रित केलें आहे. चित्रपटाचा अर्धा आधिक भाग याच प्रसगांनी व्यापला आहे. त्यामुळें कथानकाची गाडी Siding ला जाऊन प्रणयाच्या रूळावरून अधिक धावल्यासारखी वाटते. शकर–शोभनेच्या प्रणयाचे खेळ इतका वेळ चालूनसुद्धां शिवनाथला त्याचा कसा पत्ता लागत नाही याचेंच आश्चर्य वाटते. या प्रसगांच्या जोडीला दार्जिलिंगची निसर्गरम्य पार्श्वभूमी आणि कर्णमधुर संगीताची साथ मिळाल्यामुळें प्रेक्षक त्यातच गुरफटून जातो.

### अपघात आणि मृत्यु

चित्रपटांत एकूण चार अपघात आणि तीन मृत्यु होतात. प्रथम रमाकान्तचा मृत्यु होतो आणि कथानक सुरू होते. नंतर रेल्वेच्या अपघातांत शोभना आणि शिवनाथ सापडतात. (भरत मात्र कोणीच नाही!) नंतर शोभना डॉक्टरच्या मोटारखाली सांपडते. मेरी ही ट्रकखाली सापडून मरते. चित्रपटाचे शेवटीं रिटाला अपघात होतो व ती कड्यावरून खाली कोसळून मरते व रेंगाळलेला प्रणयाचा हा त्रिकोण संपुष्टांत येऊन नायक–नायिकेचं मीलन होतें.

चित्रपटाचं कथानक अपघात किंवा मृत्यु झाल्याशिवाय पुढें सरकू शकत नाही. प्रत्येक अपघात किंवा मृत्युमुळें चित्रपटाला गति येते व शेवटच्या अपघात व मृत्युमुळें नंतर सुखात शेवट होतो.

### चित्तथरारक प्रसंग

चित्रपटात मेरी व तिचा नवरा जोसेफ हीं दोन पात्रें टाकलीं आहेत. रमाकांतच्या–दार्जिलिंगच्या मळचांत जोसेफ काम करीत असतो. पुढें तो मॅनेजर होतो. त्याला दारूचें व्यसन लागतें. दारूचें व्यसन पुरें करण्याकरिता तो चहाचा चोरून व्यापार करतो व ट्रक ड्रायव्हरकडून लाच खातो. त्याचें दारूचें व्यसन व लांच खाणें मेरीला पसत नसते. मेरी ही एक सत्त्वशील व देवभोळी बाई असते. नवरा आपल्या मालकाच्या चहाचा चोरून व्यापार करतो हें तिला पसंत नसत. एकदा शिवनाय चहाचा ट्रक अडवितो, तेव्हां परमिटशिवाय ट्रक जात असल्याच त्याच्या लक्षांत येतं. मेरीच्या नवऱ्यानें लांच खाल्लेली असते. हा सारा प्रकार शिवनाथ मेरीच्या कानावर घालतो.

एकदा अशीच ट्रक ड्रायव्हरकडून जोसेफनं लाच खाल्लेली असते. फॅक्टरीच्या दरवाज्याशी मेरी ट्रक अडविते व ड्रायव्हरजवळ परमिट मागते. ड्रायव्हर तिला बाजूला होण्यास सांगतो. ती बाजूला होत नाहीं–डायव्हर मेरीच्या अगावरून ट्रक नेतो व मेरीचा शोचनीय अत होतो. आपल्या लाच खाण्यामुळें मेरीचा शोचनीय अंत झाला हें पाहून जोसेफच्या डोळचावरील दारूची धुदी खाडकन् उतरते. तो मेरीच्या प्रेताजवळ जाऊन टाहो फोडतो. त्याला मिळालेल्या लाचेच्या नोटा आकाशातील देवावर उधळतो व त्याला सागतो की, "मीं लाच खाल्ली. हे पैसे मी तुला परत करतो. माझी मेरी तू मला परत कर," फॅक्टरीच्या दाराशी पडलेलें मेरीचें प्रेत शेजारच्या क्रुसावरील रक्ताचे थेंब, उधळलेल्या नोटा, भुरुभुरु पडणारा पाऊस व तिच्या नवऱ्यान फोडलेला टाहो–हा साराच प्रसंग चित्तथरारक आहे. इतर साऱ्या प्रसगांपेक्षां हाच प्रसंग प्रेक्षकांच्या मनावर खोलवर रुजतो. मेरीच्या नवऱ्याने फोडलेला टाहो, उधळलेल्या नोटा आणि त्याची देवाला विनवणी प्रेक्षकाच्या हृदयाला पाझर फोडते. ओमप्रकाश यानें जोसेफची भूमिका इतकी उत्कृष्ट केली आहे कीं, ती प्रेक्षकाच्या मनातून पुसली जाणार नाही.

### दिग्दर्शन आणि संगीत

चित्रपटाचें दिग्दर्शन विजयभट्ट यानी बरेचसें सफाईदार केले आहे. बऱ्याच ठिकाणीं त्यांना संयम पाळतां आला असता, तो त्यानीं न पाळल्याने प्रणय-प्रसंगांची लाबण वाढली आहे. दिग्दर्शन–कौशल्याचे बारकावे कोठेंच आढळत नाहीत. नाहीं म्हणायला पाऊस सुरू होऊन क्रुसावरील रक्त पुसले जातें व त्याचक्षणीं जोसेफला वेड लागते ह्या दृश्यातील कारुण्य जाणवतें. प्रेमिकांच्या सकेत स्थळीं भेटण्याच्या जागेवर एकमेकाचे नांव कोरण्याची कल्पना फारच जुनी झाली आहे. तिचाच मार्ग त्यानी अवलंबिला आहे. चित्रपटातील काहीं व्यक्तिरेखा मात्र त्यांनी चागल्या हाताळल्या आहेत. मेरीचा नवरा (ओमप्रकाश), डॉक्टर (सुरेंद्र), शिवनाथ (मनमोहन कृष्ण) याच्या व्यक्तिरेखेला बाध येईल असा एकहि प्रसंग नाही. मात्र शंकर-शोभनेच्या प्रणय-प्रसगांना त्यानीं जें प्राधान्य दिलें त्यात संयम बाळगला असता तर चित्रपट जास्त चांगला झाला असता.

शकर जयकिसन याचें संगीत हा या चित्रपटाचा आत्मा आहे. संगीतानें प्रेक्षक नादमुग्ध होतात. चित्रपटात नऊ गाणीं आहेत. पण सर्व गाण्याच्या चालीत नाविन्य असल्यामुळें या चित्रपटाचें यश सगीतातच आहे.


## पांढरे डाग

अनुभवसिद्ध प्रसिद्ध गुणकारी औषध. अनेक बक्षिसे व हजारों अभिप्राय मिळाले आहेत व नित्य मिळतात. औषधाची किंमत ६ रुपये. पो. ख. १ रु. माहिती मागवा. मोफत पाठवू.

नकली वैद्यापासून सावध राहावे.

वैद्य बी. आर्. बोरकर. आयुर्वेद भवन (माणू.)
मु. पो. मगरुळपीर. जि. अकोला (महाराष्ट्र.)



## समाज प्रबोधन संस्था

१२४२, सदाशिव पेठ, पुणें २.

| | |
|---|---|
| आर्थिक विकासाचा प्रश्न : दे. अ. दाभोलकर | १·५० |
| लोकशाहीचा कारभार : सदाशिव आठवले | २·०० |
| विश्वरचना : ना. वा. कोगेकर | १·२५ |
| आपला महाराष्ट्र : पन्नालाल सुराणा | २·५० |
| अपंगत्वावर विजय : उषा मोहनी | २.६० |
| भारतीय शेती : स. ह. देशपांडे | २·०६ |
| राजकीय पक्षांसाठीं आचारसंहिता : (सं. निबंध) | २·०० |

## अभिनय

शोभनेचें काम माला सिन्हानें बरें केलें आहे. पण अभिनयापेक्षां अंगविक्षेप करणें यालाच जास्त प्राधान्य आहे. शंकरचें काम मनोज या नव्या नटानें केलें असून त्याला अभिनय म्हणजे काय हें मुळीच समजलेलें नाहीं. त्याचा गोंडस चेहरा (तो सुद्धा समीपदृश्यामध्यें चांगला दिसत नाहीं) हेंच त्याचें भांडवल असावें. मनोजचें काम साफ पडलें असल्यामुळें माला सिन्हाला तो नीटशी साथ देऊं शकत नाहीं. अनेक प्रसंगांत तो बावरल्यासारखा-घाबरल्यासारखा व बावळट वाटतो. हाच त्याचा अभिनय असल्यास तो मात्र चांगला झाला आहे.

मनमोहन कृष्ण (शिवनाथ), जोसेफ (ओमप्रकाश) व डॉक्टर (सुरेंद्र) यांच्या भूमिका उत्कृष्ट झाल्या आहेत. त्यांच्या कामामुळें चित्रपटास बराच उठाव मिळाला आहे.

पटकथा ध्रुव चटर्जी यांची आहे. मूळकथा चांगली असावी असें वाटतें. पटकथेंत भावनेला किंवा व्यक्तिरेखेला प्राधान्य न देतां घटनांना प्राधान्य दिल्यामुळें तिची लांबी निरर्थक वाढली आहे. हजरत जयपुरी व शैलेंद्र यांचीं गीते चांगलीं आहेत व त्याला शंकर जयकिसन यांच्या संगीताची साथ मिळाल्यामुळें त्यावर साज चढला आहे.

चित्रपटाचें छायाचित्रण फारच चांगलें आहे. दार्जिलिंगच्या निसर्गरम्य पार्श्वभूमीचा उपयोग जास्त चांगला करण्याचा प्रयत्न केला आहे व तो यशस्वी झाला आहे. कांहीं देखावे फारच चांगले चित्रित केले आहेत. कोळी शोभनेचे प्राण वांचवून तिला होडींत घालून नदी-किनाऱ्यावर आणत असतात त्याच वेळीं शंकर काठावर अवस्थ होऊन फेऱ्या मारत असतो व त्या कोळ्यांच्या होडक्यांतील दिव्यावर सिगरेट पेटवून निघून जातो, हें दृश्य अतिशय चांगलें चित्रित केलें आहे. छाया व प्रकाश यांचें मनोहर मिश्रण या प्रसंगांत पहावयास मिळते–

या बोलपटाचं वर्णन करायचं झाल्यास "एक संगीतप्रधान बोलपट" येवढंच करावं लागेल. हिंदी चित्रपट घटनाप्रधान व प्रणय प्रसंगांनीं नटलेले असतात तसाच हाहि आहे आहे. प्रणयाच्या रस्त्यावर नुसती हिरवळ नसून कांटेहि असतात, त्यामुळें अपघात होतो. नंतर ताटातूट, विरह व पुनर्मीलन. पुनर्मीलनाच्या मार्गांत आलेले सारे अडथळे दूर होतात. प्रेमाच्या व विरहाच्या आजारानें अत्यवस्थ व Serious असलेला व मृत्युशय्येवर पडलेला नायक नायिकेच्या गाण्यानें पूर्ण बरा होतो, एवढेच नव्हें तर तो धावूं-पळूं लागतो! नायिकेच्या गाण्याच्या औषधानें त्याचे प्राण वांचतात. हें नायिकेच्या गाण्याच्या औषध फक्त सिनेमांतच मिळत असावें असें दिसतें! एकंदरीनें फार अपेक्षा ठेऊन गेल्यास निराशा करणारा व अपेक्षा न उंचावल्यास करमणूक करणारा हा चित्रपट आहे.



# नाना अडणविसाच्या कथा.

**: ४ :**

पेशवाई बुडाल्यानंतरची ही गोष्ट आहे. एकदां नाना अडणवीस, एका इंग्रज अधिकाऱ्याकडे चहापानासाठी गेला असतां, त्या अधिकाऱ्यापुढें किरकोळ चोरीच्या आरोपावरून दोन नोकरांना आणण्यांत आलें. त्यांत एक गोरा इंग्लिश होता व दुसरा मराठी माणूस होता. त्या अधिकाऱ्यानें त्या गोऱ्या माणसाला सात दिवस तुरुंगवासाची शिक्षा दिली आणि काळ्या नेटिव्ह माणसास नुसता दम देऊन मोकळा सोडला.

नानाला जरा आश्चर्य वाटलें. त्यानें विचारलें —"गुन्हा एक मग शिक्षेंत तफावत कां?"

यावर तो अधिकारी म्हणाला—

"एखाद्या इंग्लिश माणसानें चोरी करावी हें लांछनास्पद आहे, नेटिव्हांना ती संवयच आहे — They are habituated. —"

नाना अडणवीस वरमला. त्यानें हा टोमणा मात्र लक्षांत ठेवला.

कांहीं दिवसांनीं नानाची पत्नी सायंकाळचे वेळीं देवदर्शनाहून परत येत असतांना तिला चार सोजीर दिसले. वेळ संध्याकाळची. रस्ता निर्मनुष्य. यामुळें अर्थातच ती घाबरली व घरीं आल्यावर तिनें नानांना हा प्रसंग सांगितला. नानानें लगेच त्या इंग्रज अधिकाऱ्याला आभाराचें पत्र लिहिलें. त्यांत चार सोजिरांनीं स्त्री एकटी सांपडली असून कांहींहि गैरवर्तन केलें नाहीं याबद्दल त्याला दुवा दिला.

पुनः गांठ पडताच त्या अधिकाऱ्यानें नानाला पत्राचा संदर्भ देऊन म्हटलें —

"पत्र पाठविण्याची उगाच तसदी घेतलीत"

यावर नानानें खुलासा केला —

"साहेब शिपाई इंग्रज होते म्हणून विशेष आश्चर्य वाटलें. साधारणपणें नेटिव्ह शिपाई भेटले तर आमच्या स्त्रियांना कधींच भीति वाटत नाहीं. मुद्दाम आभाराचें एवढेंच प्रयोजन!"

●●●

# गंधर्व भूमि



* बालगंधर्वांचा सत्कार
* स्नेहप्रभा प्रधान यांची नाट्यशिक्षण संस्था
* एकपात्री प्रयोग

अनंत ओक

## बालगंधर्व आणि नवी पिढी

शूराचा पोवाडा शूरांनींच गावा आणि शूरांनींच ऐकावा हें नटांच्या बाबतींत जर खरं असतं तर नटांखेरीज आबालवृद्धांना गहिंवरल्या अंतःकरणानें, सुप्रसिद्ध लेखकांना आपल्या शब्दभांडारांसहित, पट्टीच्या वक्त्यांना आपल्या अमोघ वाणीसह, थोडक्यांत सर्वांना आपलं हृदय ओतून पुण्याच्या महाराष्ट्र मंडळामध्यें बालगंधर्वांच्या सत्कारांत सामील होता आलं नसतं. तिथं काय नव्हतं ? तिथं गायकांची गायकी होती, वक्त्यांचं वक्तृत्व होतं, उत्सवमूर्तींचं अन्तःकरणाला जाऊन भिडणारं " अन्नदाते हो आणि मायबापा हो " चं आवाहनहि होत. आणि अशा जर्जर अवस्थेंत रंगभूमि पुनः उभारायची जिद्दहि होता. आवडत्या व्यक्तीचं कौतुक पुनः पुनः वाचतांना वीट येत नाहीं. पण पुनरुक्तीचा मोह टाळावा हेंच इष्ट.

समारंभ पाहतांना आणि नंतरहि मनाला एक विचार वारंवार सतावत होता. ज्यानें दोन तपांहून अधिक काळ रंगभूमि वैभवसंपन्न राखली त्याचं होणार कौतुक सद्गदित अंतःकरणानं पहाण्यापलिकडे आणि त्यात भाग घेण्यापलिकडे आम्हीं काय केलं ? त्यांच्या पायापाशीं बसून अभिनयकलेचे धडे घ्यायला हवे होते. वाणीची शुद्धता, शब्दांची फेंक, भूमिकेशीं समरसता वगैरे त्यांच्या अद्वितीय गुणांपैकीं पुढच्या पिढीनं काय आत्मसात् केलं ? अंधानुकरण म्हणजे शिष्यत्व नव्हे; श्रीपाद कृष्णाचं शिष्यत्व गडकऱ्यांनीं घेतलं म्हणजे त्यांचा अतिरेकी विनोद उचलला नाहीं. गडकऱ्यांच्या शिष्यानें आपल्या नाटकांत कृत्रिमतहि आणली नाहीं. गुरूच्या गुणाला आपल्या प्रतिभेची आगळी जोड देऊन एक नवं दर्शन घडवणं यांतच शिष्योत्तमाची कसोटी. या कसोटीला बालगंधर्वांच्या पावलांवर डोकं ठेवणारे आजचे कितीसे कलावंत उतरतील ? या विद्येला टेक्स्ट बुक्स् नाहींत आणि गाईड्स्हि नाहींत. पण किमानपक्षीं स्वत्व विसरून समरस होण्याची प्रवृति तरी? लोह आणि कर्ब यांच्या प्रमाणशीर मिश्रणांतून लोहावरती मात करणारा पोलादासारखा वज्रभेदी धातू निर्माण होतो. कालौघाला अनुसरून मूस बदलेल पण मुशींत तदनुषंगानं घडणारं सोनं तरी बावनकशी हवं ना ? बालगंधर्वांनंतरच्या आणि जुन्या पिढीनंतरच्या रंगभूमीचा मागोवा घातला तर कारणं कांहींहि असोत, मन विमनस्क होतें. कारण कलेंत अलौकिकता मिळण्यासाठीं विनम्र, अभ्यासू आणि स्वत्व विसरून जाण्याची प्रवृति ही प्रकर्षानं असावी लागते. नाटक पाहण्यापेक्षां तें कसं बसवलं जातं, वाचनापासून दर्शनापर्यंत त्यावर कोणते कोणते सोपस्कार घडवले जातात ह्याचं निरीक्षण कलावंतांच्या दृष्टीनं अत्यंत महत्वाचं असायला पाहिजे. परंतु दिग्दर्शकाशी वितंडवाद, लेखकाशी निरर्थक चर्चा आणि अहंमन्य प्रवृत्ती हा आजच्या कलावंतांचा स्थायीभाव आहे. त्यामुळेंच गेल्या पिढींतील कलावंतांनीं शिष्य तयार केले नाहींत हें जरी खरं असलं तरी त्याचा दोष सर्वस्वीं त्यांच्यावर जात नाहीं. विद्यादानासाठीं शिष्याची पात्रता, तयारी आणि परपस्पर प्रेम असणं फार अगत्याचं आहे.

● ●

## थिएटर आर्ट इन्स्टिटयूट

पूर्वी कांहीहि असो, आतां मात्र नाटयविद्या ही गुरुमुखांतूनच बाहेर पडायला पाहिजे ही कल्पना दूर व्हायला हवी. नाटयविद्येवर एवढा प्रचंड ग्रंथसंभार पाश्चात्य देशांत तयार होत आहे कीं, त्याचं नुसतं परिशीलन झालं तरीसुद्धां बराचसा कार्यभाग होण्यासारखा आहे. आणि त्या दृष्टीनं सुसूत्र अभ्यासक्रम आंखला गेला तर त्याचं स्वागत व्हायला पाहिजे. स्नेहप्रभा प्रधान यांच्या नव्या संस्थेचं स्वागत त्या दृष्टिकोनांतून व्हायला हवं. या संस्थेसबंधीं वाचतांवाचतां कै. पार्श्वनाथ आळतेकर आणि के. नारायण काळे यांचे पुण्यांतील प्रयत्न, मुंबई मराठी साहित्य संघ आणि मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय यांचे मुंबईंतील नाटयशिक्षणवर्ग आणि प्रभाकर गुप्ते यांची चालणारी अविश्रांत धडपड ही डोळयांसमोर येऊन जाते. जोडीला विजया-जयवन्त ( खोटे ) यांचीहि कांहीं काळ चाललेली खटपट लक्षांत आल्यावाचून रहात नाही. या सर्वांच्या प्रयत्नामध्यें आणि प्रधानांच्या खटपटीमध्यें त्याना मुंबईच्या मुख्यमंत्र्याकडून आर्थिक सहाय्याचं मिळालेलं आश्वासन एवढाच फरक. पूर्वींच्या परिश्रमांतून नेत्रदीपक राहोच पण सामान्य फलहि दृष्टीस पडलें नाही. नाटयशिक्षणाच्या या उपक्रमांकडे लक्ष टाकल्यास ह्यापेक्षां कांहीं वेगळया प्रकारानं ह्याची उभारणी व्हायला पाहिजे असं वाटूं लागत. अलकाक्षी, मझंबान, दुर्गा खोटे यांसारखे शिक्षक, मुंबई मराठी साहित्य संघ, महाराष्ट्रीय कलोपासक यांसारख्या सस्था यांना सरकार नाटय शिक्षणास पात्र म्हणून मान्यता देते. त्यांच्या हाताखाली सरकारी शिष्यवृत्या मिळालेला शिष्यवर्ग तयार होऊं पहातो. गुरुशिष्यांची जिद्द भरपूर असते. पण दृश्यफल मात्र चीज करणारं नसतं. ह्यापेक्षां एक सघटित योजना फिल्म इन्स्टिटयूटच्या धर्तीवर आखली जावी. तिथं केवळ अभ्यासार्थी न घेतां रहिवासी विद्यार्थी घेतले जावेत, शहरीं वातावरणापासून संस्था दूर असावी,-म्हणजे विद्यार्थ्यांना शहरी प्रलोभन राहणार नाहीत-त्यांत नाटयकलेच्या प्रत्यांगाचं सुसूत्र शिक्षण दिल जावं. अभिनय ही द्रव्यविद्या असली तरी रंगभूषा, वेशभूषा, ध्वनि, प्रकाश, व्यवस्था आणि नेपथ्य-रचना हीं कांहीं कमी प्रतीचीं अंगें नव्हेत. आणि त्याहूनहि महत्त्वाचं म्हणजे लग्न आणि प्रेम ह्या व्यतिरिक्त नाटकाचे विषय असूं शकतात हें प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीनं लेखकांच्या मनावरहि ठसवलं जातं. आज एका विशिष्ट चाकोरीतच नाटयलेखन घोटाळत आहे. त्यामुळें इतर अंगें बाहेर पडावींत अशी सुसूत्र, शिस्तबद्ध आणि संघटित योजना तयार झाली तर मराठी रंगभूमीची आणि पर्यायान हिंदीरंगभूमीची प्रगति होईल. नाहीतर उत्तमोत्तम इंग्लिश चित्रपट पहावेत, हिंदुस्थानला भेट देणाऱ्या परदेशी कलावंताच्या पथकांचे सुसघटित, नेत्रदीपक प्रयोग पहावेत आणि आपल्यांतील वैगुण्याची तीव्र जाणीव होऊन सुस्कारे टाकावेत ह्यापलिकडे मराठी रसिकांच्या हातीं दुसरं काय आहे.


केवळ नाटय शिष्यवृत्त्या आणि या ना त्या रूपाने नाटय संस्थांना मदत यापलिकडे जाऊन सरकारने वर सूचित केलेली "थिएटरआर्ट इन्स्टिटयूट" स्थापन करण्यात आणि चालवण्यांत पुढाकार घ्यावा. केवळ सर्व भार सरकारावर टाकून आपण स्वस्थ रहावें हा ह्या विधानाच्यामागें उद्देश नाही. तर सरकारी सस्थामधून त्याचे नीतिनियम पाळल्यास आर्थिक विवचना रहात नाहीं. आणि निरनिराळे प्रयोग करण्यास हुरूप येतो, स्वास्थ्य लाभते. कलावंत स्वछंदी असावा अशा पुरातनकाळापासून चालत आलेल्या कल्पनेनुसार कलावंतांना हे निर्बंध जाचक वाटतात हें अशा तऱ्हेच्या इतर संस्थांच्या धडामोडींवरुन दिसून येतें. पण अशा अडचणीनी नाउमेद न होतां सरकारनें जर सस्था चालू ठेवली तर आजच्या नाहीं तरी उद्याच्या रसिकांना दिलासा मिळाल्यावांचून रहाणार नाही. सस्थेचें स्वरूप, त्यातील शिक्षकवर्ग, अभ्यासक्रम व त्याचा प्रत्यक्ष रगभूमीवरती परिणाम ह्या सर्व गोष्टींचा विचार करण्याचें हें स्थल निश्चित आहे. परंतु स्थल संकोचास्तव त्याला मर्यादा पडते आहे. परंतु संस्थेची यशस्विता ही बऱ्याच अशी अनुभवी, प्रगतीशील आणि अद्यावत विचाराच्या शिक्षकवर्गावर व सचालकावर अवलबून असते हें खरेंच. अशा स्वरूपाचा अभ्यासक्रम बडोदा विद्यापीठाने चालू ठेवलेला आहे.

●●

## राजुरकरांचीं ' नमुनेदार माणसं '

सध्याच्या रंगभूमीमध्यें मुंबईची मराठी रंगभूमि ही अद्ययावत् विचाराची, प्रयोगोत्सुक अशी समजली जाते. भारतीय विद्याभवनने चालविलेल्या आतरमहाविद्यालयीन नाटयस्पर्धांमधील निरनिराळया महाविद्यालयानी सादर केलेल्या प्रयोगामधील रुचिवैचित्र्य, दर्शनवैचित्र्य, हें त्याचे गमक आहे. विविध देशातील कलावतानी मुंबईला दिलेल्या भेटी आणि त्यांनीं सादर केलेलें विविधगुणदर्शन, तेथील प्रायोगिक रगभूमि प्रवाही ठेवायला फार मदत करते. त्याच्या संकलित परिणामातून आणि पुलदेशपांडेंच्या अगभूत नाटयगुणातून मराठी प्रेक्षकाना ' बटाटयाच्या चाळी 'च दर्शन घडल. फ्रेंच कलावंत ' मार्सो ' हाहि कदाचित् ' बटाटयाच्या चाळीच्या ' असाधारण यशाला कारणीभूत असावा. अस पुलदेशपांडेंच्या अपूर्वाईवरून वाटतं. त्यानतर ' शारदा ' आणि ' सौभद्र ' याचेहि एकपात्री प्रयोग झाले. पुण्याला मधुकर सुखात्मे आणि मुरलीधर राजूरकर ह्यानीं अशा प्रकारचा प्रयोग करून पाहिला.

( पान ४५ वर चालू )



तपासनीस :-" तू सांग रे, सिलोन कोठें आहे ?"
विद्यार्थी :-" विविधभारतीच्या डावीकडे २५ मीटर्सवर ! "

## ते कलावंत ! त्या आठवणी !!

* * * * सुधीर दामले

साठ-पासष्ट वर्षांपूर्वीची गोष्ट ! ग्रँटरोडवरील एल्फिस्टन थिएटर मध्यें महाराष्ट्रांतील अग्रगण्य नाटचसंस्था शाहूनगरवासी मंडळीचा 'मानाजीरावाचा' प्रयोग चालू होता. प्रयोग कमालीचा रंगला होता. विशेषत: पांचव्या अंकांत नायिका दर्याबाई हिचा झोंपेंत चालण्याचा आणि जागेपणीं केलेलीं दुष्कृत्यें बडबडण्याचा एक प्रवेश आहे तो तर विलक्षण रंगला होता. दर्याबाईचें काम करणारा तो नट अभिनय इतका उत्कृष्ट करीत होता कीं, प्रेक्षक बेहद्द खूष झाले. प्रवेश संपतांच त्यांनीं टाळयांच्या गजरांत 'वन्समोअरची' मागणी केली. वास्तविक या प्रवेशांत दर्याबाईचा मृत्यु घडतो असें नाटककारानें दाखविलें आहे. तेव्हा तो सबंध प्रवेश पुन्हा करणें केव्हांहि अनैसर्गिकच ठरलें असतें. ही सारी अडचण प्रेक्षकांतील विद्वानांनीं इतर सामान्य लोकांस सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु प्रेक्षकवर्ग इतका धुंद होऊन गेला होता कीं, ते पुढला प्रवेश मुळीं होऊं देईचनात ! कोणाचेंहि ऐकायचें नाहीं असेंच जणूं त्यांनीं ठरविलें होतें !! वन्समोअरचा गजर त्यांनीं सुरूच ठेवला. जवळजवळ पंधरा मिनिटें रंगभूमी रिकामी राहिली. अखेरीस लोकांची समजूत घालावी म्हणून मंडळीचे चालक कै. गणपराव जोशी आपला मानाजीरावाचा पोशाख उतरवून साध्या पोशाखांत रंगभूमीवर आले. त्यांना पहातांच सहाजिकच प्रेक्षकांमध्यें कमालीची शांतता झाली. ते काय सांगतात याकडे सर्व कान देऊन ऐकूं लागले. धीरगंभीर आवाजांत गणपतराव बोलूं लागले. "आम्हां मंडळींवरील आपल्या प्रेमानें आपण आम्हांला लाजवीत आहांत. परंतु एक गोष्ट आपण ध्यानांत कशी घेत नाहीं ! नाटककारानें दर्याबाईचा मृत्यु दाखविला आहे. तेव्हा ती रंगभूमीवर परत उभी करण्यानें साऱ्या रंगाचा बेरंग होत नाहीं काय ? तेव्हां हा प्रवेश आम्हीं पुन्हा कसा करावा ? अर्थात आपली तशीच इच्छा असेल तर एकच उपाय आहे. तो म्हणजे पहिल्यापासून नाटक करणें हाच ! परंतु आतां एक वाजून गेला आहे. तेव्हां उशीरापर्यंत नाटक चालू ठेवण्यास कमिशनरची परवागी घ्यावी लागेल आणि ती आणण्याची व्यवस्थाहि मी करतो. पण तोंपर्यंत बसण्याची तयारी मात्र हवी." हें ऐकल्यावर मात्र प्रेक्षक कसेबसे शांत झाले आणि नाटक पुढें चालू झालें.

नटश्रेष्ठ गणपतराव जोशांच्या जोडीनें रंगभूमीवर काम करीत असतांना त्यांच्यापेक्षांहि रसिकांकडून कांकणभर जास्तच प्रशस्ती मिळविणाऱ्या या (दर्याबाईचें काम करणाऱ्या) नटाचे नांव होतें 'बाळाभाऊ जोग !'



### बाळाभाऊ जोग

१८६९ चे सुमारास कोकणांतील एका खेडयांत त्यांचा जन्म झाला. त्यांचे वडील नागपुरास अंमलदार होते. परंतु बाळाभाऊ तेरा वर्षांचे असतांनाच ते वारल्यामुळें बाळाभाऊंचें शिक्षण बेतासबातच झालें. पुढें एका मित्राच्या प्रोत्साहनामुळें घरांतून पळून जाऊन ते शाहूनगरवासीमध्यें येऊन दाखल झाले. प्रारंभीं प्रारंभीं त्यांना किरकोळ स्त्री भूमिका कराव्या लागल्या. परंतु लौकरच त्यांच्या गुणामुळें ते मुख्य स्त्रीपार्टी नट बनले. आणि मग तेव्हांपासून गणपतराव नायकाच्या भूमिकेंत आणि बाळाभाऊ नायिकेच्या भूमिकेंत असणार हें जणूं ठरून गेलें. अगदीं बाळाभाऊंच्या अकाली निधनापर्यंत–१९१० पर्यंत–शाहूनगरवासीची ही जोडी विलक्षण लोकप्रिय झाली होती.


बाळाभाऊ अभिनयांत जसे सरस होते तशीच त्यांची बुद्धीहि मोठी कुशाग्र. त्यांनीं आपल्या हुशारीनें कित्येक प्रश्नांचा चुटकीसरशी निकाल लावल्याच्या अनेक गोष्टी प्रसिद्ध आहेत. १८९१ सालीं शाहुनगरवासी मंडळीचा मुक्काम पुण्यास होता. त्यावेळीं मंडळी पौराणिक नाटकें करीत असे. कंपनीच्या बिऱ्हाडीं अनेक चाहते मंडळी जमत असत. त्यांमध्यें फर्ग्युसन कॉलेजमधील प्रा. वा. बा. केळकर हेसुद्धां न चुकतां हजेरी लावत असत. त्यांनींच पुढें 'टेमिंग ऑफ दी श्रू' या शेक्सपिअरच्या नाटकाचें 'त्राटिका' या नांवाचें मराठी रूपांतर केलें. अशा या विद्वान् आणि रसिक प्राध्यापकांससुद्धां बाळाभाऊंच्या आकलनशक्तीचें असेंच एकदां प्रत्यंतर आलें.

त्यावेळीं फर्ग्युसन कॉलेजचे विद्यार्थी प्रा. केळकरांच्या मार्गदर्शनाखालीं 'वेणीसंहार' या नाटकाचा प्रयोग बसवीत होते. तालीम चालू असतांनाच 'मूर्च्छां नाटयति' या नाटयसूचनेबरहुकूम अभिनय कसा करावा याविषयीं चर्चा सुरूं झाली. कोणालाच त्याचा उलगडा होईना. सर्व मंडळी सुशिक्षित असूनसुद्धां अभिनयांत अनभिज्ञ असल्यानें कोणालाच त्याचें अनुकरण करणें जमेना. सहाजिकच प्रा. केळकर त्यानंतर जेव्हां मंडळीच्या बिऱ्हाडीं गेले तेव्हां त्यांनीं लोकांना हा सारा प्रकार सांगून कोणाला कांहीं सुचतें कां असेंहि विचारलें. शेजारीच बसलेले बाळाभाऊ गालांतल्या गालांत हंसत सहज उद्गारले "त्यांत विशेष असें काय आहे? मी दाखवतो!" अर्थातच दुसऱ्या दिवशीं बाळाभाऊ कॉलेजमध्यें तालमीस हजर झाले; असलेली सर्व मंडळी–त्यांमध्यें नाटककार देवलहि होते– आश्चर्यानें थक्क होऊन गेली. बाळाभाऊंची सर्वांनीं मनमोकळी स्तुति केली. रूढार्थानें ज्यांना अशिक्षितच म्हणावें लागेल, अशा बाळाभाऊंचें हें अभिनयनैपुण्य असामान्य नाहीं असें कोण म्हणेल?

दुसरा असाच एक प्रसंग! कै. देवल यांच्या 'झुंजारराव' या नाटकांत बाळाभाऊ खलनायक जाधवरावांचें काम करणार होते. पहिल्या अंकांत कमळजेच्या बापाला जाधवराव रस्त्यांतून हांका मारीत असतो असा प्रसंग आहे. आणि त्या नाटकाच्या तालमी स्वतः देवल मास्तर घेत होते. त्यांनीं ज्या तऱ्हेनें या हांका माराव्यात असें बाळाभाऊंना सांगितलें ती रीत बाळाभाऊंना मुळींच आवडली नाहीं. दोघांत बरीच वादावादी झाली आणि अखेरीस बाळाभाऊंनीं सहा वेगळ्या तऱ्हांनीं हांका मारून दाखविल्या. सहाजिकच देवलांची हारच झाली! देवल मास्तर हें केवढ्या योग्यतेचे तालीम मास्तर आणि नाटककार होते हे कांहीं नव्यानें सांगायला नको. त्यांच्यावरसुद्धां बाळाभाऊंनीं मात केली.

असे हे बाळाभाऊ शाहूनगरवासीचे नायिकाच होते. गणपतराव जोशांच्या तोडीस तोड अशा त्यांच्या भूमिका होत असत. १९१० सालीं ते जेव्हां अकाली वारले तेव्हां गणपतरावांना आपला उजवा हातच गेला असें वाटल्यावांचून राहिले नसेल हें निश्चित!

• • •



डॉक्टर :–"त्या लॅपॅरोहिस्टेरो साल्पिंगो अूफेरोक्टॉमी झाल्यावर पॉलिमॉर्फोन्यूक्लिअर ल्यूकोसायटॉसीस् झालेल्या बाईचं आडनांव काय बरं?"

नर्स :–"जोशी!"



---

( पान ४३ वरून चालू.........गंधर्व भूमि )

राजूरकरांचं वैशिष्टय म्हणजें प्रत्यक्ष कागदावर न उतरलेल्या स्वलिखित वाङमयाचा त्यांनीं उपयोग केला. सामान्य कलावंतानें स्वलिखित, स्वदिग्दर्शित एकपात्री नाटकाचा प्रयोग करण्यांत फार मोठा धोका असतो. इतर लेखकांच्या वाङमयाकडे शोधक दृष्टीनें पहाणारा दिग्दर्शक स्वतःच्या दिग्दर्शनाकडे जाणूनबुजून डोळेझांक करतो. राजूरकरांनीं बटाटयाच्या चाळीजवळ एडके मॅन्शन उभा करायचा प्रयत्न केला आहे. बटाटयाच्या चाळींत मोजकींच पण उठावदार व्यक्तिमत्वाचीं पात्रं होतीं. पु. लंनीं आपल्या अभिनय-कौशल्यानं त्यांना रसरसून जिवंत केलं. आणि शेवटीं निर्जीव, निःशब्द बटाटयाच्या चाळीला बोलायला लावून प्रेक्षकांच्या डोळयांतून पाणी काढलं. एडके मॅन्शनमध्यें त्या मानानं माणसं फार गोंधळ जास्त. आणि वैशिष्टयपूर्ण व्यक्तिमत्वाचा अभाव. सर्वांनाच जिवंत करण्याच्या प्रयत्नांत राजूरकरांना व्यक्तीला स्वतंत्र व्यक्तिमत्व देतांच आलं नाहीं. राजूरकरांच्या प्रयत्नांकडे अत्यंत सहानुभूतीनं पहात असतांनासुद्धां हा विचार मनांत आल्यावाचून रहात नाहीं. किमानपक्षीं एडके मॅन्शन रंगभूमीवर एकदम उभा करायच्या आधीं राजूरकरांनीं तो एखाद्या तंत्रज्ञाला दाखवायचा होता. असं झालं असत तर राजूरकरांच्या डोळयांतून आपल्या वाङमयीन अपत्य विच्छेदनामुळें पाणी आलं असतं. परंतु एडके मॅन्शन त्यांमधील रहिवाशांसह जिवंत झाला असता. रंगभूमीवर आणावयाच्या कलाकृतींकडे अत्यंत तर्ककर्कश दृष्टीनें पहायचें असतें तें एवढयासाठींच. मराठी रंगभूमीला प्रयोग हवेत हें निश्चित्. परंतु ते डोळस हवेत. एवढं जरी ह्या प्रयोगामुळें कळलं तरी हेंहि कांहीं थोडें नाहीं.

• • •

# स्वरांची अमरवेल

P. L. Deshpande. आशीर्वाद

२२ जून १९६२ वरळी-मुंबई १८

प्रिय डॉक्टरसाहेब,

आपलें पत्र पोहोचलें. २६ तारखेला श्री. नारायणराव बालगंधर्वांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या सभारंभासाठी पुण्यास येणें मला अगदी अशक्य आहे. वास्तविक या प्रसंगीं त्यांच्या अभिनंदनासाठी नव्हे तर पदवंदनासाठी मात्र यावयाचें होतें, परंतु माझा नाइलाज आहे. आज आम्ही मराठी रंगभूमीवर जें काहीं थोडेंबहुत करण्याचा प्रयत्न करतों, त्यामागें नानाचा आशीर्वाद आहे, त्यांची पुण्याई आहे; याची जाणीव माझ्या मनांत सदैव जागृत असते. हीं अलौकिक माणसे ! आमचें भाग्य म्हणून हीं महाराष्ट्रांत जन्माला आली. गेलीं ६० वर्षे त्यानी रसिकांचे कान तृप्त केले. देवाघरून येतानांच सूर आणि लय ह्याची सिध्दि मिळवून आलेल्या या स्वरसम्राटाबद्दल नव्यानें काय बोलायचें आणि काय सांगायचें ? त्यांचें जिथें दर्शन आणि भाषण सुरेल तिथे गायनाबद्दल लिहायला शब्द कुठले आणायचे ? त्यांच्या साध्या हालचालीत सूर सांठला आहे. ज्ञानेश्वरानीं संतांचीं लक्षणें सांगतांना एका ठिकाणी म्हटलें आहे की, 'जयांच्या लीळांमाजी नीती जियाली दिसे !' संतांच्या साध्या हालचालींत नीतीचा जन्म होतो. नानांच्या नाटच आणि सगीताबद्दल हेंच म्हणता येईल. आणि म्हणून बालगंधर्वांच्या भूमिका करताना त्यानी उभ्या केलेल्या रीतीनेंच इतरांना जावें लागलें. नाना जें गायले तें संगीत ठरलें. संगीतामुळें त्याचा गौरव झाला कीं, ते गायले म्हणून संगीतकलेचा गौरव झाला हें सांगणें कठीण आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासांत एक लोकोत्तर कलावंत म्हणून त्यांच्या नावाचें पान सुवर्णाक्षरांनी केव्हांच लिहिले गेलें आहे.

माझ्या घरांत तर माझ्या वडलांपासून नारायणराव बालगंधर्व हें आमचें सांस्कृतिक कुलदैवत आहे.

त्यांच्या वयाला आज लौकिक हिशेबानें ७५ वर्षे झाली. पण हीं माणसें वयाच्या गणितापलिकडलीं. वयाचा हिशोब हा पेन्शनीत निघणाऱ्या मंडळीसाठीं. इथें म्हणजे निसर्गानें शरिरावर क्रूर आघात केले तरी रिटायर होण्याची भाषा नाही. जे कधीं सुराच्या सहवासांत 'टायर्डच' झाले नाहीत ते रिटायर्ड कसे होणार ? जगात जोंपर्यंत सूर आहे तोंपर्यंत नारायणराव बालगंधर्व चिरंजीव आहेत: यापुढच्या पिढ्या त्यांच्या ध्वनिमुद्रित तबकड्या ऐकून अशाच पुलकित होणार आहेत. नारायणरावांनी स्वरांची अमरवेल लावली आहे.

आजच्या या शुभप्रसंगीं नानांना मी एक अल्पशी भेट पाठवीत आहे त्याचा स्वीकार व्हावा. ती भेट आणि त्यासोबत नानाचे चरणी माझा आणि माझ्या पत्नीचा शिरसाष्टांग नमस्कार प्रविष्ट करावा ही विनंति.

समारंभाला येता नाहीं ह्याचें फार वाईट वाटतें आहे. परंतु माझा संपूर्ण नाईलाज आहे. इतक्या अगत्यानें आमंत्रण पाठविल्याबद्दल आभारी आहे.

आपला

पु. ल. देशपांडे.

# गंगाजळी

'दर्यावर्दी' जुलै ६२ अंकांत डॉ. प्रकाशचंद्र यांनी अथांग समुद्राच्या पोटांत सुरळीतपणानें सहजीवन जगत असलेल्या जलचरांचें पुढील उद्बोधक आणि मनोहर दर्शन घडवलें आहे........



## जलचर प्राण्यांतील सहजीवन

निसर्गाचा प्रत्येक नियम हा एक प्रकारचें अबोल वरदान आहे. दुःखाची गोष्ट अशी कीं, प्राणी आणि मनुष्य ह्यांना परस्परांची भाषा समजत नाहीं. ज्याच्या सहाय्यानें आपण पाळीव जनावरांना वाचूं लिहूं शिकवितों त्या भाषेविषयीं म्हणतां येईल; हाच भाव अथवा इशारा यासंबंधीं नाहीं. आज माणसा माणसांतील लढाईमुळें जग त्रस्त झालें आहे. मग मानव आणि अन्य प्राणी परस्परांची भाषा समजूं शकले असते तर ? माणसें आणि जनावरें यांची लढाई रोजच दृष्टीस पडली असती. कशी म्हणून विचारतां कां ? सांगतो. खूप वेळां आपण पाहतो. एकादा माणूस क्रोधानें तप्त होतो आणि दुसऱ्या माणसास म्हणतो, "काय माणूस आहेस कीं जनावर ?" हें काय बोलणें ? जणूं काय सुसंस्कारांचा मक्ता माणसांकडेच आहे. आणि तोसुध्दा बाळकडूबरोबर पाजलेला. तसें कशाला ? दुसरी एक घटना सांगतां येईल. एका कंजूष माणसानें घासाघीस करून एक टांगेवाला ठरवला आणि तो त्यांत बसून निघाला. उतरायचें ठिकाण आलें तेव्हां तो टांगेवाल्याला म्हणतो, "फारच पैसे ठरवलेस तूं. तेवढे मी नाहीं देणार. चतुर्थांशच देईन." त्यावेळीं टांगेवाला म्हणतो- "साहेब, जरा हळू बोला. माझा घोडा तुमचं बोलणं ऐकेल तर पट्कन् उधळेल !"

मनुष्य शिकत आला आहे आणि त्याचें शिकणेंहि अद्याप बाकी आहे. कुठेंतरी वाचलेलें आठवतें, "अरे आळशा, या मुंग्यांपासून तरी परिश्रम करायला शीक !" किती अर्थपूर्ण वाक्य आहे हें ! सर्व प्राणी, मग ते नभचर असोत, जलचर असोत, भूचर असोत, त्या सर्वशक्तिमान विराट निसर्गाच्या खुल्या दरबारांतील सहकारी जीवन, एकत्रित परिश्रम आणि योग्य श्रमविभाजन यांचे सर्वांत परिपूर्ण असे सर्व नियम मानीत आले आहेत. त्यांतूनच माणूस खूप खूप शिकला. आणि अजून त्याला कितीतरी शिकायचें आहे. आपण पहातों--मित्र आणि सहकारी यांना माणूस नेहमीं मदत करतांना दिसतो. पण प्राणी त्याहून वेगळे वाटतात. ते आपल्या कुटुंबाबाहेर, जातीपातीहून अलग, स्पृश्यास्पृश्य, उच्चनीच अशा विचाराच्या पलीकडे जाऊन वैऱ्यालाहि मदत करायला चुकत नाहींत. असें असतां आपण मात्र त्यांना असभ्य, जंगली जनावरें म्हणतों. या प्राण्यांसंबंधी अनेक उदाहरणें देतां येतील. पण प्रस्तुत लेखांत जलचर प्राण्यांसंबंधींचीच माहिती देत आहे !

या अक्राळविक्राळ मगरीच्या कराल दाढेंत ही छोटी चिमणी जणूं मेजवानीच्या ताटावर ताव मारीत आहे अशा थाटांत बसली आहे.

मगरीच्या दांतांत अडकलेले खाद्यकण ती झपाझप टिपून घेत आहे. मगरीचे दांतच ती साफ करते आहे. ती आपलें काम इतकें निर्धास्तपणें करीत आहे कीं, तिला माहित आहे, जेव्हा मी येथून उडून जाईन तेव्हांच हा काळाचा जबडा बंद होईल. चिमणीचें हें दंतमंजन मगरीला फारच सुखावह वाटत असावें, म्हणूनच ती डोळे मिटून सुस्तीत पडली असावी. हीच गोष्ट पाणघोडे, गाई, म्हशी, गेंडे याच्या बाबतीतहि दिसून येते. जनावराच्या पाठीवर, मानेवर वावरणारे जे किडे त्यांना त्रास देत असतात ते किडे या चिमण्या टिपून घेतात. दुसऱ्याची सेवा करतांना चिमण्याना हा मेवा मिळत असतो. अशा रीतीने प्राण्यांमधील हें सहजीवन मोठें विलोभनीय वाटतें.

ज्याचें शरीर फुटबॉलच्या आकाराचें असून शेपटी एक याडीपेक्षांहि अधिक लांबीची आहे असा हा एक मासा. याला चिकटून त्याच्या पोटाच्या बाजूने चालणारा हा दुसरा मासा. याची मात्र कमाल आहे. हा छोटा मासा जो ह्या मोठ्या माशाच्या आधारानें वावरत आहे तो स्वत:चें पोट भरण्यापलिकडे काय वरें करूं शकत असेल ? परतु निसर्गानें कशातहि अपूर्णता न ठेवण्याचें ठरविल्यानें यातहि तीच पूर्णता दिसून येते. हा छोटा मासा म्हणजे एक क्षुल्लक प्राणी नसून ह्या मोठ्या माशाचा पतिदेव आहे !

आतां हा पहा सर्वांच्या परिचयाचा शार्क. हा एक जागतिक कीर्तीचा मासा असूनसुध्दां याला मार्गदर्शक लागतो. हा मार्गदर्शक म्हणजे त्याचा जणू सरक्षकच आहे. हा या शार्क माशाच्या नाकाजवळून अगदी चिकटूनच असतो म्हणजे तो दूर होऊं शकत नाही असे नव्हे ! छोटा मासा मोठमोठ्या बोटीच्या तळाशीं शार्कला आपलें खाद्य मिळविण्यासाठी घेऊन जातो. परतु हा छोटा मासा जर कां आपल्या सहकाऱ्याला सोडून दूर गेला आणि एकाद्या जलचर प्राण्यानें त्याला पकडलें तर त्या जलचर प्राण्यावर मोठें संकट ओढवलें म्हणून समजावें.

या वेळीं हा मासा या प्राण्याच्या टाळूच्या वरच्या भागावर अशा तऱ्हेनें चिकटून बसतो कीं, त्याच्या तोंडाची हालचाल बंद होऊन श्वासोच्छ्वास करणें मुष्किलीचें होतें. त्यामुळें अखेरीस त्या जलचराला या माशाला सोडून देणें भागच पडतें.

शार्क माशाची शिकार करतांना प्रथम या मार्गदर्शक माशांना वेगळें करावें लागतें. असें केल्यावर शार्क आंधळ्यासारखा पाण्यात गटांगळ्या खाऊ लागतो आणि शिकाऱ्याची शिकार बनतो.

तसेंच हा खेकडा. त्याचे निवासस्थान म्हणजे शख. शंखांतील तीन कप्प्यामध्यें समुद्रकिडा, एक्स्टेनिया व स्वत: हे खेकडेमहाशय रहातात. खेकडा बाहेरून सूक्ष्म प्राणी पकडून आणतो. आपल्या घरात ते आणून तिघहि पण त्यावर आपला उदरनिर्वाह करतात. सहकार्य आणि सहजीवनाचें हें आणखी एक उदाहरण.

खोल सागरातल्या प्राण्याचें असें आहे सहकारी जीवन ! माणसानें तें नीट समजून घ्यायला हवे. तसे घडले तर त्याची मानवता गर्वानें कधीच डोकें वर करणार नाही, ती खात्रीने लाजेल ! आणि सामान्य प्राण्यांच्या या सहकारी जीवनासमोर आमरण नतमस्तक रहाण्याची कबूली देईल ! किती थोर जीवन जगतात हे अज्ञ प्राणी ! माणसानें त्याच्यापासून हा धडा शिकावा. त्याने याउप्पर तरी कधीं म्हणू नये. " काय, माणूस आहेस कीं जनावर ? "

●●●

## नवा वकील

एका नवीन वकीलसाहेबांनीं आपलें ऑफिस उघडलें. दुसऱ्याच दिवशीं एक गृहस्थ आपणाकडे येतांना त्यांना दिसले. वकीलसाहेब त्याना हे दाखवू पहात होते कीं, आपली प्रॅक्टीस जोरात चालू आहे. त्यानी ताबडतोब फोन उचलला आणि ते बोलूं लागले, " आणि रावबहादूर शिंद्यांना म्हणावं अफरातफरीच्या आरोपांतून मीं त्यांना सहीसलामत सोडवलेलं आहे. त्यांच्या इस्टेटीची केस हातांत घ्यायला सध्यां मला वेळ नाहीं ! " ... त्यानंतर शेजारीं उभ्या असलेल्या गृहस्थाकडे पाहून त्यांनीं विचारलें, " बोला, मी आपली काय सेवा करूं शकतो ? "

" माझी ? ... " चांचरत तो म्हणाला, " मी तर आपला टेलीफोन चालू करायला आलों आहे ! "

' सैनिक समाचार ' वरून


साहसाच्या सह। सत्यकथा

**सहा साहसें**

लेखक : दा. सी. देसाई

मूल्य दोन रुपये

एका युवकाची विकासकथा

**विद्यालंकार**

लेखक : प्रभाकर इनामदार

मूल्य १ रु. २० न. पै.

श्वापदांच्या भावकथा

**परसूच्या पशुकथा**

लेखक : वसंत सबनीस

मूल्य दोन रुपये

**राजहंस प्रकाशन**

४१९ नारायण, पुणें २

# राजहंस प्रकाशन

४१९ नारायण पेठ, पुणें २.

## आमचेकडे मिळणारीं निवडक पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| मुजऱ्याचे मानकरी | ब. मो. पुरंदरे | १.२५ |
| सहा साहसें | दा. सी. देसाई | २.०० |
| ग्रामदानाची प्रयोगभूमि | श्री ग. माजगावकर | २.५० |
| आम्ही विष्णुदास | ,, | ०.५० |
| स्वराज्याचे युगमंत्र | ,, | ०.२५ |
| विद्यालंकार | प्रभाकर इनामदार | १.२० |
| झाशीची राणी | प्रभाकर शिदोरे | १.०० |
| हेमा सात तुंटके | भालचंद्र भिडे | १ २५ |
| रक्षाबंधन | गो. नी. दाडेकर | १.५० |
| सावित्री | ब. मो. पुरदरे | ०.५० |
| परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २.०० |
| गुजरातेंतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७.०० |
| मडकोबा | भा रा. भागवत | १.०० |
| वडवडमामा | लीलावती भागवत | ०.७५ |
| दयाळ | यदुनाथ थत्ते | २.०० |
| स्वैरविचार | ग. त्र्यं. माडखोलकर | ३.५० |
| वाङमयविलास | ,, | ५.०० |
| भारत आणि चीन | रा. कृ. पाटील | ८.०० |
| पायवाट ( काव्य ) | वावा मोहोड | ३.२५ |
| त्या तिथें पलिकडे | रॉय किणीकर | २ ५० |
| असिधारा | दे. गो. उदापुरे | ३.०० |
| आम्ही भगिरथाचे पुत्र | गो. नी. दाडेकर | १०.०० |
| आनदवनभुवन | ,, | ६.०० |
| पूर्णमायची लेकर | ,, | ४.०० |
| कुऱ्हाडीचा दाडा (नाटक) | ,, | ०.५० |
| शितू ( ,, ) | ,, | २.०० |
| पवनाकाठचा धोडी ( ,, ) | ,, | २.५० |
| उद्धव ( ,, ) | मगेश पत्की | २.०० |
| मराठ्याचे सिंहासह ( ,, ) | गो. कृ. मुगशीकर | २.०० |
| गाजलेले जीव भाग १ ते ४ | भा. रा. भागवत | १२.०० |
| शिंगी | ,, | २.५० |
| पाताळलोकची अद्भूत यात्रा | ,, | ३.०० |
| चितोऱ्याचा प्रताप | ,, | २.०० |
| हिंमतवान जासूद | ,, | ६ ०० |
| कोल्होबाची करामत | वऱ्हाडपाडे | १.०० |
| जमिनीवरची माणसें | शांताराम | ३.५० |
| ऐकलेल्या गोष्टी भाग १, २, ३. | भवानीशंकर पडित | १.५० |
| सत्तावनचा सेनानी | वसत वरखेडकर | ४.०० |
| राजपुत्र | ,, | २.५० |
| डोगर माथ्यावरील दिवा | बा. रा. शेडे | ३.०० |
| सतसमागम | भ. श्री. पडित | ३.५० |
| वसंत फार दूर नाही | अबादास अग्निहोत्री | ३ ०० |
| जळातील मासा | जयवत दळवी | ४.५० |
| पतंगप्रीत | म. वि. कुलकर्णी | ४.०० |


सपादक–मुद्रक–प्रकाशक श्री. ग. माजगांवकर * प्रकाशनस्थळ : राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण पेठ, पुणे २.